म. ग्रं. सं. ठाणें
विषय .
सं. क्र.

श्रीशिवाजी

विजयी छत्रपती

REFBK-001492

- नकाशान बुद्धे

डो ह


REFBK-0014392

मौज प्रकाशन : ११८

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९६५

© १९६५, श्रीनिवास विनायक कुलकर्णी

किंमत सहा रुपये

✕

सजावट : पद्मा सहस्रबुद्धे

✕

प्रकाशक :

वा० पु० भागवत

मौज प्रकाशन गृह

खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :

वि० पु० भागवत

मौज प्रिंटिंग ब्यूरो

खटाववाडी, मुंबई ४

४२०२१

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्थलमत. निबंध
अनुक्रम ४२०२१ ..... विः ..... निबंध
क्रमांक ..... नाः विः .....
20199६६
१८०२

श्रीशिवाजी विद्यालय घुणकीकर पेठ

सौज सप्रेम भेट

या संग्रहातील लेख पुढील नियतकालिकांतून प्रथम प्रसिद्ध झाले :

स त्य क था : □ आम्ही वानरांच्या फौजा (ऑक्टोबर १९६१) □ मृगजळातल्या यक्षघराला (मार्च १९६२) □ जुन्या जन्मीची माणसे (जानेवारी १९६३) □ रात दिवाभीताची (एप्रिल १९६४) □ मनातल्या उन्हात (ऑगस्ट १९६०) □ डोहापलीकडे (ऑगस्ट १९६४) □ वारा वाहे रुणझुणा (ऑगस्ट १९६३) □ शब्दांच्या संध्याकाळी (फेब्रुवारी १९६४) □ पाणी (जानेवारी १९६५)

मौ ज : □ सुसरींचे दिवस (दिवाळी १९६४) □ हा चौघडा क्षणाणे (दिवाळी १९६३)

आम्ही वानरांच्या फौजा	७
मृगजळातल्या यक्षघराला	२२
जुन्या जन्मीची माणसे	२८
रात दिवाभीताची	३८
मनातल्या उन्हात	४८
डोहापलीकडे	५८
वारा वाहे रुणझुणा	७६
शब्दांच्या संध्याकाळी	९४
पाणी	१००
सुसरींचे दिवस	१२४
हा चौघडा झणाणे	१६४

आम्ही वानरांच्या फौजा

पाऊस पडत असायचा. पाऊसच पाऊस...नेहमीचे कोवळे निळेशारपण मावळून आभाळ ढगाळले कधी, कळायचेही नाही. पावसाचे तिरपे पारदर्शक पाते एकसारखे फिरत राहायचे. पात्यामागे पाते—आणि त्या पातळ तलम पात्यांच्या पदरापदरांचे पुन्हा एक पारदर्शक पाते...

आमच्या उघड्या पडवीच्या लाल कौलारओळींच्या थोडे अलीकडे आत आम्ही घरची सारी जणे ते कुतूहल डोकावून, न लवणाऱ्या डोळ्यांनी पाहत उभी असू. पाणी पाणी पापण्यांभरी पाहत...पाऊस कुठे कुठे पडत

असेल, घाट कसा धुवून काळा लख्ख झाला असेल, वडाखालची तांबडमाती कशी सुवासत असेल, हे सारे मनात आणीत—अंगणातून वाहत जाणाऱ्या पाण्यातून सोडलेल्या कागदी होड्या कुठल्या देशात वाहत जातील या तर्काच्या शिडाबरोबर हरवत...

पाऊसधारांचा गारवा शरीरात भरीत आम्ही चहाचे गरम गरम घुटके पडवीत उभ्याउभ्या घेत असू. कौलारओळींच्या शेवटाला घासून थोड्या वरून देशपांड्यांच्या भिंतीची रेषा खालती उतरत येत असे. त्या रेषेच्या उतारावरून एक अंगभर भिजलेली लेकुरवाळी वानरी, पोटाला घट्ट चिकटून राहिलेल्या पोरासह आमच्याकडे पाहत गहूगहू खालती सरकत असे.

ती बाई चिंब भिजलेली असे. छत्रीसारख्या डोक्यावरून पुढे आलेल्या तिच्या केसांची नोकदार झिपरी उसकटून गेलेली असे. तिच्या डोळ्यांच्या टिंबात एक केविलवाणी इच्छा तेवे. ती खालती सरकायची आणि मग आई म्हणायची, "ये ग बाई, ये. भिजून गेली आहेस..."

एखादी भिजून आलेली बाई आत यावी तशी ती खुशाल आमच्या जवळ येऊन थांबे. सारे अंग हलवी; आणि भिजलेल्या पोराच्या केसातून पाणी निपटून काढी. मी तिचे अंग अंग जवळून पाही. तिचे काळे तोंड. नकटे नाक. तिच्या अंगावरली केसाळ लव. तिचे हात. तिच्या हातावरल्या रेषा...नि वाटे की, आजोबा आपला हात पाहतात, हिचाही त्यांना एकदा पाहायला सांगावे.

...पुढल्या दारी उभे राहिले की, देशपांड्यांच्या भिंतीला लागून देवघराची मोठीच्या मोठी गच्ची दिसे. तीवर वानरांच्या खूप बाया जमत. एकमेकीच्या पुढे पाठ करून उवा मारीत. पुढे येऊन बसलेली हलली तर तिला वेचणारणीकडून थापड बसे. एखादीला नुकते पोर झालेले असे. नि दुधाच्या तापाने ती मलूल झालेली दिसे. त्या साऱ्या काळतोंड्या बायांत त्या पोराचे तोंड गोरे वाटे. त्याची इवली इवली टाळू उडताना दिसे. त्याचे काच-मण्यासारखे डोळे लुकलुकत. त्या पोराचे त्या बाया माणसांच्या आयांइतके कौतुक करीत. त्यातली एक बाई ते पोर हातात घेई. दोन्ही हातांनी डाव्या

खांद्यावर ठेवी. मान कलती करून त्याला कानशिलाच्या सुखाची ऊब देई. पुन्हा उजव्या खांद्यावर घेई आणि आपल्या उजव्या कानशिलाची ऊब त्याच्या अंगात भरी. लहान मुलाला न्हाताना दोन पाय पसरून पालथे घालतात तसे ती त्या पोराला दोन पायांवर टाकी. थापटी. पुन्हा उचलून त्याला दोन हातांवर घेई. मग दुसरी तिच्या हातून ते पोर बळेबळे काढून घेई. झेली. आंदुळी. मुके घेई. मग तिसरी तिच्या हातून ते पोर बळेबळे काढून घेई. पुन्हा सारे तसे करी. आणि साऱ्याजणी असेच करीत. बहुतेकींची बाळंतपणे जवळ आलेली असत. एखादी पहिलटकरीण असे ती थोडी बावचळे. पण खूप जणी अनुभवीच असत. लवकर सुटलेलीचे असे कौतुक होई. तो सोहळा एकाएकी कुठे तरी जसे काही काम निघाल्या-सारखा चटकन थांबे. चटचट त्या हलत—तुरुतुरु आईच्या अंगाखांद्यावरून उड्या मारणाऱ्या पोरापुढे ती वानरी आपला उजवा हात पुढे करी—लगबगीने येऊन ते चिकटे. नि तीही निघून जाई...

वानरांसंबंधीचे अनेक प्रश्न माझ्या मनात जन्मत. ही माणसांसारखी भासणारी वानरे कपडे का वापरीत नाहीत? घरे का बांधीत नाहीत? झाडावरती झोपल्यावर पडत कशी नाहीत? कधीच न घासता त्यांचे दात पांढरेफेक कसे असतात? दात घासायच्या कंटाळ्यामुळे मी आईला, "वानरे कुठे दात घासतात?" म्हणून विचारी. पण माझ्या प्रत्येक बोलण्यावर तिचे आपले एक तोंड बंद करणारे उत्तर असेच. ती शांतपणे म्हणे, "बरं, नको घासू. आणि नको जेवू. वानरं कुठं जेवतात?"

आमच्या दक्षिणेकडे तोंड असलेल्या पडवीतल्या जमिनीवरती पालथे पडून पाहिले की, एका मोजक्या दृश्याचा छान तुकडा दिसे—समोर प्रसादजींच्या घराची चौकट. वरती पत्रा. पत्र्याच्यावरती तांबड्या मातीचा दर्जा निखळलेल्या, खरपूस विटांच्या भिंतीची उंचण. वर निळे फिके आकाश. निळ्या मोकळ्या आभाळावरती देवाच्या फुलबागेची पवन-चक्की—आकाशाहून गडद निळ्या रंगाची. उंचच उंच. तिचे टोक पडल्या पडल्या दिसे. आणि तिच्या पंख्याजवळच्या पेटीवर एक वानर

बसलेले असे—ते इतक्या उंचावर लोखंडी शिडी चढून का गेले, कशासाठी गेले, कोडेच असे. पण ते नेहमी तिथे असे. पवनचक्कीने ज्या विहिरीचे पाणी उपसले जाई ती एक काळोखखोल विहीर होती. तिच्या लोखंडी कठड्यावरून आत पाहणे हा एक विलक्षण अनुभव असे. जमिनीवरून वरती आकाशाकडे, विहिरीइतक्या खोल असलेल्या पवनचक्कीच्या टोकावर जाऊन एकदा खाली विहिरीत पाहायचे ही माझी तेव्हाची एक महत्त्वाकांक्षा होती. मला हेवा वाटायचा त्या तिथल्या वानराचा. ते लेकाचे रोजच तिथून खालती डोकावायचे.

समोरच्या चौकटीत आडवे पडून पाहिले की, आणखी एका ठराविक दृश्याचा ताजा तुकडा दिसे. निम्मा भाग देशपांड्यांच्या दक्षिणोत्तर भिंतीच्या कठड्याचा. वर निळे आभाळ. आणि त्यावर आभाळाशी पोचलेला वडाचा अवाढव्य विस्तार. मी आडवा पडून वडाच्या शेंड्याकडे पाही. वडाच्या शेंड्याशी अशी एक खोबण होती की, ती आरामखुर्चीसारखी दिसे. आणि त्या सहज झालेल्या आरामखुर्चीत एक वानर तासन्‌तास निवांत पडून असे. एकटेच. ते मोठे बुद्धिमान, अनुभवी वाटे. त्याच्या कपाळावरल्या झिपऱ्या हलल्यासारख्या वाटत. सर्व वानरांचे ते तिथून नियंत्रण करते आहे असे वाटे. मधूनमधून ते वाचन करीत असावे. जसे वडाचे पान पान पुस्तक होते. त्याने डोळ्यांवर चाळणी चढवली आहे असे उगाचच भासे. आणि हट्ट करणाऱ्या गावातल्या मुलांवरही त्याचे तिथून उंचावरून लक्ष असते, असे आई सांगे. पवनचक्कीवरले वानर हे माझे एकट्याचे खास गुपित होते, पण वडावरल्याची घरच्या सगळ्यांना ओळख होती.

पावसाळ्यात आमचे गाव पाण्याने वेढलेले बेट होऊन जायचे. माझा आपला मनाशी बेत ठरेः पाणी आले तर आले. आपण त्या वडाच्या शेंड्यावरल्या वानराजवळ राहायला जायचे.

पावसाळा सुरू होताना आई अंगणात वेल लावीत असे. काटेवाळकाची वेल तिच्या आवडीची. तिची ती आमच्याइतकी काळजी घेई. पाठीवरून फिरवल्यासारखा तिच्या पानावरून वात्सल्याने हात फिरवी. वळवळताना

अनुक्रमांक ४२०२१ दि: निवेद्य
प्रत: १५८५ नं: दि: २०।१।१६६

वाळलेल्या वेलांट्या खुडून टाकी. तिला चढता यावे म्हणून टेक देई. तिला पिवळी चिटुरली फुले यायला लागत. आणि काही फुलांमागे काकडीची गर्भकळी उभी राही. त्या वाढत्या गर्भकळीकडे बोट दाखवलेले तिला सोसत नसे. ती म्हणे, तिची वाढ खुंटते. आंगठ्याजवळच्या दोन बोटांमध्ये आंगठा मुडपून ते वाढते नवल सगळ्यांना दाखवायचे. गर्भकळी मोठी होऊन लटके. पिवळसर तेजकांतीची. तिच्या कांतीवर फिकट तपकिरी रंगाच्या नाजुक काटेखुणा उमटत...

एखादा द्वाड वानर येई. हातोहात ते लटकते कौतुक खुडून घेऊन जाई. देशपांड्यांच्या भिंतीच्या उतारावर थांबे. आणि मी पाही : पिवळसर काटे-वाळकावरल्या त्या तपकिरी खुणा तो दातांनी खवलून टाकी. तो तसे का करी, कळत नसे. पण त्या वेळी आमच्या शेजारी राहणाऱ्या कमळीची मला आठवण येई. कमळी माझ्याहून खूप मोठी होती. मला ती फार आवडे. तिच्या रूपाचा प्रकाश पडे. तिच्या तोंडावरच्या रंगाचे पिवळे चापेपण नि त्या वरल्या अंधुक तपकिरी छटेच्या शोभणाऱ्या इवल्या इवल्या पुळ्या... मला इच्छा होई : त्याही तशा दातलाव्यात...

अगदी लहानपणापासून वानरांसंबंधी मला काहीतरी निराळे वाटत असे. आईबरोबर जाताना कुठून तरी पुढे धप्‌दिशी उडी मारून तोंड विचकून गेलेले वानर मला आठवते. त्याच्या डोक्यावरल्या झिपरीमुळे ते छपराखाली राहिले आहे व त्या छपराला पाय फुटले आहेत असा माझा चमत्कारिक समज तेव्हा झाला होता. त्याचे लुकलुकते डोळे, त्याच्या शेपटाचा डौल माझ्या चांगला स्मरणात आहे. मला तो काहीतरी, अगदी गरीब, कपडे नसलेल्या माणसातलाच एक वेगळा प्रकार वाटे. ती गावातून कशासाठी तरी सतत तरतर धावत असत. कुठेतरी काहीतरी त्यांचे मोठे काम निघालेसे भासे. थंडीच्या दिवसात आजीबरोबर वडाखाली उन्ह खायला यावे तेव्हाही कितीतरी वानरे, पाराजवळ ओळीने उन्हाला पाठ देऊन बसलेली असत. आणि मनात येई, कुणाकुणाच्या मागे राहून गेलेल्या नुसत्या सावल्यातच जीव भरला आहे नि त्यांची वानरे झाली आहेत.

दादा माडीवरती चित्रे काढीत असत. काळ्या आणि पांढऱ्या रंगात काढलेली त्यांची चित्रे जिवंत होऊन बाहेर गेली आहेत, असा माझा वानरे पाहिल्यावरचा आणखी एक समज होता. त्या चित्रासाठी दादांनी पांढरा शुभ्र रंग कधी वापरला नाही. पांढऱ्या रंगात काळे-पिवळेपणाच्या छटा मिसळलेल्या.

दादांनाही त्या वेळी वानरांबद्दल फार वाटत असले पाहिजे. वानराच्या शरीराचा आकार अनेकदा ते हवेत बोटाने काढीत. रात्री दिव्याच्या प्रकाशात भिंतीवर हाताच्या बोटांनी, वानराची छाया पाडीत...मठात पिंपळाखालच्या एका काळ्या शिळेवर दादांनी वानराची आकृती कोरलेली होती. तिला शेंदरी रंग दिलेला होता. आणि ते वानर देव असल्याचे थोरल्या आईने सांगितले होते...

वानरे झाडांवरती राहत, पण त्यांच्या वागणुकीची वर्तुळे माझ्या अंगातून जात. ती बाळंतलिंबाच्या लिंबोण्या चोखत. कडू पाला खात. दादा म्हणत, म्हणून ती टणक असतात. मी तो कडू पाला किती तरी दिवस निर्धाराने खात असे. किती तरी वेळा घरात वानरासारखा आवाज काढीत असे. कोलांट्या खात असे.

पण दादा सुद्धा घरी वानराच्या निकोप उनाडपणाने वागायचे. मला ते फार आवडे. रक्त शुद्ध होते म्हणून ते करडकांगुणीचा कच्चा हिरवा पाला ओरबाडून खायचे. कचाकचा कच्चया चिंचा चावायचे. आंब्याचे हिरवे दोडे दाढेखाली फोडायचे. घरात एकदम खाली डोके वर पाय करून चालायला लागायचे. थोरल्या आईने हाक मारली तर एक कोलांटी घेऊन तिच्याजवळ यायचे. दादा नि मी घरातली दोन वानरे असल्याची थोरल्या आईची नि आईची पुरी खात्री झाली होती. थोरली आई म्हणे, "अरे, दोन पोरांच्या बापाला आता असं शोभत नाही." तरीही दादा आपले 'हुप्प' करून माझ्या उघड्या पोटात आपले डोके खुपसायचे नि मला मनस्वी सुखाच्या गुदगुल्या व्हायच्या.

...गडद हिरव्याकाळ्या पानांची चिंचांची झाडे वानरांच्या आवडीची.

त्यांना बहरून येणारा पिवळा केशरी नाजुक मोहर त्या साऱ्या खोल हिरवेपणावर उमटलेली नक्षी वाटे. आणि ती वानरे कुणीतरी खडी काढायला आलेले कलावंत वाटत. गाभुळलेल्या चिंचांचे आकडेच्या आकडे ती गट्टम करीत. लाल चिंचांचा रस तोंडातून सांडीत वेडावण दाखवीत. आणि चिंचेखाली उभे राहिले तर खोडीलपणाने खुशाल अंगावर हिरव्या विष्ठेच्या वड्या टाकीत...ऊन ऊन धारा सोडीत.

पतझडीतल्या दिवसातल्या एका निष्पर्ण झाडाच्या सांगाड्यावर एकदा इतकी निश्चल वानरे मी पाहिली होती की, ते एखाद्या विचित्र झाडाचे फळपीकच वाटावे.

...कुणीतरी दुपारचे बंदुका घेऊन येत नि वडावर उलटे टांगून घेणाऱ्या गरीब वाघळांवरती आवाज टाकीत. वडाखालती रक्तसडा पडे. त्या प्रकारांनी वडावरली वानरे इतकी भेदरून जात की ती सालीसारखी वडाला चिकटून राहत. थोड्या वेळाने पानांच्या छायेने झाकोळून गेलेल्या भागातून पाकोळ्यांना झोपेतून उठवत खालती येत. टपटप उड्या ठोकीत नि एकापाठोपाठ शेपूट उंचावून मठाकडे पळत सुटत. किती तरी दिवस वडावरची त्यांची वसाहत तिथून उठे नि वरचे पानजग कसे सुने सुने भासे. साथीत उठून गेल्या गावासारखे.

ती मठात जात. नि मठ आणि बंगला या परिसरात नांदत.

मठातल्या प्रचंड पिंपळाचा विस्तार बंगल्यावरती छाया टाकत असे. सळसळत्या पिंपळपानातली वानरे मला चकचकती वाटत आणि बंगल्यातल्या लालभडक 'गुलमोहराच्या तलवारीसारख्या शेंगातली वानरे लढणारी. तिथल्या बकुळीच्या झाडाच्या डहाळ्यांची वाढ अवघडपणे झाली होती. हारीने डहाळीवर डहाळी आडवी वाढलेली. त्यामुळे खालती इतका अंधार होई की, डोईवरल्या सूर्याचा किरणही खाली येऊ शकत नसे. त्या मंद गंध असलेल्या काळोखाच्या गारव्यात एक वानर एखाद्या भर दुपारचे शेपूट सोडून बसलेले असे.

बंगल्यामागे देवबाभळींची झाडी होती. बारीक बारीक नखरेल मिटती-

उघडती बाभळींची पाने पापण्यांनी पसारा स्पर्शावा तशी पाहत. त्यांच्या पानांखाली लहानशा अंतरापर्यंत हवेत सावली पडलेली असे. आणि ती हवेतली सावली हा स्पर्शाचा काहीतरी दृश्यतेची इच्छा करणारा प्रकार वाटे. बाभळींच्या शरीरांच्या निश्चित रेषा हवेत हरवल्यासारख्या वाटत. पिवळ्या फुलांनी नि पोपटी शेंगांनी लगडलेल्या बाभळींवरली गूढ वानरेही आपल्या आकृतींच्या रेषा धूसर करून घेत आणि त्यांच्या अंगावरल्या केसांनाही दृष्टी आली आहे असे वाटे.

बंगल्यातल्या पिंपळावर एक वानरी राहत असे. तो पिंपळ खूप जुना होता. त्याच्या अंगावर खपऱ्याखपऱ्यासारखी राखी रंगाची साल होती. बुंध्यापासून थोडे वरती एक पोपटाचे कुटुंब होते. आबूबरोबर मी पोपटाची पिले धरायला जात असे. पोपटाची जोडी पिलांना चारा आणायला बाहेर पडली आहे हे पाहावे लागे. नाही तर त्यांच्या कोट्यात घातलेली हाताची बोटे त्यांच्या चोचीसारखी होऊन जात. आबू आपली डोक्याची मळकी टोपी काढी, उलटी करी नि त्या कोट्यावर गप्‌दिशी घालायच्या नादात असे. पण प्रत्येक वेळी ती वानरी एखाद्या राखणदारासारखी एकदम अंगावर येई. तिथे तिने कधीच येऊ दिले नाही. पोपटजोडी नि वानरी यांचा कसला करार होता, कुणास ठाऊक.

बंगल्याच्या बाजूने फुटाण्याची झाडे वाढलेली असत. पिवळ्या धमक फुलांनी फुललेली. खालच्या वाटेने जाताना त्या फुटाण्याच्या झाडावर बसलेली वानरे अंगावर फुलघोस फेकीत. एक वानर त्यातली अर्धफुटी कळी खुडून घेई. कपाळावर आपटी. तिचा पट्ट असा आवाज होई. मग ते सारखे तशा कळ्या कपाळावर फोडीत राही.

तिथून थोडे खालती गेले की गंगूचे परडे लागे. परड्याला लागून चोपदारांची वसाहत होती. चहू अंगाने गडद शेंडाने वेढलेली. ती जागा बंगल्यावरून नि बंगल्याखालून वडाकडे धावत जाणाऱ्या दोन्ही वाटांना स्पर्श करीत होती. खालच्या वाटेने गेले की, आत जाताना दगडाच्या दोन अनघड पायऱ्यांवर लाल चिंचेच्या डहाळ्यांची छाया ढळे. वानरांची

ती एक लाडकी जागा होती. वर चढल्यावर गार हिरवी गवतपाती लागत. त्यातून उमटणारी लहानी तांबडवाट वरल्या वाटेलगत असलेल्या उध्वस्त घराला जाई. तिथे भुतासारखी एकटी राहणारी, तांबड्या अलवणातली, कानांवरनं पदर घेतलेली लक्षुम्बाई दिसे. तिचा नवरा मोठा कर्तबगार होऊन गेला होता. तो निघून गेला होता आणि त्याच्या मनातल्या वेतांच्या काही खुणाच मागे राहिल्या होत्या. बांधायच्या घराचा नेटका दगडी चौथरा जमिनीवर अर्धवट अंथरून पडला होता. आता त्याच्या मागे एक एक उलगत चालले होते. लक्षुम्बाई लसणाच्या कुडीसारखी होती. ती किती वर्षांची होती तिलाच ठाऊक. तिच्या वयाचा पारा एका थांबलेल्या ठिकाणाहून किती तरी वर्षे पुढे ढळत नव्हता. लक्षुम्बाई वानरांच्या नातलगांपैकी कुणीतरी वाटे. ती अती तिखट होती. तिच्या हद्दीत आले की, ती कुणाच्याही अंगावर खसकन् येई. कधी दुपारी जावे तेव्हा ती पांढरी सोलीव काठी हातात घेऊन, घराजवळ झुकलेल्या रायबोरीच्या झाडावरल्या वानरांवर धावून जात असलेली दिसे. त्यांच्यावर तोंड सोडीत असे. जेव्हा तेव्हा ती वानरांशी संतापाने बोलत असे. त्यांना "वाद्यांनो, उलथत का नाही?" म्हणून विचारीत असे. पण तिच्या वाद्यांनी तिच्यावर फार प्रेम केले. ती मारायला येई नी ती वानरे पाठीकडून तोंड काढून तिच्याकडे पाहत हसत. वाकुल्या दाखवीत.

खुडुखुडु करून कुठून तरी ती तांबड्या मिरच्या आणून दुरडीत ठेवी. नि ती वानरे त्या मिरच्या मागच्या बाजूने काढून नेत. भुईमुगाच्या शेंगा गिळीत. भाकरी खात. तिची पातळेसुद्धा पळवीत. ते घर इतके उघडे होते की, ते वानरांनी उभारलेले असावे आणि लक्षुम्बाई त्यात येऊन राहिली असावी. ती घरातून निघत नाही म्हणून ती वानरे जणू तिला छळीत. तो छळ तिला कधीकधी असह्य होई. ती रडत थेट आमच्याकडे येई नि आईला नाकातून सारे सांगत रडे.

...आमच्या परसदारी तारी राही. माडीवरल्या लहानग्या खिडकीतून पाहिले की, तिचे केंबळे कौलार, तिथला गोठा, कौलारामागे गडद वाढलेला

हिरवा पोपटी शेंड, त्याहून उंच वाढलेली आडव्या अंगाची बाभळ दिसे. दुपारच्या, खेड्यातल्या शुकशुकाटल्या वेळी कितीदा तरी मला ते दिसे : खिडकीतून पाहावे तर, तारी कौलारामागे जाई. मागेपुढे पाही. हळूच हिरव्या गरद रंगाची, तांबड्या काठाची, खणाची चोळी सोडी. एका वाटीत छातीवरली गोरी तांबूस बोंडे पिळी. ती दुधाने फेसाळलेली वाटी तिथे दगडावर ठेवी. बाभळीवरल्या शेंगा चावत बसलेली वानरी पोटाला चिकटलेल्या पोराला घेऊन खालती उतरे नि सांगितल्यासारखी ती वाटी तोंडाला लावी. मी किती वेळा चोरून याचा अचंबा करीत असे. छेः छेः! ती वानरी कोण होती? तारीचा नि तिचा काय संबंध होता? हे सारखे कसे, का घडत होते? ती दूध पिऊन जाणारी वानरी अजूनही कधीकधी माझ्या स्वप्नात येते. कधी तरी दुपारी तारी आमच्याकडे बोलायला येत असे. तेव्हा मी माडीवरून एवढेच पुसटनिसटसे ऐकले होते की, तारीला फार दूध येत होते आणि उरणारे रोज तिला पिळून टाकावे लागत होते.

...जवळ धोंडूबाई नावाची, पुरुषाच्या कर्तबगारीची एक टणक कोकणी बाई राही. फार फटकळ. तिला माणसातले तसे नात्याचे कुणीच नव्हते... तरी तिचा परिवार फार मोठा होता. तिच्याकडे वसतीला आठदहा मांजरे, चारसहा कुत्री असत. त्यात कुणी तरी आजारी पडत. जखमी होत. नि ती त्यांची फार शुश्रूषा करी. केळकरांच्या कुत्र्याने फोडलेला एक नर तिच्याकडे 'पेशंट' आल्यासारखा जखमेत हळद भरून घ्यायला येत असे.

...शाळेत जाताना दोन्ही बाजूंना जोंधळा दाटलेला असे. जोंधळ्याच्या आतल्या भागात शेंगा कुठे आहेत, वाळके कुठे आहेत, शेंदाडे कुठे आहेत हे सवयीच्या वासाने कळे. जोंधळ्यात शिरावे तेव्हा, वेलावर उकललेल्या शेंदरी शेंदाडापाशी एखादे वानर नेमके फतकल घातलेले दिसे. कुठे एखादे, कोवळ्या दोडक्याच्या शिरा सोडवत थांबलेले असे. पाताळात राहावे तसा त्यांचा जोंधळ्यातल्या अंधारातला वावर वाटे. जोंधळ्यात गेल्यावर ती कुठे भेटतील याचा नेम नसे.

एकदा जोंधळ्यातल्या अंबाड्याच्या फुलात तन्मयतेने डोकावून पाहणारे

वानर मी पाहिले होते. फिक्या पिवळ्या तलम पाकळ्या. तळात मखमली, तांबुस जांभळी पसरण. मध्ये ओले तरतरते केसर. फुलाच्या पाकळ्या फाकून ते इतके काय पाहत होते, कळलेच नाही.

परसातल्या बाळंतलिंबाची मुरकुली पिवळसर पांढरी फुले एक वानर अगदी हलक्या नखस्पर्शाने न दुखवता हवेत सोडीत असे. बापूजींच्या अंगणातल्या डाळिंबाचा तांबडा बहर एका वानराला इतका आवडे की, ते जवळजवळ सगळी फुले तोडून नेई नि झाडावर डाळिंब धरू देत नसे. पमामावशी पडवीत बसली की, समोरच्या बहरलेल्या रानगुलाबावरले वानर तिला फुले फेकून मारीत असे. आणि रुईचे वाळले बोंड फोडून त्यातल्या उडणाऱ्या रुपेरी म्हातारीला धरण्यासाठी, कौलारावरून धावत जाताना खालती सपकलेले वानर, जसे काही झालेच नाही या तोऱ्यात पुन्हा त्याच तंद्रीत राही.

...वडाच्या खालच्या बाजूला मोठ्या दगडी कट्ट्यापाशी एक प्रचंड पिंपळ होता. त्याचा एक फाटा देवाच्या आवारावर गेला होता. देवाच्या फरशीच्या आवारावर उभे राहून त्या फाट्याचे वरचे टोक पाहायचे म्हटले तरी डोळे फिरत, इतका तो उंच होता. तेवढीच एक अशी जागा होती. वानरांना चढायला ती आव्हान देई. कुठेही चढून जाणारी वानरे त्या टोकाला जाण्याचे साहस टाळीत. तिथे आग्यामोहोळे लटकत. ती काढायला एक शेलाटा माणूस कधी कधी दिवसा येई. माशांनी फोडू नये म्हणून कसलेसे औषध अंगाला लावी. नि सहज सहज त्या पिंपळटोकाला जाई. किती तरी वानरे ते त्याचे उंच चढण्याचे साहस टकटक पाहत राहत.

...दूरच्या शाळेतली आमच्या वर्गाची जागा पश्चिमेकडल्या बाजूला होती. खालती अडीच हात मातीची लोणा पाझरणारी भिंत. वरला भाग काळसर रिपांच्या चौकटीचौकटींचा. बाहेर पाहिले की, सारी उंच पांढर दिसे. तिथल्या माजलेल्या रानातून वरती आलेली बाभळीची उमदी झाडे दिसत. पश्चिमेकडे सूर्य ढळला नि खालती येत राहिला की, दादा देशपांड्यांचे शिकवणेही उताराला लागे. चौकटीखालच्या सावलीच्या पट्ट्यात आम्ही बसत असू आणि आमच्या थोडे पुढे, चौकटीवर सपकणाऱ्या उन्हाने

ठिपक्यांची नक्षी वर्गभर पसरे. नक्षीवरला थोडा भाग बाभूळझाडांच्या पालवीने नाजुकपणे हले. देशपांडे डार्विनचा सिद्धांत सांगत असत. आणि त्या नकसकामावरून बाभळीवरल्या वानराची एक सावली हलून जाई.

तेव्हा एक वानराचे कोवळे पिलू बाभळीखाली कुत्र्याच्या तोंडी लागून मेले होते. एक एक वानर खाली उतरे. त्या पिलाला उचलून घेई, हुंगी, निराश होई, वर जाई नि दोन्ही हातांचे तळवे गालावर ठेवून मान खाली घाली. शोक करी. ते विलक्षण होते. माणसाच्या मरणावेळचा जसा तो समजशील शोक होता.

एकदा अंधाऱ्या रात्री मी नि सदा मधल्या वाटेने भुवनेश्वरवाडीला येत होतो. नि पायाप्पाच्या मळ्यापासच्या झाडोऱ्यात एक वानर असेच हातात तोंड घालून विचित्र रडत होते. एकटेच. माणसासारखे.

इतक्या वानरांकडे पाहावे तर त्या साऱ्या वानरातल्या स्त्रियाच दिसत. कमळी सांगे, त्या साऱ्यांचा एकच नवरा आहे. कधी तरी तो दिसे. तो फार मोठा नि माणसाच्याही बायकांना न भिणारा होता.

वानऱ्यांना पोरे होत. ती थोडी मोठी झाली की तो ठराविक दंगल सुरू होई. तो वानऱ्यांच्या मागे लागे नि त्यातली सारी नर पोरे वेचून कडाकड फोडून मारीत असे. हिसकावून खाली फेकून देत असे. फक्त माद्याच तेवढ्या शिल्लक ठेवी. एखादे नर पोर राखण्याकरता चारचार, सहासहा वानऱ्या एक होत. त्याच्या अंगावर जात. ते पोर राखायचा यत्न करीत. एकीकडून दुसरीकडे, दुसरीकडून तिसरीकडे देत वाचवू पाहत. तो दांडगेश्वर किती तरी दिवस त्यांच्याशी झट्या घेई. आणि कधीतरी त्या वानऱ्या अगतिक होत. त्या पिलाला त्याने पिंपळावरून देवाच्या फरशीवर आपटलेले असे. त्याच्या कातडीचा खाली पसरलेला नुसता कागद त्या वरून पाहत. नि मग त्यांचा आक्रोश ऐकवत नसे.

कधीकधी एखादे नरपिलू घेऊन चारसहा वानऱ्या त्या कळपातून दूर देशी राहायला जात. त्या पिलाला वाढवीत. तिकडे त्यांचा दुसरा वंश वाढे.

त्या साऱ्या वानऱ्यांवर तिथे राहणाऱ्या एकट्या नराची सत्ता चाले. त्या

नराला सतत तयारीने राहावे लागे. कुठल्या कळपातला पराभूत नर केव्हा येईल नि सारे ताब्यात घेईल सांगता येत नसे. नवीन आलेल्या नराला आल्याआल्या हुसकावून लावणे तातडीचे असे. ते त्याला एकट्याला करावे लागे. या पुरुषांच्या भानगडीत माद्या कधीच पडत नसत. नर थोडा लटपटला तर त्याचे कळपातून उच्चाटन होई. पण माद्यांचे पाणी नेहमीच ताजे असे.

...आमच्या इथे नांदलेल्या वानरात 'घुंगुरवाला' मोठा होऊन गेला. तो एक अजस्र नर होता. उमा राहिला तर माणसाच्या छातीला लागे. त्यांच्यातल्या थोरल्या थोरल्या माद्याही त्याच्यापुढे पोरींसारख्या वाटत. तो कुठून आला तोच गळ्यात एक पितळी घुंगुर बांधून. म्हणून त्याला 'घुंगुरवाला' म्हणत. तो आला त्याच दिवशी पहिल्या नराचे राज्य संपले. तो भिलवडीच्या वाटेने पळून गेला होता...घुंगुरवाल्याला मोठी माणसेही भीत. त्याने दोन मोठी कुत्री मारली होती. पाबळकरचा हात फोडला होता. आणि त्यात तो बरा झालाच नाही. वडाच्या खालच्या ढापीवर बसल्यावर खालून किशा मुळकाने त्याचे शेपूट ओढले होते. तेव्हा त्याने त्याला भयंकर घोळसले होते. दिगंबरशास्त्र्यांच्या चिंचेपाशी मी एकदा त्याच्यापुढे नाक खाजवले होते, आणि रागारागाने तो देवघरापर्यंत माझ्या पाठी पळत आला होता. मी घाबरून तिथल्या तीर्थाच्या कुंडात उडी घेतली होती. आणि अंगणात वाळत घातलेल्या शेवयांवर आल्यावर दरडावले म्हणून त्याने काकूला मक्याच्या कणसाचा बुरकुंडा फेकून मारला होता.

इतके असले तरी त्याच्याविषयी मला जवळीक वाटे.

तो एकटा डगरीला जाई नि नदी उष्टावून पाणी पीत असे. पाण्यात आपले रूपडे पाहत असे. मी वरून पाही नि इच्छी: त्याला सुसरीने नेऊ नये.

देवाकरता वडाखाली मोटरी येऊन लागत. माणसे उतरल्यावर घुंगुरवाला बंद काचांतून मोटरीत खुशाल डोकावत उभा राही. जसे कुणी त्याला तिथे तपासणीसाठी ठेवले होते. तो मोकळ्या आवारात उभा राही नि कुत्रीच त्याला भिऊन राहत. त्याला एक आरशाचा तुकडा मिळाला होता. देशपांड्यांच्या भिंतीवर तो येई नि दुपारच्या वेळी आमच्या पडवीत

किरण पाडीत असे. पुष्कळ दिवस तो झोत कुठून येई ते कळतच नव्हते.

पण घुंगुरवाला पुढे फार बिघडला. त्याच्या खोड्या वाढल्या. वानराच्या गुणांच्या व्यासीत येणाऱ्या खोड्यांचे काही नव्हते. पण पुढे त्याने एकट्या-दुकट्या बाईला अडवायला सुरुवात केली. सकपाळाच्या शांताशी अतिप्रसंग करायचा यत्न केला. त्याला जयाने गोळी घातली होती. कच्या नेमाने मारलेली गोळी त्याच्या दंडात रुतली होती. ते दुःख अनावर झाल्याने तो एक कर्तबगार पुरुष दोन्ही हात गालांवर ठेवून डोळ्यातून पाणी काढीत होता. केविलवाणा होत होता. देवघराच्या भिंतीवर येत होता. खालती देशपांड्यांच्या कठड्यावर उतरत होता. त्याचे दुःख पाहवत नव्हते. देशपांड्यांच्या भिंतीवरून तो अंगणांत आला. आईने वाटीत ठेवलेले पाणी प्याला नि तिथेच त्याने मान टाकली. त्या वेळी तिथल्या साऱ्या वानऱ्या खाली उतरून आल्या होत्या...ते माझे एक लाडके उमदे जनावर मरून गेले होते...

वानराचे मरण मी कधी तरी, क्वचितच पाहिले होते. अपघातीच. पण एखादे वानर आजारी झाले आहे, म्हातारे झाले आहे, खितपते आहे असे कधी दिसले नाही...

माळवाडीच्या अलीकडच्या उतारावर भेटलेले वानर आजही माझ्यापुढे उड्या मारत जाते आहे असे वाटते. मी त्या चांदण्या रात्री येत होतो. अपरात्रीचे कधीकधी चांदणे इतके असते की, त्या चांदण्याचीही भीती वाटायला लागते. तसले चांदणे तुडवीत मी एकटा वाट चालत होतो. गारठा होता नि अंगावर पांघरूण घेतले होते. माळवाडीच्या अलीकडच्या उतारावर आलो तेव्हा रानातल्या तुरीतून एक आकृती पुढे येत होती. तो एक मोठा वानर होता. अशा अपरात्री तो उठला होता कशाला, जाणार होता कुठे, करणार होता काय, न कळण्यातले होते. तो अंगावर आलाच तर अंगावरले पांघरूण त्याच्या तोंडावर टाकायचे नि त्याचा गळा दाबून गुदमरवायचे इथपर्यंत मी पोचलो होतो. तरीही त्या एकटेपणी शरीरावर शहारा आला होता. मी थोडा थांबलो तसा तो क्षण दोन क्षण वाटेवरच थांबला नि

माझ्याकडे मागे पाहत, दुडक्या दुडक्या जलद गतीने पुढे दिसेनासा झाला. आईला सांगितल्यावर म्हणाली, "अरे, तो मारुती आला होता रक्षण करायला. असा निशाचरासारखा कशाला येतोस ?"

...घरातून माणूस पार व्हावे तसे एक वानर आमच्या परसदारची सैलसर दोरी सोडून पुढे जात असे. आई म्हणे, "गेला बघ लडदू...."

...आजारीपणात मी पडवीत वरती तोंड करून पडलेला असे. कौलाराच्या छिद्रातून आकाशाचा निळा पारा उन्हाच्या वेळी चमचमे. एखादे वानर आपले दोन डोळे त्या छिद्रात लावून माझी तब्येत पाही. नि मग ती सारी छिद्रे मला आढळायला आलेल्या असंख्य वानरांच्या डोळ्यांचीच झाली आहेत असे अतिशय वाटे.

लहानपणी आपण वानर म्हणून का जन्मलो नाही याची सूक्ष्मशी खंत माझ्या मनात होती. वानरांच्या निर्भर जीवनाचे विलक्षण कडे तेव्हा वाढता वाढता माझ्याभवती पडलेले होते...संध्याकाळ होत आलेली असे. अंधार भरत येई. घरातला गार अंधार, घरांवर वरल्या झाडांचा अंधार आणि झाडांवर आभाळातून उतरत येणारा अंधार...अंधारावर अंधार... ही जशी दिवसाची कपऱ्याकपऱ्यातली झोप असे...दूरभूर कुठे तरी हरवलेली झोप पाखरासारखी डोळ्यातून भरे. थोरली आई कुणाकुणाच्या नावाचा एक घास तोंडात भरवी. पानातच हळुवारपणे हात धुवी. आपल्या-जवळच्या दुलईत गुरगट्टून घेई. अंगभरच्या गुंगीवर मऊ हात फिरवी. प्रेमाने थोपटी आणि अंधुकसे सांगत राही :

"बरं का, आपली आणि त्या मोट्ठ्या कुणाची प्रत्येक जन्मी गाठभेट होते आहे...तो गोकुळात कृष्ण म्हणून आला तेव्हा आपण गोपाळांच्या मेळ्यात होतो...तो रामराजा होता त्या वेळी आपण त्याच्या वानरांच्या फौजात होतो...

तुम्ही अवतरले गोकुळी आम्ही गोपाळांच्या मेळी
तुम्ही होते रामराजा आम्ही वानरांच्या फौजा..."

मृगजळाचा यक्षघराला

थोरली आई संध्याकाळी कोकणातल्या खेड्यातल्या कथा सांगत असे. तिथले काजू, तिथली केतकीची बने, तिथले डोंगर, तिथला रंगबहर, पाउलापाउला ओलांडून जाणारे नाग...तिच्या कथेतली एक कोकणी बाई कुड्यापाशी बसल्याबसल्या तांब्याने तांबडा नाग ठेचीत असे.

कधीकधी थोरली आई बिब्बे घेई. दिवलीवर धरी. त्यांची काळी चकाकती शेवते एका दगडीत धरी. एखादा बिब्बा मध्येच फोडी. त्यातून पांढरे शुभ्र वी बाहेर पडे. ते कोकणचे खाणे खायला देई. ती गोडांबी इतकी गोड लागे की, ऐकता ऐकता रूपरंगाने संवेदनात राहू आलेले सारे कोकणच्या कोकण खाऊन टाकावे वाटे. कोकणातल्या रात्रीविषयी ती किती तरी ऐकवीत असे.

एका सकाळी मी उठलो तेव्हा, कुठल्या कोकणातल्या खेड्यातून रात्री जाऊन आलो. भास नि वास्तव यांच्या सीमारेषा एकमेकातून ऐलपैल केव्हा होतात कोण जाणे...पण त्या रात्री कोकणातील एका खेड्यातून जाऊन आल्याचे स्मरण हुंगताना अजूनही मनभर प्रसन्न होते. जुईफुलांचा अर्क हुंगावा तसे. धूसर, निर्भर, 'आहे नाही' अशा खेड्यातल्या वस्तीत

मी उतरलो होतो. जुन्या स्मृतींसारखे ते सारे एकसारखे सूक्ष्मसे थरथरत होते. ती कापूरधूसरता गडद होत होती. रात्र उतरत होती...कुठे रानवणवे उभारत होते. मागे पाहावे तर रंग पेटत येत होते. तो दिसत्या अंतराचा आडवा तोल उभा राहत होता. कुणी बोलत होते नि नव्हते. त्या मंतरल्यासारख्या मुलुखातून मी दूर धावत जात होतो. मागे पाहत होतो. ते सारे अंगभर होत होते. अंगभर होताच्या गतीने उजेडताच्या घरी आणून सोडीत होते. वाटोळ्या गतीच्या वाटेने. त्या खेड्यातल्या अबोध गूढतेला जाणारी वाट हवेतून वाटोळी पार होणारी होती. आणि एकदाच जाणीवेखाली आलेली वाट मन पुन्हा किती तरी दिवस शोधीत होते...

चंद्रघरी जाणारी वाट शोधायची ओढ थंडीच्या दिवसात लागे.

उन्हं खायला मी सकाळी वडाखालती येत असे. वडाच्या थोडे पुढे एक जुना सळसळता पिंपळ होता. त्याच्या तळाशी एका काळ्या अनघड खडकावर उमटलेली दोन नाजुक पावले होती. त्यांवर नेहमी कुणीतरी पाणी घातलेले असे. फुले शिंपलेली असत. भवती गाळाची तांबडमाती पसरलेली. त्या मातीत मऊलूस गाळलेल्या मातीची गोल लहानगी वर्तुळे उमटलेली असत. पुराच्या पाण्यातल्या भोवऱ्यासारखी आपणातच पाहणारी. दादा सांगत ती 'भुइमोराची भोके' म्हणून. पण थोरल्या आईचेच खरे वाटे. ती 'चांदोबाची घरे' असल्याचे थोरली आई सांगे. "रात्रभर चालून जागून दमलेला चांदोबा त्या वाटेने जमिनीखालती झोपायला जातो. एखादा टोकदार रेशमी धागा त्या घरात मातीचा पोत न दुखवता अलगदसा घातला तर चांदोबा नाकात गुदगुल्या झाल्यासारखा वरती येतो" हे लिनीचे शहाणपण. पण ती मातीची नाजूक वर्तुळे पुसूनच जात नि चंद्रवाट हरवल्याची हुरहुर उरे...

लिनी विलक्षणच होती.

श्रावणातल्या तुरळक पाउससरीतून धावत ती घराला येई आणि भिजत नसे. ती म्हणे, "या सरी काही एकमेकींना लगटून नाहीत येत." सरीसरीतून न भिजता, भिजवता जाणारी एक नागवळणी वाट असते ती

तिला मिळे. मी त्या सरींतून धावून बघे नि भिजून चिंब होई. लिनी चिवचिवल्यासारखी बोले. ती बागेपाशी येई. तिथे विलायती चीक उफाडलेला असे. त्यातले एखादे गोलमोल पान खुडून घेई. मधोमध फोडी. पुन्हा आडवे फाकी. मधल्या अंतरावर एक चिकाचा पडदा उभा राही. नि वरल्या निळ्या आभाळाचे लख्ख निखळ बिंब त्या तरत्या पारदर्शक चिकाच्या पडद्यावर पडे. ती सांगे, "आभाळात जायची वाट यातून जाते."

पण आभाळाला जायची वाट शिडीनेच गेली पाहिजे असे माझे नि वृंदावनचे मत होते. बंगल्यातल्या राधाकृष्णाच्या देवळाच्या भिंतीला लागून भुयाराच्या खिडकीपाशी एक उंचच उंच शिडी उभी असे. ती नेहमीच्या शिडीहून खूपच उंच होती. त्या शिडीला आणखी शिड्या बांधू तेव्हा आभाळात जायचे होते.

...विलायती चिकापलीकडे देवाची फुलबाग लागे. बागेतील विहीर फार खोल होती. तळाशी काळोखाचे पाणी होते. कुठे खोल उकरावे तिथे पाणी लागते. आपले सगळे गाव पाण्यावर टाकलेल्या मातीच्या थरांवर वसलेले आहे. आणि गावाखाली पसरलेल्या अपार पाण्याला त्या विहिरीतून जाणारी वाट आहे अशी माझी समजूत होती. त्या वाटेने, त्यावेळी गावाखालून पोहून यायची उत्कंठा होती.

उत्कंठेची वाट कुठे कुठे वळते...

आमच्या घराच्या पश्चिमेकडच्या भिंतीकडे नेहमी पावले वळत. ती पांढऱ्या गाऱ्याची भिंत फार रुंद होती—मधून जिना निघेल एवढी. आणि कितीतरी वर्षे कोसळत होती. जुन्या पिढीतले कुणी ढासळत असावे तशी. लपके पडत आणि त्यात खूप काही सापडे. त्या भिंतीपाशी मी उगीचच शोधत राही. एकदा मला एक तीनरंगी, इंद्रधनुष्यासारखा, अर्धवर्तुळाकार तुकडा सापडला होता. राजस्तानी स्त्रिया हातात घालतात तसल्या काकणाचा. दादांनी आदल्या दिवशी मला आभाळात इंद्रधनुष्य दाखविले होते. त्यांना तो तुकडा कसला म्हणून विचारले तर म्हणाले, "अरे ते इंद्रधनुष्य येत होते आपल्या इथे झोपायला. हात कशाला लावलास? आता

त्याला आभाळात जाता येणार नाही.” दुखवलेल्या चिमणीच्या पिलाला हात लावला की, त्याला चिमण्या पुन्हा आपल्यात घेत नाहीत. चुकलेच· होते. त्या लहान होऊन झोपू आलेल्या इंद्रधनुष्याला आता आभाळात भरारत जाता येणार नव्हते. त्यात जीव भरणार नव्हता. आमच्या भिंतीतून आभाळात जाणारी ती इंद्रधनुष्याची वाट हवेतून मला नेहमी जाणवून जात असे.

...हवेतून जाणाऱ्या वाटांत देवाघरी जाणारी एक वाट होती.

थोरली आई हरवल्याची एक आठवण आहे. तिला नेताना मी पाहिले होते. पाराच्या कोपऱ्यावरून खाली डगरीकडे. दादांनी सांगितले होते, ती आता देवाघरी गेली आहे. तिथे तिला डगरीला ठेवले आहे. पलीकडून देवी येईल नि तिला घेऊन जाईल.

संध्याकाळी देवाला आल्यावर आईची नजर चुकवून मी डगरीकडे धावे नि त्या जागेकडे पाहत राही. तिथे तरवड नि निळिंवीच्या जाळ्या झुकलेल्या असत. वरून एक कोरडी घळ वाहत येऊन तिथे थांबे. त्या व्याकुळ संध्याकाळी थोरल्या आईची अतिशय आठवण येई. समोर नदीचा मोठा डोह पसरलेला असे. मी पलीकडे नजर टाकी. ती थोरल्या आईला घेऊन जाणारी देवी, पाण्यावरल्या पाउलवाटेने अलीकडे येते का ते पाहत राही. ती दिसली की, लगेच मी तिला, थोरल्या आईला आणून द्यायला सांगणार होतो. पण आई लगबगीने मला तिथून घेऊनच जाई.

कुठल्या उदास संध्याकाळी, दादांच्याबरोबर डगरीवर यावे तेव्हा मी पाण्याखालती असलेल्या देवळाच्या, वर आलेल्या दगडी गरुडाकडे बघत बसे. मला आणखी एक वाटत होते. ती पाण्यावरल्या पाउलवाटेने येणारी देवी त्या पाण्याखालीही राहत असेल. तिची पाण्यावरली पाउलवाट मला पाण्यावरती उमटल्यासारखी वाटे. नि तीवरून धावत जावेसे मनात येई...

त्या दिवसात ते दूरवरचे गाव माझ्या सारखे स्वप्नात येई आणि जागेपणातही तिथली ओढ वाटे. तिथल्या परसदारचा रानगारवा मला मोहरवायचा. तिथले लाघव वेडे करायचे. तिथली लाल कर्दळ कुरवाळायची.

तिथे जायचा वेत कितीतरी आधी घरात घाटत राहायचा आणि आग-गाडीतून जायचे असे. झोपेत असतानाच एकदा मी तिथे आलो. घरातली झोप तिथे पुरी झाली. उठलो तो पिवळे धमक उन्ह सांडले होते चहूकडे. तिथे जायचा बेत घरात टरत असल्याचे माझ्या कानांवर नव्हते. मी आगगाडीत बसलो नव्हतो. येताना लागणारा नवा देश खिडकीतून डोकावून पाहिला नव्हता. पाखरू डोळे मिटून उडून यावे तसा जणू आलो होतो. कसा आलो होतो, कळलेच नाही. इतक्या लवकर आणणारी जवळची वाट दादांना विचारली, पण त्यांनी सांगितली नाही. घरी परतल्यावर दादा, आपण एकटेच तिथून त्या वाटेने जाऊन आल्याचे सांगत आणि मला एकदम केव्हाही दुखवीत. कधी तरी तिच्या शोधात असताना, एका दुपारची, परसदारच्या रानगारव्यातून त्या दूरच्या मृगजळातल्या यक्षघराला जाणारी वाट मला एकाएकी जाणवली. ती निघाय्रची फक्त तिथून. पण पुढे गुप्त व्हायची नि एकदम त्या घरी निघायची. ती क्षणाएवढ्या अंतराची वाट एकदाच विलक्षणपणे उत्कटतेत उतरली नि हरवून गेली.

...येताना अनेक जिवलग वाटांना जायचे राहून गेले. अनेक जिवलग वाटा हरवल्या.

...हरवलेल्या वाटांच्या आठवणींना जाणारी वाट आता हरवू नये.

शून्या
अलबीची
माणसे

श्री. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम...४२०२१..... विषय ...निबंध.....
क्रमांक ...२८८५..... बोर्ड वि ...ठाणे...

....उंबरातली काळी सोनेरी पाखरे खाल्याने डोळे येत. सुजत. आणि दिवसाही उघडता येत नसत. मग आई मला हलके घरून मोरीपाशी घेऊन येई. ऊनसर पाणी पापण्यांच्या कडांना लावून त्या भिजवी. त्या न दुखवता सोडवून, दिसायला लागेल असे करी.

पण डोळे आल्यावरचे थोरल्या आईचे औषध विलक्षणच होते. दोनदोन दिवस ती अंधारातच बसायला लावी. ऐकले नाही तर डोळ्यात फूल पडून दिसणार नाही, असा धाक दाखवी. नि रात्रीही कंदिलाऐवजी करंजेलाचे थंड दिवे लावून घरात जेवणे होत.

दिवसाच्या अंधारात बसून राहायचे माझे एकाकीपण हलके व्हावे म्हणून आई, "माझे वाघळ काय करते आहे" असे सौम्य हसत मला विचारी. आणि वडाला टांगून घेणाऱ्या वाघळांसारखे आपलेही एक वाघळ झाले आहे असे वाटून माझी भीती उलट मोठी होत जाई. डोळे आल्याचे दुःख वाघळे नेहमी कसे सोसत असतील, समजत नसे.

पण वाघळांचा दिवस रात्री उगवतो असे आई सांगे.

रात्रीचा दिवस असलेली ती विक्षिप्त वाघळे मला उगीचच सारखी आठवत राहत. रात्री त्यांना कसे दिसत असेल यावर मी विचार करत बसे. नि त्यांचे दोन डोळे आपणाला मिळाले तर ते हातात घेऊन, काळोखातही दिसत कसे चालता येईल ते मी मनात चालून पाही.

आमच्या घरासमोरच्या वडाच्या दाट पानांच्या हिरव्या छताला अगणित वाघळे उलट्या, मिटलेल्या छत्रीसारखी लटकलेली असत.

वडाच्या वरच्या पानावळींकडे मी मान अवघडेपर्यंत पाहत राही. उंदरासारखे तोंड. उभार पसरट कान. मागे वाघाच्या पट्ट्यातल्या एका छटेसारखा केसाचा उमदा रंग. दोन्ही बाजूंनी आलेली तेलकट काळीभोर नख्या असलेली पंखे मागे घेऊन ती निपचित डोळे मिटून डुलक्या घेत असत. इतक्या उंच अंतरावरूनही त्यांच्या पोटांचा भाता हलताना दिसे. आणि त्या इतक्या पोटांचे भाते खालवर होत असताना, वडाखालच्या भरून राहिलेल्या निळ्या पोकळीवरही आपणाला न कळणारे काही परिणाम होत असतील असे वाटे.

उंच दुपार गावात पसरून राहिलेली असे. पांढरी फकफकीत दुपार. सूर्य माथ्यावर आलेला असे. उभ्या आटोपशीर झाडांच्या सावल्या पडेनाशा होत. सावल्यांनाही आपले अंग मिळायचे असे.

पण आपल्या अंगाहून वरला विस्तार कितीतरी मोठा असलेल्या वडाची तेवढी खालती दाट सावली पडे. मधून उन्हाचे ठिपके. वडाखाली जाऊन बघावे तेव्हा, मधला एखादा तुकडा त्या संथ नक्षीचा आकार पालटत चालताना दिसे. वडावरचे वाघळ जागा बदलत असे.

दुपारच्या शांततेचा पातळ तुकडा पलटवणारा वाघळांचा आवाज चिरकत येई. आणि एखादे वाघळ, दिसत नसतानाही आपली जागा सोडू लागे. जागा बदलायची त्यांची एक ठराविकच रीत होती. पुराच्या ओल्या गाळ-मातीतून चालताना एक पाय वरती काढायचा नि दुसरा टाकायचा, तशी. पहिले पंख लांबवून पुढे रुतवायचे नि मागले पंख सोडवून तिथे आणायचे.

त्यांचे जागा बदलायचे खेळ सारखे सुरू असत. अंग अवघडले म्हणून. उन्हाची तिरीप आली म्हणून. पण काही वेळा तो खेळ विचित्र वाटे. एकाने जागा बदलली की, पुढले वाघळही चळवळायला लागे. आणि ती रांग दूरवर लांबे. एका वाघळाच्या दिशेने बऱ्याच बाजूंनी वाघळे यायला लागत. एकमेकांना ओचकारत. चिरकत. त्या गोंधळात ते मधले वाघळ चाचपडत उठून दुसरीकडे पिंपळावर नाही तर चिंचेवर जाऊन पडे. आणि उरलेल्या वाघळांना त्याला हुडकता येत नसे.

उन्हाच्या वेळी थोरली आई स्वतःला दोन्ही बाजूंनी पदराच्या शेवानी वारा घेई, तसे एखादे वाघळ स्वतःला टांगून घेतलेले असताना दोन्ही पंखांनी वारा घेताना दिसे. कधी एकच पंख हलवूनही ते वारा घेत राही.

मोजता न येण्याइतक्या त्या वाघळांच्या जागा जवळजवळ ठरलेल्या असाव्यात. त्यांना जोडणारी रेषा हवेत काढली असती तर ती हवेच्या कागदावरली रेषाकृती, नेहमी तिच्यावरूनच छापून काढल्यासारखी निघाली असती.

वाघळे अगदी जवळून पाहता आली ती देवाच्या आवारातून वरती आलेल्या उंबरावर लटकणारी. दोन वाघळे जोडीने नेहमी तिथे असत. वडापुढची तांबडमाती संपली की देवाच्या आवाराचा दगडी बांधीव तट लागे. खालती खोल डोळे फिरवणारे फरशीचे आवार. दादांच्याबरोबर जीव एकत्र करून मी त्या वाघळांना बघायला तटावर येत असे. माझ्या कुठल्याही उत्सुकतेत दादांचा उत्साह येऊन नेहमी मिसळे.

आणखी एक वाघळ दिवटीच्या मळीतल्या फणसाच्या झाडावर राही. आमच्या गावातल्या त्या एकुलत्या फणसाला ओळखणारे वाघळ इतरांहून वेगळे असले पाहिजे.

वाघळांच्या कळपातून ती वेगळी का राहत होती, त्यांची भांडणे होती की त्या कळपातल्याहून ती अधिक शहाणी होती, हे न सुटणारे प्रश्न होते.

वाघळांची सर्वांत मोठी वसाहत वडाच्या विस्तारावर होती. उरलेली वाघळे वडाखालच्या पिंपळावर, जवळच्या चिंचेवर आणि काही डगरीच्या

उंबरझाडांच्या अंधारात राहत. वाघळांना बाभळीवर लटकताना मी क्वचितच पाहिले. बाभळीच्या काट्यांनी पंख फाटण्याची भीतीही त्यांना वाटत असेल.

...संध्याकाळी हळूहळू वाघळांच्या जगाला जाग येऊ लागे. ती पंखे झटकत. त्या आवाजातून त्यांच्या पंखांच्या वजनदारपणाची जाणीव होई. एक एक उठून वडाला, गावाला फेरी मारायला सुरुवात करी. थोड्या वेळाने नदीवर डगरीला जाऊन थांबले की वाघळेच वाघळे दिसत. प्रकाश मंद होत चाललेल्या त्या वेळी डोहातल्या आभाळात वर गिरकत राहिलेल्या वाघळांची अतिशय स्वच्छ प्रतिबिंबे उमटत. आणि डोह म्हणजे आभाळात उडणाऱ्या वाघळांचे काढलेले एक मोठे चित्र होई.

एक एक वाघळ मुळी न हलणाऱ्या डोहाच्या पाण्याचे पान मधूनच फाडी. ती वाघळांची पाणी प्यायची वेळ असे. वाघळ पाण्याच्या पृष्ठापाशी येई आणि झाप मारून पाण्याचा घुटका घेऊन जात असे. सगळी वाघळे तसेच पाणी पीत.

आणि मग डोहावरली वाघळे, उरलेल्या दिवसाच्या प्रकाशासारखी मोठ्या कळपाने पलीकडल्या भुवनेश्वरीच्या देवळाच्या कळसाच्या दिशेने झपाझप निघून जात. कुठल्या तरी फळांच्या बागांना. भिलवडीकडून येणारा वाघळांचा दुसरा थवा त्यांना कळसापाशी आभाळात भेटताना खूपदा दिसे.

वाघळ विमानागत जाते असे शिंगटे नाना सांगे. आमच्या इथली वाघळे आंब्याच्या दिवसात, रात्रीत रत्नागिरीला जाऊन परत येतात हा त्याचाच शोध होता. ती रात्री वडावरून हलली तरी त्यांच्या ठरलेल्या ठिकाणी दिवस उगवायच्या आत आलेली असत. एक एक वाघळ, जणू आपण रात्री कुठे गेलोच नव्हतो अशा थाटात येऊन वडावर लागत असताना दादांनी मला पहाटे उठवून कितीदा तरी दाखवले होते. ती येऊन वडावर लागत असताना अंथरुणातही आपोआप कळत असे.

वडाखाली वाघळांनी चोथून टाकलेल्या डाळिंबांच्या बिया अधूनमधून पडलेल्या दिसत. आमच्या जवळपास डाळिंबांची इतकी झाडे कुठे

नव्हतीच. त्यांना कुठे तरी त्या डाळिंबांच्या बागा सापडलेल्या होत्या. कधीकधी खारकांच्या बियाही त्यांच्या तोंडातून खाली पडल्याचे नानाने पाहिलेले असे. आणि वाघळे त्या रात्री परदेशातल्या खारकांच्या बागातून आल्याचे तो ठरवी.

झाडावरले अस्सल फळ पहिल्यांदा वाघळानेच उष्टावलेले असे. वाघळाने खाल्लेला आंबा, पेरू लगेच ओळखता येई. पोपट आणि दुसरे पक्षी वरच्या बाजूवर कुठेही टोच मारून फळ खात. पण वाघळाने ते फळाच्या तळापासून उलटे पोखरत आणलेले असे. फळाची जाणकारी वाघळाइतकी कुणालाच नाही असे नानाचे मत होते.

वाघळे कौलारू घरांच्या आढ्यावर फिरणाऱ्या उंदरांना रात्री घेऊन जात. आणि पावसाळ्यात उमलून आलेल्या पिवळ्या वेडकांवरतीही ताव मारत. रात्री वडावर बॅटरीचा झोत मारून पाहिला म्हणजे वाघळांचा दिवसा भरणारा बाजार उलगून गेलेला दिसे. कधीतरी एखादी वाघळ बरे नसल्याने चिकटून राहिलेली असे तेवढीच.—दसऱ्याला दुपारी निघणाऱ्या देवाच्या पालखीला ओवाळायला न जाता घरीच राहिलेल्या एखाद्या आजारी सुवासिनीसारखी.

...थोरल्या आईच्या गोष्टींचे तेव्हा एक वेगळे जगच होते. त्यावेळी प्राणी आणि पक्षी यांची लढाई सुरू झाली होती. एकट्या सापडलेल्या पक्ष्याला प्राणी मारून टाकत होते, आणि एकट्या प्राण्याचीही पक्ष्यांच्या थव्यात तीच गत होती. पण त्या युद्धात वाघळांचे दोन्हीकडून साधत होते. पक्ष्यांच्या हल्ल्याच्या वेळी ते आपले पंख त्यांना फडफडून दाखवत होते. उडून दाखवत होते. आपण पक्षीच असल्याचे पटवून देत होते. आणि प्राण्यांच्या तावडीत सापडले तरी त्याचे बिघडत नव्हते. प्राण्यासारखे, त्याला चोचीऐवजी तोंड होते. स्तनेही होती.

प्राणी आणि पक्षी यांच्यामधले चमत्कारिक मिश्रण असलेल्या त्या वाघळांना इतर पक्ष्यांप्रमाणे कोटी, घरटी करायची यातायात नव्हती. काळोख शोधून कुठेही लटकावे इतके त्याचे राहणे सोपे होते. आणि वाघळ अंडीही

घालत नव्हती. वर निरखून नजर टाकावी तेव्हा कितीतरी वाघळातल्या माद्यांनी, वानरीसारखे एक एक पिलू आपल्या उराशी घट्ट धरून ठेवलेले दिसे. चटकन् पाहताना ते, त्या वाघळांना एखादे काळे टोपण बसवल्या-सारखे वाटे. पिलाचे तोंड वाघळीच्या तोंडाशी अगदी एक झालेले असे. तिच्या तोंडातून येणारा अन्नरस बरोबर त्या पिलाच्या तोंडात जाई. त्यावरती ते वाढे. तिथून ते थोडे खाल्ती सरकून तिच्या स्तनांनाही लुचे. दूध पिई.

पक्ष्यापासून दुसरा पक्षी होत होता. प्राण्यापासून तसलाच दुसरा प्राणी तयार होत होता. असे सारखे चाललेले होते.

किती तरी पक्ष्यांचे, प्राण्यांचे जन्म होताना मी पाहिले होते. अंडे घालताना. त्यातून पिलू बाहेर फुटताना. आमच्या घरामागे म्हशींना सारखीच रेडके होत आणि पाठीमागच्या शिंगट्यांच्या पडकात खड्डा काढून कुत्र्या वीत असत. पण बायकांच्यासारख्या, वाघळाही विताना कधी दिसल्या नाहीत. त्या रात्रीच वितात असे नाना म्हणे; सांगे की, वाघळीला एका वेळी एकच पिलू होते. तिची पिलू बाहेर यायची जागा, ती लोंबकळत असताना वरच्या बाजूला असते. पिलू बाहेर यायची वेळ तिला आपोआप समजते आणि वाघळी आपल्या पायांनी ते काढून घेऊन छातीशी झेलते.

वाघळीच्या पोटाला चिकटलेल्या लहानशा पोराएवढी, काळ्या तेलकट तकतकीत पंखांची किती तरी पोरे वडाच्या पानांनी झाकोळून गेलेल्या काळोख्या भागात शेणकुटे लावल्यासारखी डसून राहिलेली दिसत त्यांचे आश्चर्य वाटे. आईबाप नसल्यासारखी ती केविलवाणी वाटत. इतक्या सगळ्यांच्या आया मेल्या की काय कळत नसे. त्यांना त्या अंधारात कुणी-तरी कुणीतरी सारखे दगड मारून उठवीत. खूपदा ती दगड मुकाट्याने खात. आणि फारच झाले तर उठून एक आंधळी चक्कर मारून येत. त्यातले एखादे पोर चुकून आमच्या घरात शिरे. माजघरातल्या सौम्य अंधारात भिरीभिरी फिरू लागे. मग थोरली आई 'ही कुठून चुकली पाकोळी' म्हणत तिला न शिवता घराबाहेर घालवी. पाकोळ्या म्हणजे वाघळीचीच पोरे हा माझा जुना समज होता. पाकोळी दिसते तेवढ्या

आकाराहून मोठी न होणारी, वाघळासारखीच पण वेगळी जात आहे हे थोरल्या आईने कितीही सांगितले तरी खरेच वाटत नसे.

...आमच्या नदीचा घाट उतरताना उजव्या हाताला दुसरा, विरूपाक्षाचा बुरूज लागे. त्यावर आटोपशीर अंगाचे एक उंबराचे झाड छाया ढाळी. आणि त्या बुरुजावर कळकट काळ्या गोणपाटाच्या, तणावा देऊन बांधलेल्या झोपडीत शंकऱ्या तांबट वर्षानुवर्षे राहत असे. त्याचा रंग तेलकट, घाणेरडा काळा होता. त्याच्या पायातले रक्तरस सुकून त्याला त्या चिपाडांनी चालायला यायचे बंद झाले होते. कधीच आंघोळ नसल्याने केसांचे पिवळट, भुरकट लपके झालेले होते. त्याच्या नाकातून सतत पिवळी नाळ वाहत असे. त्याला भयंकर विड्या ओढायला लागत. सगळे व्यवहार तो तिथेच उरकत होता. आणि तरीही नदीपुढे उघडलेला हिरवा प्रदेश बघत तो जगला होता. त्याच्याभोवती असलेले एक कडे मला नेहमी भीती दाखवत असे. तो कधी तरी नुसते तारवटलेले डोळे झोपडीबाहेर काढी. नदीचे पाणी चढायला लागले की, त्याच्यापेक्षा गावच्या लोकांनाच त्याची अधिक काळजी लागून राही. बुरुजाला पाणी येऊन लागेपर्यंत तो देवळातल्या देवासारखा हलायला तयार नसे. त्याच्या झोपडीच्या कळकाला, गोणपाटाची झोळी करून, त्याची पालखी वरती वडापाशी आणली जाई. आणि पावसाळाभर त्याचा मुक्काम तिथे पडे.

पण तो घाणेरडा शंकऱ्या वाघळाचे तेल काढत असल्याबद्दल प्रसिद्ध होता. त्याच्याजवळ एक हिरवाकाळा उभा शिसा होता. त्यात वाघळाचे औषधी तेल ठेवलेले असे. संधिवातासाठी ते तो कुणालाही थोडेसे काढून देई आणि वाघळ मारून मागत असे. शंकऱ्याचे तोंड वाघळासारखेच होते. तो गेल्या जन्मी वाघळ असावा आणि पुढल्या वेळी त्याच जन्माला जाईल असे वाटे. त्याच्या झोपडीची दोन्ही बाजूंची पलखे वाघळाच्या पंखासारखी दिसत. आणि स्वतः शंकऱ्या वाघळाच्या मधल्या भागासारखा. शंकऱ्या आणि त्याची झोपडी मिळून एक प्रचंड वाघळच होते. तो मेल्यावर, इतकी वाघळे मारण्यापेक्षा त्याचेंच खूप तेल निघेल असे वाटे.

...गावातील शांत दुपारी कुणीतरी बंदुका घेऊन येत. आणि वडावरल्या वाघळांवर आवाज टाकत. आवाजाने भेदरूनच कितीतरी वाघळे पटापटा आवारात पडत. वाघळांचे सगळे आंधळे जग जीव गोळा करून आभाळात उघळले जाई. आभाळातल्या उन्हात ती पंखे हलवत राहत. त्यातली पुष्कळ वाघळे मठातल्या पिंपळाकडे जात. काही डोहापलीकडेही. पण त्या त्या रखरख उन्हात त्यांना भोवंडून येई. ती लगेच कुठे ना कुठे चिकटू लागत. पुन्हा त्यांच्यावर आवाज निघत.

पोटातली अर्धवट तयार झालेली पिले बाहेर पडून वाघळा गाबडत. त्यात छातीशी लहानसे जिवंत पोर घट्ट चिकटून घेऊन, गोळीने चिंधड्या होऊन खाली आलेली वाघळ मी पाहिली होती—तिच्या रक्ताच्या भळभळत्या आठवणीने वडाखालचे आवार नुसत्या रक्ताच्या लाल पुराने भरून येते आहे असा मला भास होई.

पडलेल्या वाघळांचे पाय धरून ती एका पोत्यात भरली जात. त्यांचे दोन्ही मजबूत पंख पसरून पाहिले की केवढे लांब वाटत. आणि त्यांची,माणसासारखे एकसारखे बारीक दात असलेली, रक्तबंबाळ उघडी जिवणी बघवत नसे.

शंकऱ्यासारखा वाघळाचे तेल काढणारा वाघाटे नावाचा माणूस गावात होता. तो कधीही वाघळे विकत घेत असे. वाघळाचे पंख तोडून उरलेला भाग तो शिजवी. एका एका चांगल्या वाघळाचे मापभर तेल पडे. वाघळाच्या शरीराचा बहुतेक भाग चरबीचाच असे, आणि त्यांचे मांसही रुचकर असल्याचे तो सांगे.

आपणहून मरून पडलेली एक वाघळ मी एकदाच पाहिली होती. अवचित दुपारची ती वडाच्या उंचावरून दगडासारखी खाली कोसळली होती. आणि तिच्या तोंडानाकातून बारीक बारीक पांढरी सुते भुळभुळत होती. तिला कुठला तरी विचित्र रोग झाला असावा.

स्वतःबरोबर जगणाऱ्या, वाढणाऱ्यांविषयी कळत नकळत, जी जवळीक आपोआप वाटत असते तशी त्या वाघळांविषयीही माझ्या मनात निर्माण झाली होती.

थोडा वेळही खाली डोके वर पाय करून राहिले तर चेहऱ्याच्या भागात रक्त उतरे. केव्हा सरळ होतो असे होऊन जाई. आणि वाघळांना तर तसे शीर्षासन करायची जन्मभर शिक्षा मिळालेली होती. स्वतःची विष्ठा त्यांच्या तोंडात जात होती हे त्याहूनही वाईट होते.

पंक्तिप्रपंच केल्याने वाघळाच्या जन्माला गेलेली ती गेल्या जन्मीची माणसे आहेत, असे थोरली आई सांगे...

गावातल्या मरून गेलेल्या माणसांच्या छटा कुठल्या वाघळातून दिसताहेत का ते पाहायला तेव्हापासून मी वडाखालती येत असे.

...थोरल्या आईने सगळ्यांकरता करताना, एकाला एक, एकाला एक असे कधीच केले नाही.

दूर दिव्याभीतीची

घरासमोर रात्र पसरे. वाघळांचा चिरकत आवाज सुरू होई. काळोखाला बारीक बारीक चिरा पडल्यासारखा. थोड्या वेळाने काळोख दाट होई. भवती वेढलेल्या झाडांची एक मोठी गुहा झाली आहे असे वाटे. एक विचित्र भीतिदायक आवाज ती गुहा फोडून बाहेर पडू लागे. जणू काळोखच भीतीने ओरडे. आई, "पाखरू का ओरडतं आहे? कुणाचं भरलं आहे कुणास ठाऊक!" म्हणत दडपलेले दार अधिकच दडपून टाकी. तरी दारातून तो आवाज येईच. आई त्या पाखराचे नाव काही रात्री घेत नसे. सापासारखे घुबडाचे नावही रात्री घ्यायचे नाही असे ती दिवसा सांगे. त्या नावासाठी 'आस्तिक आस्तिक काळभैरव' हा भीती घालवणारा मंत्र तिने मला शिकवला होता.

...आमच्या घरासमोरची चिंच दाट होती. तीतून दिवसाही प्रकाशाऐवजी अंधारच खालती येई. पानांनी दाट झाल्यामुळे तिचा वरचा सगळा भाग बघता येत नसे. लिनी मला चिंचेवर उंच दगड मारू देत नसे. दगड मारताना पाठीमागून येऊन ती माझ्या उचललेल्या हाताला लहानसा धक्का देई. दगडाचा जोर कमी करी. सांगे की, दगड घुबडाला लागेल. दाट होत गेलेल्या भागात ते दगड झेलायला बसलेले असते. ते झेलते आणि रात्री नदीवरल्या दगडावर जाऊन रोज थोडा थोडा उगाळत राहते. उगाळून उगाळून तो जसा झिजत जाईल तसे आपले वडीलही घरी झिजायला



लागतात. दगड उगाळून संपला की, आपले वडील मरतात.—असली भयंकर माहिती लिनीला होती. मठाच्या पाणवठ्याच्या, पाण्यातल्या बुरुजांवर घुबडाने उगाळलेल्या दगडाच्या खुणा लिनीने मला दाखवल्या होत्या. मुरुमाच्या मऊ दगडाने ओलसर पाटीवर रेघोट्या गिरगटान्यात तशा. कधी न पाहिलेल्या, नुसत्या भीतीची एक अंधुक काळी आकृती डोळ्यांपुढे असलेल्या त्या घुबडाला लागेल म्हणून वर दगड मारायचे मी बंद केले होते...

चिंचेच्या खाली, देवाच्या आवारावर झुकलेल्या पिंपळाच्या एका दुवेळक्यातून, पुढे मोकळे तोंड असलेले दोन प्रचंड पोकळ ढापे आभाळाकडे निघालेले होते. भिक्या अनेकदा तिथे येई आणि खाली पसरलेल्या मुरुमाच्या ढिगाऱ्यातले दगड घेऊन वरती फेकी. भिक्याचे दगड उंच जाऊन खाली येताना ढोलीत पडत. कितीतरी दगड आत पडल्यावर घारीसारखे पण गोल आकाराचे दोन पक्षी तिथून विचित्र आवाज काढत, फडफडत बाहेर पडत. जवळ उभ्या असलेल्या ढांगुळ्या पांगाऱ्यासारख्या झाडाच्या फांदीवर बसत. मी त्यांच्याकडे बारीक कुतूहलाने पाहत राही. कबऱ्या रंगाचे, अगदी जवळ जवळ खवल्याखवल्यासारखी पिसे असलेले ते दोन छान पक्षी म्हणजे घुबडेच होती. त्यांचे अंग मजबूत वाटे. ती पुढे छाताड काढून बसत. त्यांची चोच बाकदार असे. नि डोळे, वाहत्या पाण्याचे प्रतिबिंब पडल्यासारखे तरते दिसत. ढोलीतल्या गाढ अंधारातून उधळून आलेली ती घुबडे आंधळ्यासारखी धडपडत. तिथून उठत. ढोलीभवती घिरट्या घालत आणि पुन्हा येऊन गपदिशी ढोलीत पडत...

भिक्याचा ढोलीत दगड मारायचा नेहमी उद्योग चाले. नदीतले देवाचे मासे धरणे गौरीच्या दाजींना सोसत नसे, तसे त्या ढोलीत दगड मारणेही. ते ताड्ताड् येत आणि भिक्याला वाटेल ते बोलत. 'गावावरून ओवाळलेले कार्टे' असे म्हणत. भिक्या, पाणीवाल्या भिडेला भारद्वाज दाखवतो म्हणून घेऊन येई आणि तिथल्या घुबडांना ढोलीतून उठवून त्यांचे दर्शन त्याला देई. भिडेला तो सबंध दिवस अगदी वाईट जाई. भिक्यावर तो करकचून

दातओठ खाई आणि ओठ फाटला म्हणून आमच्या दादांच्याकडे 'आयडो-फो' मागायला येत असे. आयोडिनच्या फायासाठी तो शब्द भिडे वापरी अणि आमची हसून मुरकुंडी वळे.

ढोलीत दगड मारताना घुबडांच्या पिलांचे गुदमरलेले आवाज मी अनेकदा ऐकलेले होते. कितीतरी कोवळ्या पिलांचे त्या दगडांनी भरीत झाले असेल. एखादाही मारलेला दगड उगाळत बसण्याचा नाद असलेल्या त्या घुबडांनी भिक्याचे कितीतरी दगड खाल्ले असतील. पण भिक्याचे त्यांना काहीच करता येणे शक्य नव्हते. त्याचा बाप मागेच मरून गेला होता.

बघावे तेव्हा भिक्या घुबडांच्या मागे लागलेला असायचा. त्याने पिंपळाच्या ढोलीपाशी एकदा चढून जायचाही यत्न केला होता. पण त्याच्या आईने त्याला खालून शिव्यांनी झोंबाडून खाली उतरायला लावले होते. त्याच्या आईच्या मते भिक्या बापाच्या वळणावर गेला होता. भिक्याच्या बाने घुबडाच्या मागे लागून आपला डोळा फोडून घेतला होता आणि भिक्याही आपला डोळा गमावणार असल्याची तिची खात्री झाली होती.

भिक्याला अंडी शोधत राहण्याचा विलक्षण छंद होता. चौघड्याच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर नेऊन चिमणीने नुकती घातलेली ऊन ऊन अंडी कोट्यातून काढून त्याने एकदा माझ्या हातावर ठेवली होती. उदी पिसांची, डोक्यावर गुलाबी भांग असलेली त्याची एक लाडकी कोंबडी होती. तिला तो नेहमी कुरवाळत बसे. संध्याकाळी हळूहळू काळोख भुळभुळत येत असताना, त्याच्या घरातल्या भिंतीच्या एका ठरलेल्या देवळीत बसून ती पांढरे शुभ्र अंडे टाकत असे. भिक्या त्या वेळी कुठे बाहेर जात नसे. आणि त्या वेळेच्या आधीपासूनच अंडे तयार झाले आहे की नाही ते तो कोंबडीला धरून बोटाने पाहत असे. त्यावेळी मात्र ती शहाणी कोंबडी मोठ्यांदा आरडाओरड करी. भिक्याच्या आईने या सवयीसाठी त्याला अनेकदा मारले होते. घुबडाची अंडी मिळवायचीही त्याची महत्त्वाकांक्षा होती. भिक्याच्या बाने घुबडापायीच कुडी गमावल्याची

कथा भिक्याची आई कधी कांडायला कुटायला आली म्हणजे आमच्या आईला ऐकवत असे :

भिक्याचा बाप वऱ्हाडाकडला चांगला कामकरी होता. पण एक दिवस गोसाव्याच्या वाडींतला कुठला दाढीवाला बाबा त्याला भेटला आणि त्याचे प्रपंचावरले लक्षच उडून गेले होते.

तेव्हापासून भिक्याचा बाप लोखंडाचे सोने करायचा वेत करीत होता. रात्री अपरात्री नदीतीरावरून, ओसाडीतून हिंडत होता. कुठल्याकुठल्या जुन्या ढोलीतून डोकावत होता. स्वतःचे अंडे फोडण्यासाठी घुबड अंतर्ज्ञानाने परीस घेऊन येते. परीस लागल्याशिवाय अंडे फुटत नाही. अंडी फुटून पिले बाहेर पडली की घुबड तो परीस लगेच समुद्रात नेऊन टाकते. हे सारे काळोख्या मध्यरात्री होत असते. त्यावेळी फक्त त्याला पकडले की झाले. इतका तो वेत सोपा होता.

एका ठरलेल्या नक्षत्रावरल्या अवसेच्या रात्री घुबडाला दारू पाजायची —ही एक योजना, दाढीवाल्या गोसाव्याच्या सांगण्यावरून त्याने आखली होती. घुबडाला तिन्ही काळांचे ज्ञान असते. ते दारू पिऊन वेसावध झाल्यावर विचारलेल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देऊ लागते. पण त्याला तीनच प्रश्न विचारायचे असतात. आणि तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर पुरे व्हायच्या आतच जवळच्या फरशीने त्याची मान उडवायची असते. पण तसे झाले नाही तर शुद्धीवर येऊन, काढून घेतलेल्या माहितीच्या रागाने ते शाप देऊ लागते. आणि मग प्रश्न विचारणाराचे घरच देशोधडीला लागते. त्या प्रयोगातच वऱ्हाडातल्या एका ओसाडीत तिचा नवरा मरून गेला होता आणि भिक्याची आई आमच्या देशात जगायला आली होती.

...सांगलीकरांच्या चुन्याविटांच्या उंच धर्मशाळेच्या वरल्या भागात काही भोके होती. त्यातून कधीकधी तरत्या डोळ्यांची गोल तोंडे डोकावलेली दिसत. त्याही भोकात भिक्या बरोबर दगड फेकून बसवत असे आणि घुबडांच्या पिलासारखे पक्षी त्यातून बाहेर पडत. मला ती घुबडेच वाटत, पण भिक्या त्यांना पिंगळे म्हणे. पिंगळेसुद्धा घुबडांसारखे प्रकाशाला घाबरणारे. मला

गंमत वाटे ती, प्रत्येक प्राण्याकडे, पक्ष्याकडे पहाताना त्याच्यासारखी त्याला जवळ असणारी दुसरी जात भेटे, त्याची. काळ्या तोंडाच्या वानरांसारखी पण गोरा रंग असलेली माकडे, सुसरीसारखी पण तोंडात फरक असलेली मगर, वाघळासारखी पण लहान असलेली पाकोळी आणि हे पिंगळे.

पिंगळे घुबडापेक्षा कितीतरी लहान. मुठीएवढे. बावरल्यासारखे, गरीब नि दिसायला त्यांच्या मंद उदी रंगात काचेसारखे स्वच्छ वाटत. त्यांच्या अंगावर, अंगरंगाच्या गडद छटांची टिंबे असत. दगडांच्या भीतीमुळे हवेत उडून जात असताना त्यांच्या आवाजाच्या पांढऱ्या लहान नाण्यांच्या आकारासारख्या चकत्या दिशांत उरल्या आहेत असे वाटे. सांगलीकरांची धर्मशाळा आमच्या पाठीमागे थोड्या अंतरावर होती. तिथल्या पिंगळ्यांच्या अमद्र आवाजाने, अपरात्री जाग येऊन आई अस्वस्थ होत असे.

अगदी पहाटे विचित्र आवाज काढत आमच्या दारावरून कुणीतरी जात असे. त्यालाही थोरली आई 'पिंगळा' म्हणे. ते कसे ते मला मुळीच समजत नसे. त्याचा आवाज विचित्र होता पण सांगलीकरांच्या धर्मशाळेच्या भिंतीत राहणाऱ्या पिंगळ्यांसारखा नव्हता. तो चालत जात असल्याचा स्पष्ट आवाज मला अंथरुणातही ऐकायला येई. त्या घटनेचा खोल परिणाम माझ्या मनावर होऊन राहिला होता. थोडी भीती, थोडी उत्सुकता मिसळलेला. मी एकदा धीराने उठून दाराच्या फटीतून, त्याला जाताना त्याच्या पाठच्या बाजूने पाहिले होते. तो पाठीमागून माणसासारखाच वाटत होता. नीटसे दिसत नव्हते. मळकट, उदास रंगाचे कपडे त्याच्या अंगभर होते आणि त्याचे पुढले तोंड पिंगळा, घुबड यांच्या मिश्रणातून काहीतरी निर्माण झाल्यासारखे असावे असे मला वाटले होते. मी त्याला बघून फार भ्यालो होतो. थोरल्या आईच्या गोष्टीतून घुबड, पिंगळा हे लोक ज्ञानी, भविष्य जाणणारे म्हणून येत. आणि त्या पिंगळ्यालाही भविष्य सांगता येते हे तिच्याकडूनच मला ठाऊक झाले होते.

प्रकाश संपत आला की, घुबडांचे अनेक आवाज ऐकायला येत. आमच्या नदीच्या काठावर घू ऽ ऽ असा एकाक्षरी लांबवर पसरत जाणारा घुबडाचा

आवाज, गावच्या संध्याकाळच्या वातावरणाचा एक भागच होऊन गेला होता. मठाच्या निर्जन पाणवठ्याला किंवा नदीपलीकडल्या कंजाळावर बसून, हाक घातल्यासारखा तो आवाज घुबड काढी आणि त्याचा प्रतिसाद नदी-वरल्या साऱ्या वातावरणातून उठे. कधी त्या हाकेला कुठून तरी दुसरी हाक येई आणि घुबडाचा जोड आता जुगणार आहे असे भिक्या सांगे. हळूहळू खाली जाणारे संध्याकाळचे नदीचे पाणी पाहायला आलेले कंजाळावरले घुबड संध्या करायला घाटावर आलेल्या सात्त्विक माणसासारखे भासे. कधी ते कंजाळावरून डोहातल्या काळोखणाऱ्या सावल्या पाहत काळोखात मिटून जाई. आणि त्या सावल्यांचा अर्थ, आमच्या शाळेतल्या कवितेसारखा, त्याला खरोखर कळत असला पाहिजे असे वाटे.

रात्रीच्या काळोखातून घूऽक किंवा घूऽग असे कधीकधी आवाज येत. आणि तीही घुबडाच्या अस्तित्वाची सामान्य खूण असे. पण गळ्यातून आंब्याची वाळली कोय फिरल्यासारख्या अलर अटर असा किंवा गावाचे रात्रीचे सबंध वातावरण भेदून टाकणारा फिरकीदार, वजनपूर्ण घुघूऽऽघूऽऽ असा आवाज त्याने काढायला सुरुवात केली की भीती वाटायला लागे. काहीतरी वाईट घडणारी काळी हवा गावात पडे.

रखरखीत दुपारचेही चुकून कधीतरी घुबड ओरडे आणि त्याला थोरली आई, "आवगलेस की काय?" म्हणे. बराचसा काळोख पडलेल्या सूर्यग्रहणादिवशी एक घुबड असेच ओरडले होते.

...दादा नि मी रात्रीचे भिलवडीहून नदी ओलांडून येत होतो. काळाकुट्ट काळोख झाला होता. आम्ही फरशीवरले पाणी ओलांडून वर आलो. नदी संपली की कंजाळझाडे झुकलेले वळण लागे. आणि मऊ गाळमातीतून पाय बुडवत वर यायचे असे आम्ही ते वळण चढून आलो. दुसऱ्या वळणाच्या सुरुवातीला बांबूच्या वेटाच्या उंचवट्यावर दोन चमकते डोळे दिसत होते. त्या डोळ्याभवतीच्या न दिसणाऱ्या भागातून अंःऽअंःऽ असा माणूस कण्हावे तसा आवाज ऐकू येत होता. आम्ही पाहिले : ते छाताड पुढे काढून बसलेले घुबड होते. काळोखात तो प्रकार भीतिदायक होता.

आम्ही अधिक जवळ आलो तसे ते फडफडत, फडफडत बाजूला झाले. आम्हाला त्याने चांगले पाहिले असले पाहिजे. काळ्या खडकातून पलीकडचेही त्याला दिसेल असे तेव्हा मला वाटले होते.

भिलवडीकडून येताना पाण्यातल्या फरशीच्या खालच्या अंगाला पात्रात काळ्याभोर खडकाचे, महादेवाचे एक जुनाट देऊळ होते. उन्हाळ्यात देवळाला दोन बाजूंनी वळसा घालून नदीचे पाणी खाली जाई. खूप उशीर करून परतायच्या दादांच्या सवयीमुळे मी नि दादा एकदा अशाच काळोख्या, न दिसणाऱ्या रात्री भिलवडीहून येत होतो. अर्धी फरशी पायाखाली घातल्यावर त्या निर्जन वेळी प्रवाहातल्या देवळावर काही गजबज दिसली. काही वाटाघाटी चालाव्यात तशा त्या हालचाली होत्या. फरशी चढून वर जाण्याचे वळण 'भुताचे' म्हणून प्रसिद्ध होते. रात्री थांबलेली बैलगाडी तिथे कितीदातरी अडकून राहत असे. म्हणून तिथून येताना गाडीचे चाक सतत फिरते ठेवले जाई.

दादा म्हणाले, "घुबडांची सभा भरली आहे—" कितीतरी घुबडे तिथे असावीत. ती तिथे पाणी प्यायला आली होती की काय कुणास ठाऊक. नदीपलीकडच्या तावदरवाडीच्या उजाड टेकाडावरही रात्री तशी घुबडांची सभा भरत असल्याचे मला भिक्याने सांगितले होते.

चटकन डोळ्यांपुढे उभी राहावीत अशी घुबडांची घरे कुठेच नव्हती. कुठल्यातरी अनोळखी, काळोखदाटल्या भागात ती राहात. मठातल्या देवळाच्या कळसापासच्या कमानीतल्या काळोखात, चाळशी लावलेल्या म्हाताऱ्या माणसासारखे तोंड दाखवत, तेवढ्याशा जागेत इकडून तिकडे शतपावली करणाऱ्या घुबडाला पाहून मी नि ताईमावशी एकदम पळून आलो होतो. ताईमावशी शहरात राहिलेली. तिने घरी दादांना ते सांगून 'ते काय रे?' म्हणून विचारले होते. ती घाबरलेली आहे हे पाहून त्यांनी 'तुम्ही ते पाहिले की काय?' असे, ते पाहायला नको होते, अशा अर्थाच्या सुरात तिला विचारून अधिकच घाबरून सोडले होते.

बंगल्यातल्या प्रचंड पिंपळाच्या ढोलीत काही घुबडे राहत होती.

तावदरवाडीच्या पडक्या उध्वस्त वाड्यातून त्यांची जाग होती. भिलवडीच्या नदीलगतच्या कुरणापासच्या पडक्या मशिदीत त्यांचा एक प्रपंच होता. आणि तिकडे दूर कुठेतरी, थोरल्या आईने सांगितलेल्या गोष्टीतल्या बादशहाने फक्त घुबडांना आंदण दिलेले एक उजाड खेडे होते.

थोरल्या आईंच्या गोष्टीत तेव्हा कावळ्यांची आणि घुबडांची लढाई चाललेली असे. त्या लढाईतल्या घुबडांच्या हालचाली, रात्री वडाखालती चालणाऱ्या वजनदार फडफडीतून जाणवत. रात्री घुबडे, कावळ्यांची अंडी-पिले फस्त करत. आणि दिवसा कावळे, घुबडांना प्रकाशात हुसकून आणून त्यांचे डोळे फोडायच्या नादात असत. त्या गोष्टीतून घुबडाला कसल्या तरी जादू अवगत असत आणि ते मांत्रिकही झालेले असे. डगरीपाशी मरून पडलेले एक घुबड आमच्या कुत्र्याने एकादा वर ओढून आणले होते. ठिकठिकाणी त्याच्या अंगावर चोची मारलेल्या होत्या. डोळे फोडलेले होते. कावळ्यांनी त्याला कुठेतरी दिवसा गाठलेले असावे. एखाद्या कबऱ्या रंगाच्या खडकावर नाजूकपणे वर्षानुवर्षे छिन्नी मारावी आणि शिल्प तयार व्हावे तसे त्याचे अंग सुंदर दिसत होते. ते भव्य वाटत होते आणि त्याच्याभोवती त्याला कळत असणाऱ्या गोष्टींच्या शक्तीचे एक न दिसणारे गूढ वलय होते. प्रकाशापुढे न येणाऱ्या त्याचा असा प्रकाशात शेवट झाला होता. ते ओरडले की, त्याच्या कुळाचा लोक उद्धार करीत. ते जसे जन्माला आले होते तसेच होते. त्याच्याविषयी निर्माण झालेल्या समजात खरोखरी त्याचा तसा काय भाग होता ?

थोरली आई आजारी होती. त्या दिवशी तिला बराच हुरूप आला होता. तिने आईकडून पेज मागून घेतली. आणि मला जवळ घेऊन माझ्यावरून हात फिरवला होता. रात्र आली आणि अचानक पाखरू ओरडू लागले. आवाज आमच्या घराजवळ येऊ लागला. आमच्या कौलाराच्या आढ्यावरच येऊन ते ओरडू लागले. आईने काय ते ओळखले होते. ती म्हणाली, "तुझी आजी आज काय उजाडू देणार नाही!" आणि ती अंगणात येऊन खालीच बसली. दादा बाहेर आले. त्यांनी त्या

धुवडाला दगड भिरकावून हुसकावून दिले. तरी पुन्हा पुन्हा येऊन ते आढ्यावरच ओरडू लागले.

काळोख दाट होत होता. भवती वेढलेल्या झाडांची एक मोठी गुहा झाली होती. आणि तो फिरकीदार, वजनपूर्ण आवाज ती गुहा फोडून जात होता...

सकाळी थोरली आई उरली नव्हती....



मलानल्या उल्हान

पौष पहाटेच्या गारठ्याने ओठ फुटायचे. ओठांवरून पांघरूण उतरायचे नाही. पण आई उठलेली कळायचे. केव्हाहून उठायची ती. झोपही असायची नि जागही असायची. दुलईतून खिडकीकडे डोकावावे तेव्हा

झुंजूमुंजू झालेले असायचे. आधी झांजा वाजायच्या नि मग झुंजूमुंजू व्हायचे. देवाकडे नुकतीच काकड आरती संपलेली असायची. थोरल्या आईच्या दुलईत अधिकच गुरगटून व्यायचे. मघाशी असलेले वडाखालचे सामसूम आता डोळे चोळायला लागलेय असे वाटायचे. चिंचेखालचे आमचे घर. मोठीच्या मोठी पुढे चिंच. पुढे तीहून थोरला वड... दारासमोरचे सारे आवार 'वडाखालचे' म्हणून ओळखले जायचे. एवढा त्याचा अवाढव्य विस्तार. सगळीकडे झाडेच झाडे—हिरवीगार.

उन्हे यायची. सावकाश. ती काही लवकर उठायची नाहीत. हळूहळू उतरत यायची. पण एकदा येऊन उतरली की मग झडझडून पंख झाडायची नि उंच होत जायची. ती यायची उगवतीच्या दारातनं. तांबूसहिरव्या मळ्यांना जागे करीत. डोहाला गुदगुदल्या करीत. अलीकडल्या आळशी डगरीला भेडसावीत. देवळाच्या कळसाला आल्याचे कळवीत. पाना-पानातनं वाट काढीत. मोठ्या मोठ्या झाडांच्या पोटांना बोट लावीत—नि मग सगळे वेगळेच होऊन जायचे. झळझळीत दिसायचे. आई सांगायची, "पहिल्यांदा मी इथं आले एका मार्गशीर्षातल्या सकाळी. नि हे सारं पाहिल्यावर डोळे निवले. वाटलं, किती छान ठिकाणी आपण राहायला आलो आहोत." आईने पहिल्यांदा पाहिलेले ते गावाचे रूप माझ्या डोळ्यांपुढे येते. त्यावर ऊन्ह कसे पडले असेल ते दिसते.

ती उन्हे पिंपळपाराच्या मोकळ्या जागेत येऊन थांबायची. मग उन्हाला पाठ द्यायला म्हणून थोरली आई मला बोटाला धरून घेऊन यायची.

थोरल्या आईच्या अंगासारखे मऊसर ऊबदार ऊन्ह अंगावर घेताना चांगले वाटायचे. उन्हे खायला आणखी कुणी कुणी यायचे. थोरल्या आईशी बोलत राहायचे. माझ्याकडे पाहायचे. साऱ्या आवारात वडाची

लालभडक वडफळे टपटपत असायची. त्यातले पिवळे पिवळे रव्यासारखे कण मातीवर विखरायचे. त्यावरही ती उन्हे पडायची. ती फळे मटकवावी असे वाटे. उन्हात लांब लांब सावल्या पडायच्या. मला त्या सावल्यांचे निराळे जग, त्यांची निराळी भाषा आहे असे वाटायचे. माणसाइतके जिवंतपण त्यात जाणावयाचे. मी त्या उन्हाची उत्कंठेने वाट पहायचा. ऊन्ह तेव्हाच्या उत्कंठेची अजूनही अपूर्वाई करते. कधीतरी ते अवचितसे येते. पुढे येऊन पसरते. हसते. हरवलेल्या सावल्यातून निघून गेलेल्या थोरल्या आईला भेटवते. अलिप्ततेतून एक जवळीक जिव्हारी भिडवते.

मला अनेक स्मरणे आहेत. ती कुठे सरतच नाहीत. ही स्मरणवाट कुठवर आत जाते ते कळतच नाही. किती जुने जुने निळे क्षण मी आईला जसेच्या तसे सांगायचा. नी ती म्हणे, "अरे तुला कसे आठवेल ते ! त्या वेळी तू तर एवढासा होतास."

कमळभैरीच्या कुंडातले ते परातीएवढे कासव उन्ह खायला लुटूलुटू वर यायचे. उन्हात त्याची पाठ चकचकायची. पण कमळभैरीला आम्ही गेलो ते एकदाच नि ते सुद्धा मला कळायला लागायच्या आधी. मग ते कासव माझ्या डोळ्यांपुढे कुठून येत आहे ? तिथले पांढऱ्या चाफ्याचे झाड मनात कुठून पांढरी शुभ्र फुले शिंपते आहे ? त्याआधीही पाहिलेले उन्हात उजळलेले कडेपठार कुठून ओळख सांगते आहे ?

मनाचे नि उन्हाचे पहिले नाते आठवते ते असेच जुने. समोरून कोवळेपिवळे उन्ह यायचे. पूर आल्यासारखे उन्ह नि अंधार यांचे मनांतले अस्तित्व उघडमिटीसारखे जाणवायचे. डोळे उघडणे म्हणजे उन्ह—मिटणे म्हणजे अंधार.

उंच उन्हे चिंचेवरून अंगणात यायची. चिंचेचा, अंगणांत पडलेला पिवळा केशरी मोहर त्या उन्हाने करपून जायचा. दारात आमची काळीपांढरी कपी कुत्री उन्हाची उभी राहायची. काळा नि पांढरा रंग सुचवणाऱ्या त्या दोन अक्षरांचे नाव तिला कुणी ठेवले होते नकळे. थोराड हाडाच्या त्या उभार-लांबार कुत्रीवर थोरल्या आईचे मोठे प्रेम होते.

लाबोडक्या जबड्यातून लाल खरखरीत जीभ बाहेर काढून हा-हा करीतच्ती दगडी कट्ट्याच्या पायऱ्यांवर उभी राहायची. तिच्या तोंडातून एकसएक येच पडायचा. थोरली आई तिचे सारे नियमाने करायची. ती मोठी शहाणी होती एवढेच आता आठवते. ती कशी, कुठे, केव्हा नाहीशी झाली कुणास ठाऊक. तिच्या नाहीशा होण्याच्या काळातच, वडाखाली उन्ह खायला येणारी भागीरथीबाई ही अशीच एक दिवस न कळता दिसायची थांबली होती.

वरनं उन्ह जळत असले तरी आमच्या पांढऱ्या गाऱ्याच्या मातीच्या घरात थंड असायचे. उन्हाळ्यामध्ये, रांजणात राहणाऱ्या पाण्याला वाटावे तसे वाटायचे. दारे लावली की गडद काळोख व्हायचा. कोपऱ्यात असलेली मोरी स्वच्छ नि थंड असायची. तिच्या काळ्या, गुळगुळीत, उतरत्या, गार फरशीवरून उन्हाच्या वेळी घसरत राहावे वाटायचे. मोरीच्या तोंडातून तेवढा एक चिवचिवता, मंद तांबूस-पोपटी प्रकाश येई. नंदादीपाइतका शीतळ. त्या उन्हातल्या काळोखाला आलेली शीतळाई त्या नंदादीपाचीच आहे असे वाटे. तो प्रकाश कशात तरी भरून ठेवावा अशी इच्छा होई. प्रकाशाला भुलून एक साप उन्हाचा आत आला होता. तेव्हापासून ते प्रकाशाचे चिवचिवणे थांबून गेले होते.

उन्हाळ्यातल्या जळत्यावेळी जेवणे उरकलेली असायची. आई दमून पडलेली असायची. भगभगीत उन्ह रणरणत असायचे—बघवायचे नाही असे. मी मागचे दार उघडायचा. नि आईची डुलकी नेमकी मोडायची. आई म्हणायची, "किती दमवशील रे—झोप उन्हाचा." पण माझे लक्षच नसायचे. मी विस्मयाने चकित झालेला असायचा. पश्चिमेकडे पाहावे तो दूरवरचे सारे गाव पाण्यात तरंगलेले दिसायचे. लाटा पुढे यायच्या. आडवी सडक बुडायची. आडव्या सडकेला कितीतरी झाडी होती. त्या आडव्या सडकेपुढे जग संपते असे खूप दिवस वाटे. एका अंधाऱ्या रात्री दादांनी मला घराबाहेर काढले होते. कडी लावून घेऊन सांगितले होते, "आता अधिक हट्ट केलास तर आडव्या सडकेवर सोडून येईन." आडव्या सडकेविषयीची मनातली तेढ तेव्हापासूनची. ती बुडली तर बुडली.

पण त्या कुरळ्या लाटा आणखी पुढे यायला लागलेल्या असत. आरतीच्या रानात जोडीने उभ्या असलेल्या दोन गूढ बाभळीही लाटात विरघळायला लागत. मग माझा धीर सुटायचा. त्या दोन बाभळींवर माझा अतिशय जीव होता. पहिल्यांदा सकाळी उठलो की, त्या जागेवर आहेत की नाहीत ते मी पाहून येई. त्यांच्या इतर मैत्रिणींहून त्या निराळ्या वाटत. त्यांच्या फांद्यांचा पसारा विचित्र होता. त्या दुसऱ्या बाभळी रात्री कुठून तरी भटकून येतात असे वाटायचे. त्यांची भीती वाटायची नि आपुलकीही.

त्यांना "मी एकटा हात लावून आलो" म्हणून वृंदावन सांगायचा. स्वतःच्या कर्तबगारीची माझ्याकडे असलेल्या खात्यातली जमा वाढवत राहायचा. त्या बाभळी त्याच्याबरोबर बोलतसुद्धा. तो मठाच्या अलीकडे बंगल्यात राहायचा. मोठा विलक्षण नि माझ्याहून कुठे तरी पुढे वाटायचा. आमच्या पडवीतल्या भिंतीवर आम्ही दोन ढेकूण सोडत असू. कुणाचा आधी वर जातो ते पाहत असू. नि बेटा त्याचा ढेकूणही पुढेच जाई...

त्याची आई कृष्णाबाई. तिला औषधासाठी बेलफळे लागायची. बंगल्यातल्या दोन ढांगुळ्या झाडावर बेलफळे उन्हात लटकत असत. दादा कधी कधी काढून द्यायचे. ते सरसर झाडावर चढत. आईला हे कधी तरी समजायचे. मग म्हणायची, "त्यांचं काय जातं? त्यांच्यात काय कुणाला झाडावर चढायला येत नाही? पडलं तर दुसऱ्याचं माणूस पडेल." दादा हसण्यावारी न्यायचे नि ती काळजी तिच्या चेहऱ्यावर उतरून यायची. तिचा जीव एवढा-एवढा व्हायचा. कशाची म्हणून ती काळजी घेणार होती ते तीच जाणे. दादांचे असे नेहमीच असे. कुणाकुणाच्या ते उपयोगी पडत. जीवही धोक्यात घालत.

एका सकाळी कुणाला तरी तातडीने पलीकडे जायचे होते. नाव पलीकडे होती. हाका मारूनही कुणी घेऊन येईना. मग दादा नाव आणायला पाण्यात पडले. साऱ्या डोहावर ऊन पसरले होते. नि सटवाईच्या मळीखाली ती माणसे खाणारी भुरी सुसर निघाली होती. दादा पलीकडे पोचेपर्यंत जीव कसा कासावीस होऊन गेला होता. मला ते उन्हातून

डोहापार होणारे दादा दिसतात. पोहताना कधीच न बुडणारे, उन्हात चमकणारे त्यांचे दोन काळेसावळे खांदे दिसतात.

...आणि ते उन्हातले पाणी खालतीच येत असायचे. थोड्या वेळाने पाहावे तो अनसयाच्या घराला लागलेले असायचे. दोन बाभळींवर धार पडलेली असायची. मी आईला घाबऱ्याघाबऱ्या बोलवायचा. मग आई रागारागाने उठायची. मला घेऊन जायची. दडपून झोपवत सांगायची, "अरे, ते काही खरं नाही पाणी. ते चावट ऊन आहे नं? ते फसवतंय. कोवळी कोवळी हरणं आशेनं लागतात मागं त्याच्या. पळतात...पळतात ...कुठं त्यांना पाण्याचं टिपूसही भेटत नाही."

घराभोवती वाढलेल्या शेंडातून उन्हाचे हिंडताना प्रकाशाच्या पोपटी हिरव्या झुळुका सुखवायच्या. चिकाचे एक गोल पान घ्यायचे. मध्येच फोडायचे. कधीमधी मध्येच आभाळ यायचे. त्यात रंग यायचे. "चिक्-चिक् पाणी, आभाळ राणी...अरे, हे आभाळ आहे नं? त्याच्याखाली ती राणी असते..." मग खालती पाहायला लागावे तो ते खोल आभाळ फुटूनच गेलेले असायचे.

मठाच्या वाटेवर विट्टयांची झाडे झुलायची. देवाच्या बागेचा शेवट तिथे व्हायचा. त्या पिवळ्या फुलांचा गंध कचाकचा चावावा वाटे. उन्हाने तिथल्या वेळेला एक गूढ विलक्षण घनता आलेली असे. तिथले चित्रविचित्र कवडसे...पंख फुलवून उधळणारी रंगवेडी फुलपाखरे...तलम, काळ्या चंद्रकळेचे दोन पंख. त्यावर रंगीत ठिपके. तांबडे, निळे, पांढरे. मधली अंगाची कळी तांबडीलूस. अंगकळीवर सुईच्या टोकाने रेखाटल्यासारखे सूक्ष्म काळ्या रेषांचे वेढे. त्यांच्यामागे धावताना ती नवलाई काही हाती नाही लागायची. पुसटनिसटसे मखमली पंखरंगच तळव्यांना लागायचे. कधी फुलपाखराचे एखादे जुळे अवचित हाती यायचे नि फार मोठे काही सापडल्याचा आनंद व्हायचा.

विट्टयांच्या झाडाजवळून नदीची वाट जाई. दुपारच्या वेळी, भारद्वाज निघाला आहे म्हणून पोरे ओरडत सुटायची. पाणीवाला, वाकलेला भिडे

पण त्या कुरळ्या लाटा आणखी पुढे यायला लागलेल्या असत. आरतीच्या रानात जोडीने उभ्या असलेल्या दोन गूढ बाभळीही लाटात विरघळायला लागत. मग माझा धीर सुटायचा. त्या दोन बाभळींवर माझा अतिशय जीव होता. पहिल्यांदा सकाळी उठलो की, त्या जागेवर आहेत की नाहीत ते मी पाहून येई. त्यांच्या इतर मैत्रिणींहून त्या निराळ्या वाटत. त्यांच्या फांद्यांचा पसारा विचित्र होता. त्या धुम्या बाभळी रात्री कुठून तरी भटकून येतात असे वाटायचे. त्यांची भीती वाटायची नि आपुलकीही.

त्यांना "मी एकटा हात लावून आलो" म्हणून वृंदावन सांगायचा. स्वतःच्या कर्तबगारीची माझ्याकडे असलेल्या खात्यातली जमा वाढवत राहायचा. त्या बाभळी त्याच्याबरोबर बोलतसुद्धा. तो मठाच्या अलीकडे बंगल्यात राहायचा. मोठा विलक्षण नि माझ्याहून कुठे तरी पुढे वाटायचा. आमच्या पडवीतल्या भिंतीवर आम्ही दोन ढेकूण सोडत असू. कुणाचा आधी वर जातो ते पाहत असू. नि बेटा त्याचा ढेकूणही पुढेच जाई...

त्याची आई कृष्णाबाई. तिला औषधासाठी बेलफळे लागायची. बंगल्यातल्या दोन ढांगुळ्या झाडावर बेलफळे उन्हात लटकत असत. दादा कधी कधी काढून द्यायचे. ते सरसर झाडावर चढत. आईला हे कधी तरी समजायचे. मग म्हणायची, "त्यांचं काय जातं? त्यांच्यात काय कुणाला झाडावर चढायला येत नाही? पडलं तर दुसऱ्याचं माणूस पडेल." दादा हसण्यावारी न्यायचे नि ती काळजी तिच्या चेहऱ्यावर उतरून यायची. तिचा जीव एवढा-एवढा व्हायचा. कशाची म्हणून ती काळजी घेणार होती ते तीच जाणे. दादांचे असे नेहमीच असे. कुणाकुणाच्या ते उपयोगी पडत. जीवही धोक्यात घालत.

एका सकाळी कुणाला तरी तातडीने पलीकडे जायचे होते. नाव पलीकडे होती. हाका मारूनही कुणी घेऊन येईना. मग दादा नाव आणायला पाण्यात पडले. साऱ्या डोहावर ऊन पसरले होते. नि सटवाईच्या मळीखाली ती माणसे खाणारी भुरी सुसर निवाली होती. दादा पलीकडे पोचेपर्यंत जीव कसा कासावीस होऊन गेला होता. मला ते उन्हातून

खांद्यावरला माठ तसाच टाकून त्या पोरांबरोबर भारद्वाजामागे पळत सुटे. तो सदा वखवखलेला असायचा. गोडाधोडासाठी तडफडायचा. भारद्वाज दिसला की भर उन्हात साष्टांग नमस्कार घालायचा. भारद्वाजाचे तोंड पाहिले की, गोड खायला मिळते असे त्याला वाटे. तो तपकिरी पिसांचा, काळ्या गर्दनीचा गुबगुबीत भारद्वाज लाल लहान डोळ्यांनी हसल्यासारखा भासायचा नि डोहावरल्या उन्हातून पैल निघून जायचा.

एखाद्या दुपारी, मठाच्या पाणवठ्याला आईबरोबर सोबत म्हणून मी जाई. आई म्हणायची, "पाय पोळताहेत रे तुझे." मी म्हणायचा, "मग तुझे नाहीत का पोळत?" मला स्मरते : नेमक्या अशा एका क्षणी भारावून जाऊन तिने मला मनाने विलक्षण जवळ घेतलेले होते. ते तिथले उंबराचे झाड. लाललाल अंजिरासारखी उंबरे. खाली मळीच्या वाळूत सडा पडायचा. काही डोहात. काही पाणवठ्याच्या दगडांवर. दगडावर पडणारे उंबर फुटायचे नि काळीं सोनेरी लाख पाखरे त्यातून बाहेर पडायची. एखादे उंबर खायला घेतले की, आई सांगायची, "नीट बघून खा बरं. पाखरं गिळशील आणि डोळे येतील." पुढे कधी डोळे आले की वाटायचे: आपण उंबरांतली पाखरं गिळली.

वरून येणारा बंगल्यातल्या बकुळीचा गंध...दोन काठची डोलती मक्याणे...मोठाच मोठा डोह...दूरवर निघालेली सुसर...पाण्यातले देऊळ ...पलीकडली वाडी...हे काही मनातून निघत नाही...या साऱ्यावरली उन्हाची धून काही मंद होत नाही.

सकाळी चिंगूआजी फेसाळलेले दूध गुंडीतून घेऊन पलीकडून येई. चकचकीत पिवळ्या उन्हाच्या तुकड्यातून कातून काढल्यासारख्या गुंडीतले दूध इतके गोड लागे की पिताना डोळे मिटावेसे वाटे. जणू त्यात सकाळचे कोळेपिवळे उन्ह मिसळलेले असे. नाव अलीकडे यायला लागलेली घरातूनच दिसे. मग मी डगरीवर येऊन चिंगूआजीची वाट पाहत बसे.

डगरीला नाव लागायची. त्या उंच डगरीला पिवळ्या नि पांढऱ्या धोतऱ्याचे रान माजलेले असे. काटेरी धोतऱ्याच्या पिवळ्या मखमली

पाकळ्या. नि त्याचे बी काळेकुळकुळीत...धक्का लागला की गळायचे. दादांना एकदा उन्हाची इंगळी चावली होती. तेव्हा तिथल्या पिवळ्या धोतऱ्याची मुळी मी चटचटत्या फोफाट्यातून जाऊन आणली होती... आणि पांढऱ्या धोतऱ्याचे ते फूल...त्याचे हिरवे काटेरी फळ...आईच्या हाताच्या बोटाला कांडरू झाले होते. त्या पांढऱ्या धोतऱ्याच्या फळाची टोपी पोखरून हाताच्या बोटावर ठेवायची होती—ते फळही मी असे उन्हाचेच तोडून आणले होते. आई म्हणायची, "आता की नाही, हे बोट कापावं लागणार!"

दादा कधीकधी मुलाहून मूल होत. मनात राहाव्यात अशा लहानलहान गोष्टी करीत. एका कोवळ्या उन्हात, दादांनी पायांनी ठेचलत नेलेली, मठाच्या वाटेवरली आंब्याची ती कोय मला दिसते. एकदा खूप पुढे पायाने ठेचलायची. जवळ आली की पुन्हा ठेचलायची. ती चुन्याच्या घाणीपर्यंत आमच्याबरोबर आली होती. माझ्या मनात त्या कोयीविषयी आज उगीचच

कुठेतरी आपुलकी निर्माण होतें आहे. सावल्यातून, उन्हाच्या पिवळ्या ठिबक्यातून तिचे येणे मला उगीचच आठवते आहे...कितीतरी वर्षे सरली. त्या कोयीचे काय झाले असेल आता ?...

दूरच्या शाळेतून दुपारचे बाराचे परतताना चिलारीची काटेरी दाटी लागे. वारा यायचा नि चिलारीच्या वाळलेल्या शेंगा खुळूखुळू वाजायच्या. उन्हाचे नि त्या आवाजाचे मोठे विलक्षण मिश्रण होऊन गेले होते. एकमेकांपासून त्यांना दूर करताच यायचे नाही. त्या वाटेवर गळ्यावरले रंगपट उलगडत किती तरी सरडे उन्ह खात असत.

मळ्याच्या वाटेने सळसळत गेलेली तल्लख पिवळी नागीण...जोंधळ्यातून जाताना पानांच्या धारदार पात्याने फाटलेला लिलीचा डोळा...पाणंदीतून जाताना, जळत्या उन्हात मधेच वाटेवर येऊन धुंद झालेले तांबडेभुरे मुंगसाचे जोडपे. त्या नराचे लुकलुकत्या डोळ्यांनी वळून पाहणे. त्याच्या एवढ्याशा नाकावर चमकणारे घामाचे लहानलहान थेंब. तांबडगोंडाच्या कड्यावरून कृष्णेचे मोठेच्या मोठे पात्र पलीकडे ओलांडून जाणारे मोर... त्यांची उन्हातली गर्द नितळनिळी पंखे...परसदारच्या दुर्वांचे, किरणांनी चमचमणारे हिरवेसोनेरी तुरे तोऱ्यात कुरतडत जाणारे पांढरेशुभ्र मांजर... दुपारच्या आरतीच्या वेळी पिंपळावरले आग्यामोहोळ उठून मागे लागले म्हणून पातळ फेडून उन्हातून घाटावर पळालेली बाई...

सदाच्या कोवळ्या तळव्यातून हिंगण्याचा निगरगट्ट काटा वर आरपार आला तेव्हा उन्हच होते. नि भाक्या गेला त्या वेळेची पाउलेही उन्हाचीच वळली होती. उन्हात शिळेवर बसून आईने भाक्याच्या नावाने शेवटचे पाणी अंगावर घेतले होते. त्या दुपारी देवाचा चौघडा वाजलाच नाही.

माहेराच्या स्मरणाने व्याकुळणारी मनाची सावली माहेराच्या लंकेची वास्तू न्याहाळते ती उन्हातच झळझळणारी. नदीचा रुपेरी डोह... तिथला पाणवठ्याचा लळा लागलेला काळा कातळ...उन्हाचे वर्फ करत बसलेली औदुंबर-बाभळींची राई...तीतून तांबडी वाट नागवळणाने धावत

जायची नि भुवनेश्वराच्या राखी, खडबडीत चढणीजवळ थांबायची. चढता-उतरता तिच्याशी केलेली हितगुजे जिवंत व्हायची. देवीचे कबरे देऊळ... शिवेवरचे सासरमाहेर...घरांचे प्रेमळ डोळे...

मग डोळ्यांचेच कौतुक होऊन जायचे. त्यात बुडून जाताना पुन्हा लहानपण मिळायचे. पाठीवरून आईचा हात फिरायचा...नि त्या लंकेतून निघताना तिची वाट निष्ठूर करायचे तेहि उन्हच. उन्हाच्या फुसलावणीने ती वाट तिला पुढे ओढायची. रुख्यारुख्या माळावर.

अपार पान्ह्यासारखे उन्ह. मऊ लडिवाळपणाने कुरवाळणारे उन्ह... जुने जुने संदर्भ उजळत जाणारे उन्ह. अबोध अंतःसंवेदनांना आवाहन देत जाणारे उन्ह. जवळून दूरवर पसरत जाणारे, माझ्यातील नि वेध लावणाऱ्या दूरतेतील अंतर संपवीत जाणारे...आनंदाने थयथयणारे नि आकांत करायला लावणारे उन्ह.

काळोखाच्या खिन्न खडकाला कान लावला की, त्याच्या खोल थरांखाली असलेल्या उन्हाच्या जिवंत झऱ्याची थरथर मला जाणवते. अंतस्थातला चुकून आकारलेला आवाज त्या थरथरीनेच मला ऐकवला आहे.

कुठल्या अनोळखीपणातून चालताना काहीच कळत नसते...आणि कुठून तरी अनेक जन्मांच्या सोबतीसारखे ते उन्ह अचानकपणे येते. त्या अनोळखीपणावर पसरते. हलते नि माझ्यात मिसळून जाते. आणि कधी न पाहिलेले ते अनोळखीपण पूर्वी कुठे तरी भेटले आहे—ते सारे स्मरणारे आहे असे वाटून जायला लागते. ओळखीचे होऊन जाते.

किती तरी क्षणांची ही उन्हे निरनिराळी की एकाच उन्हाची रूपे?... कुठल्या अज्ञात शब्दशक्तीने उजळलेल्या आकृतिबंधात जसे पहिल्या शब्दात पुढल्या शब्दाचे सूचक स्वर असावेत, तशी ही मनातली उन्हे एकमेकांशी नाती सांगत येतात.

लहानपणी कुणीतरी माझे घर उन्हात बांधणार होते.

खरे तर उन्हानेच माझ्या मनात जन्मापासून घर केले होते.



ढोलापरी

आमच्या घराजवळच्या वडाच्या उजव्या बाजूला पिंपळपार होता. दारात उभे राहिले की, पिंपळपारापासून खाली जाणारी वाट दिसे. ती डगरीच्या चिंचेपासून नदीकडे उतरे आणि दिसेनाशी होई. तिथून नदीच्या पसरलेल्या पाण्याचा तुकडा नि पलीकडचा हिरव्या रंगाने झाकलेला लहानसा भाग दिसे. पिंपळपारापासच्या झाडीच्या मध्यातून दिसणाऱ्या त्या दृश्याकडे मी नेहमी पाहत राही.

पार ओलांडून डगरीवर येऊन उभे राहिले की, नदीवरला देखावा अधिक मोठा होई. चिंचेच्या समोर नदीपलीकडे चढत चढत गेलेली, आजूबाजूच्या हिरव्यातून खोदून काढल्यासारखी, तांबड्या मातीची वाट होती. तो पलीकडचा पाणवठा होता. पाणवठ्याच्या दोन्ही बाजूला वाढलेल्या झाडीची गडद सावली वाटेवर पडे. झाडीच्या मागे आकाशातून जुनाट देवळाचे शिखर डोकावे.

पाणवठ्याचा नदीला लागलेला तुकडा घराच्या उंचऱ्यात बसूनही दिसे. पाण्याच्या लाटा तिथे सारख्या आपटत. तो भाग अलीकडे येण्यासाठी हालचाल करतो आहे असे वाटे आणि कधीतरी पलीकडचा सगळा भाग नदीला ढकलत आमच्या अलीकडल्या भागाला चिकटेल नि मधे चिमटल्यामुळे नदी पुढे निघून जाईल असे मनात येई. तो पलीकडचा भाग न बघताही सारखा माझ्या दृष्टीसमोर येई.

मला त्या हालचाल करणाऱ्या भागाला एकदा हात लावून यायचे होते. ती पाणवठ्याची वाट वर कुठे जाणार होती तिथपर्यंत जायचे होते.

पलीकडल्या भागाविषयी विचारले की, तिकडे देवी असल्याचे आई सांगे. तेव्हा देव सगळीकडे होते. आमच्या डोक्यावरल्या आभाळाच्या पलीकडे—स्वर्गात देव होते. वडापुढे नदीजवळच्या देवळात देव होता आणि पलीकडे देवी होती. देवाला कुठूनही दिसत होते. ऐकू येत होते. आमच्या स्वयंपाकघरातल्या खांबातही देव होता आणि त्या खांबाला पायसुद्धा लावायची सोय राहिली नव्हती. तो खांब प्रल्हादाच्या देवाचा होता. हिरण्यकश्यपूने त्या खांबाला लाथ कशी मारली ते दादांनी लाथ उगारून दाखवले होते आणि त्या खांबातून नरसिंह कसा बाहेर आला, त्याने डरकाळी कशी फोडली, हिरण्यकश्यपूला नखांनी कसे फाडले, तेही माझ्या डोळ्यांपुढे उभे राहिले होते.

पण पलीकडल्या देवीसंबंधी घरात जे बोलणे चाले त्यावरून नरसिंहासारखी मला तिची भीती वाटत नव्हती. ती आमची देवी होती. आमच्या कुळाचे रक्षण करत होती. म्हणूनच मी खेळताना ओवरीवरून खोल खाली देवाच्या आवारावर पडून फुटत नव्हतो. म्हणूनच आमच्या घरातले कुणी मरत नव्हते. देवीचे अंबाबाई असेही नाव होते. आई झोपताना "आई अंबाबाई, कृपा कर बाई!" म्हणत असे.

पलीकडे देवीला जायला मला आवडे. नदीवरच्या मोठ्या चिंचेखाली, खाली खोल गेलेली गाळाच्या मातीची डगर होती. डगरीच्या काठाशी नदीचे पाणी येऊन चिकटले होते. एका खुंट्याला लोखंडी साखळीने

चांधून ठेवलेली नाव असे. दादा डगरीवरून पळत खाली जात आणि त्यांना पोहायला येते हे माहीत असूनही त्यांच्या असल्या वागण्याची आईला भीती वाटे. दादा आम्हाला त्या अवघड, घसरणीच्या डगरीवरून खाली यायला सांगत. घाटावर नाव घेऊन येत नसत. पुन्हा ते वर येत. मला खांद्यावर घेऊन परत खाली पळत जात. पाय घसरला आणि आम्ही पडलो तर मी सरळ नदीत वुडेन असे वाटून आई घावरून जाई. तिच्या आधी मी नावेपाशी पोचे. ती हळूहळू खाली उतरे. जरासा पाय घसरला तरी दादा हसत आणि आई रडवेली होई.

दादा मला नावेत वसवत. नावेच्या तोंडाला एका रुवाबदार घोड्याचे लाकडी रंगीत तोंड वसवलेले होते. मी त्या घोड्याचे दोन उभे कान धरून उभा राही. आमची नाव खूप मोठी होती. घोड्याजवळच्या फळ्यांनंतर नावेचा मधला मोकळा तळ दिसे. आत नदीचे पाणी आलेले असे. आम्ही सगळे वसलो तरी नाव वुडत कशी नाही याचे आश्चर्य वाटे. नाव हीसुद्धा एक देवीच होती. पण ती नावेच्या अगदी आत आत न दिसता राहत असावी. नावेत चढताना आई तिला नमस्कार करी.

दादा नावेची साखळी सोडत. नाव ढकलून, पाणी आणि माती यांच्या-मधल्या अंतरावरून पाय टाकून नावेत येत. ते इतका वेळ खाली थांबत की थोडे चुकले तर नाव पाण्यात पुढे जाऊन दादा पाण्यात पडले असते. मग आई आणि मी असलेली नाव कुठल्या कुठे गेली असती...

नावेतली उंच कळकाची चकचंकती पिवळी काठी तिरकी करून दादा डगरीच्या मातीत घुसवत. डगरीपासून नाव कितीतरी पुढे सरे. दादा काठी काढून घेत आणि पुन्हा पाण्यातल्या गाळात रुतवीत. काठी पाण्यातून वर काढली की, तिच्या गुळगुळीत पेरांवरून पाणी सुळसुळत खाली घरंगळे. ते निपटून काढताना दादांचे हात चिंब होत. काठी कुठे किती वुडते त्यावरून दादा पाणी किती खोल आहे ते दाखवत. कुठे कुठे काठी टेकत नव्हती इतके पाणी होते. मध्यावर नदीत चिकट गाळ असे तो दादा काठीच्या तळाने काढून दाखवत. नावेतून दिसणारा भाग डोळ्यात मावत

नसे. पसरलेले निळे आभाळ. दोन्ही बाजूंचे पाणीच पाणी. आणि अलीकडचे-पलीकडचे काठ. पाणी इतके शांत असे की ते कुणीकडून कुणीकडे वाहते आहे, लक्षात येत नसे. मध्येच एखादा मासा पाण्याचे पान कापून बुडे. एखादे कासव पाठ वर काढी. कुठेतरी लांब, मळीत सुसर वर येऊन पडलेली असे.

दादा नाव छान नेत. नावेत डोळे मिटून वसलो असतो तर नाव न हलता आम्ही अलीकडून पलीकडे कसे आलो ते आम्हाला कळले नसते.

पाणवठ्याला नाव टेकायच्या आत दादा काठी आडवी टाकत. उरलेल्या वेगाने नाव आपोआप काठाला लागे. काठापाशी दोनतीन काळेभोर दगड पाण्यात टाकलेले होते. पुढे थोडासा गाळ नि मग आमच्या डगरीसारखी गाळमातीची चढण होती.

पाणवठ्याच्या दोन्ही बाजूंना पात्यापात्यांचे, उंच आलेले आशाळूचे हिरवेगार गवत होते. दोन्ही बाजूंच्या काट्यांच्या कुंपणावरून कितीतरी अनोळखी वेलींची टवटवीत पाने वाटेकडे झुकत होती. डाव्या हाताला करंजांची मोठी झाडे होती.

वाटेवर दोन्ही बाजूंनी झाडे होती. त्यांतल्या उंच गेलेल्या काळ्याभोर सालीच्या बाभळी फार जिवंत वाटत. त्यांच्यात फार ताकद असली पाहिजे. मी त्यांना हलवून पाही. पण त्या मुळीच हलत नसत. दरवर्षी येणाऱ्या नदीच्या पाण्यात त्या पाय बुडवून बसत आणि खूप पाणी पिऊन घेत. म्हणूनच त्या इतक्या वाढल्या होत्या. बाभळीच्या शेंड्यांकडे बघितले की विसकटलेल्या काटक्यांची कावळ्यांची घरटी दिसत. घरट्यातली हलती जाग कळे.

पानांनी झाकलेल्या सौम्य प्रकाशाच्या वाटेवरल्या त्या बाभळींना पिवळी पिवळी फुले लगडलेली असत. त्यांचा खाली सडा पडे नि सगळीकडे सुगंध भरून राही. सगळीकडे बघताना मी चकीत होऊन जाई. बाभळीच्या फुलातले पिवळे कण वाटेवरल्या मातीत मिसळल्यामुळे तिला पिवळसर तांबूसपण आले असेल का असा मला प्रश्न पडे. त्या रंगीत वाटेवर

आसपासच्या वनस्पतींचा उग्र वासही भरून असे. तो नाकातून आत गेला की अधिक ताकद येते आहे असे वाटे. धावत सुटावे असे वाटे. आई नीट बघून चालायला सांगे. बाभळींचे काटे वाटेवर विखुरलेले असत. माझ्या अंगातले रक्त बाहेर येताना त्या वाटेवरच मी पाहिले. काटा घुसला आणि ते भळभळू लागले. आपल्या अंगात तांबडे रक्त असते ही गंमतच होती.

आम्ही देवीला चाललो असताना वरून उधळत आलेली पांढरी गाय आणि तिच्या मागून धावत आलेली एक बाई मी पहिल्यांदा पाहिली होती.

आपण राहतो तिथेच तेवढी माणसे आहेत आणि गावाच्या सगळ्या बाजूने फक्त पसरत गेलेली माती आणि पळत गेलेले आभाळ एवढेच आहे अशी माझी समजूत होती. आपल्या गावात थोरली आई, दादा, आई यांहून आणखी कशी माणसे आहेत आणि हे सगळे काय आहे याचे मला मोठे कोडे पडलेले असे. ती गाय घेऊन येणारी बाई मी पाहिली आणि इथेही वाडीत आपल्यासारखी माणसे राहतात, आणखीही जिकडे-तिकडे माणसे असतात, हे मला कळले.

बाभळीची झाडे संपल्यावर पुढे एक मोठी चिंच लागे. ती विचित्रच होती. एवढ्या मोठ्या चिंचेच्या कितीतरी मुळ्या वरती आल्या होत्या. पाय उघडे ठेवलेल्या ढवेल्या बाईसारखी ती दिसे. पावसाळ्यातल्या पुराच्या पाण्याने तिची मुळे सुटी होऊन उघडी पडत होती. पण म्हणून तिचे काही बिघडत नव्हते. जमिनीत झाडाच्या मुळ्या असतात तशा तिने उघड्यावरच साठवल्या होत्या. चिंचेखाली येऊन बघितले की पुढे, नेहमी पलीकडून दिसणारे, झाडीतून डोकावणारे देऊळ दिसे.

चिंचेला लागून आम्हाला बरोबर आडवा जाणारा, आमच्या मागल्या दाराला होता तसा, रस्ता होता. रस्त्यावर फार फोफाटा असे आणि त्यावर माणसांची तुडवली गेलेली पावले उमटलेली दिसत. ती माणसे कुठून आली असतील, कुठे गेली असतील, कुणास ठाऊक.

रस्त्यालगतच्या राखी खडबडीत चढणीवरून देवळाला पाऊलवाट जात होती. वाटेवरल्या रेशमी काट्याच्या वेली चुकवत जावे लागे. वाळलेला

रेशमी काटा बोचला की पाय हुळहुळायला लागत. एखादे खुरटे बाभळीचे पोर मध्येच उगवलेले दिसे.

सूर्य उगवतो तिकडे देवळाचे तोंड होते. देवळाची डाव्या बाजूची दगडी पाठ पहिल्यांदा दिसे. त्या पाठीला धरून भोवतीच्या आवारावर असलेले दगडी जोते होते. आवारात येऊन पाचसहा पायऱ्या चढून गेले की देवळाचे दार होते.

देऊळ सगळे दगडाचे होते. आमच्या घरासारखे, लाकूड कुठेही वापरलेले नव्हते. देवळाची फरशी ओबडधोबड पण माणसांच्या पायांनी गुळगुळीत झाली होती. नक्षीकाम असलेले चौकोनी खांब दोन्ही हातांना होते आणि खांबांच्या मागच्या बाजूला भिंती होत्या. भिंती आणि खांब यांच्यामधल्या चिंचोळ्या जागेत अंधार होता. त्या जागेला कुठेतरी पडदे दिसत. कुठेतरी वायका बसलेल्या दिसत.

आत आल्याबरोबर डोक्यावर टांगलेल्या घंटा दादा वाजवत. मला उचलून उंच करत आणि मीही घंटा वाजवी. त्यांचा आवाज देवळात घुमत राही. घंटा वाजवून देवीला आल्याचे कळवायचे असे.

डाव्या हाताच्या पहिल्या खांबाला ढोल बांधलेला होता. पुढे गेल्यावर पायाखाली दगडाचे मोठे कासव होते. कासवाच्या डाव्या बाजूला चिंचोळ्या अंधाऱ्या जागेत देवीची शेज होती. तिथे पडदे लावलेले होते. मग पुन्हा एक दगडी चौकट लागे आणि खोलवर आत देवी दिसे.

दादा तिथे सबंध नमस्कार घालत. मला पाया पडायला लावत. उंबऱ्यावर पाकळ्यापाकळ्यांची नक्षी काळसर झालेले पितळेचे तबक होते. तिथे देवीची पूजा करणारा गुरव असे. दादा तबकांत पैसे ठेवत. कोपऱ्यात असलेला अंगारा गळ्याच्या घाटीखाली लावत. मलाही लावत. मग आम्ही सगळे आत देवीजवळ जात असू.

आत फार अंधार असे. तेलाचे, धुपाचे कितीतरी वास नाकात भरत. देवीकडे मी एकटक पाहत राही. आमच्या कुळाचे रक्षण करणारी ती आमची देवी होती. आमच्या कुळातली मागली सगळीजणे तिच्याजवळच

राहायला गेल्याचे मी थोरल्या आईकडून ऐकले होते. देवीचे स्वर्गात घर होते. आणि मधून मधून ती आमच्याकरता इथे देवळातल्या मूर्तीत राहायला येत होती. माझ्या समजुतीप्रमाणे देवी गोरी असावी; पण ती काळीभोर होती. तरी मला ती आवडली होती. तिचे अंग तकतकीत होते. नाक सरळ होते. तिने नथ घातलेली होती. कपाळभर कुंकवाचा मळवट होता. डोक्यावर मुकूट होता. तिने हिरवेगार पातळ नेसलेले होते. दोन्ही बाजूंनी उंच समया तेवत होत्या. आणि कितीतरी ज्योतींचा प्रकाश तिच्या मुखावर पडत होता.

आई देवीपुढे नारळ ठेवी. तिची ओटी भरी. पुजा करणारा गुरव नारळ फोडी. फोडता फोडता भकलातले पाणी देवीच्या अंगावर उडवी आणि अर्धे भक्कल आम्हाला प्रसाद म्हणून देई. आई डोळे मिटून देवीपुढे उभी राही. मीही मग डोळे मिटी. देवी पुण्यवान माणसाबरोबर बोलते तशी माझ्याबरोबर बोलेल असे वाटे. डोळे मिटल्यावर एकएक वेळ वाटे की, आपण न बघितलेल्या अशा कुठेतरी गेलो आहोत आणि देवी आपल्याशी न कळणारे काही बोलते आहे.

गाभाऱ्यात आमचा कितीतरी वेळ जाई. देऊळ फार फार वर्षांपूर्वीचे कसे आहे, त्यातले नवीन जोडलेले भाग कुठले आहेत, यावर दादा बोलत. आमच्या पलीकडच्या देवाला तिने उजेडात आणल्याची गोष्ट सांगत. त्या ब्राह्मणासारखी बुद्धी देवीजवळ मागायला आई, मला सांगे आणि तो ब्राह्मण जसाच्या तसा माझ्या डोळ्यांपुढे येई :

काहीसुद्धा बुद्धी नाही म्हणून सगळ्यांना नकोसा झालेला तो ब्राह्मण देवीकडे आला होता. तिच्याजवळ बुद्धी मागत होता. तोंडात पाणी न घालता उपवास करत होता. पण देवी प्रसन्न होत नव्हती. त्याने आपली जीभ कापून देवीला वाहिली. मग देवीने त्याला सांगितले, "पलीकडे औदुंबराच्या झाडाखाली बसलेल्या यतीकडे तू जा." रात्र झाली होती. तसल्या अरण्यातल्या काळोखात तो उठला. एवढ्या मोठ्या नदीत त्याने उडी टाकली होती. त्याने आमच्या दादांच्यासारखेच पाण्यात हात

मारले असतील. त्या वेळी सुसरी होत्या की नव्हत्या? त्याला भीती कशी वाटली नाही? देवीनेच त्याला बुद्धी का दिली नाही? त्याला पलीकडे का पाठवला? आणि हे मला कसे कळले नाही? त्या वेळी मी कुठे होतो?

गाभाऱ्यातून बाहेर येताना देवीची शेज होती. तिथे रात्री देवी झोपायला जाई. रात्री व्यवस्थित करून ठेवलेली देवीची शेज सकाळी कशी विसकटते, देवी झोपल्यामुळे तिथे कशा चुण्या पडतात, ते तिथली गुरवीण सांगे.

उजव्या हाताला, खांबाच्या पलीकडे फरशीवर, एक मोठा चौकोनी पण फरशीपासून सुटा झालेला दगड दिसे. ती देवळाच्या खाली जाण्याची वाट होती. देऊळ खालून पोकळ होते. पार पांढरा झालेला गुरवातला कुणीतरी म्हातारा ते भुयार नदीच्या खालून पलीकडे जात असल्याचे सांगे. भुयाराची एक वाट नदीच्या खाली असलेल्या देवळात जात होती. मला इच्छा होई : तो दगड काढावा. दादांच्याबरोबर भुयारातल्या अंधारात उतरावे. नदीखालून एकदम आपल्या घरात निघावे. नदीखालच्या देवळातसुद्धा जाऊन तिथे कोण असेल पाहावे.

बाहेरचे, देवळाच्या कळसापासचे, कन्नऱ्या रंगाचे शिल्पकाम कितीही वेळ पाहिले तरी पुरे वाटत नसे. देवळाचा सोन्याचा कळस जुना झाल्यामुळे एका बाजूला कलला होता. देवळावरली जुनी, दाटीवाटीने खोदलेली चित्रे हेमाडपंताच्या वेळची असल्याचे दादा म्हणत.

ते देऊळ जणू कुणी बांधले नव्हतेच. झाडाप्रमाणे आपोआप ते जमिनीतून वर आले होते. देवळासमोर दीपमाळेचा कट्टा होता. आभाळाकडे निमुळत्या होत गेलेल्या, काळ्याभोर दगडांच्या दोन दीपमाळा एकीपाठोपाठ उभ्या होत्या. दिवाळीतल्यासारख्या दगडी पणत्या त्यांच्यावर बसवलेल्या होत्या. सगळ्या पणत्या वर्षातल्या एका काळोख्या रात्री पेटवल्या जात. तो काळोख मी मनात आणून पणत्यांचा प्रकाश कसा दिसत असेल ते पाहत असे.

पाठीमागच्या दीपमाळेच्या कट्ट्याखाली आणखी काही लहान देव होते. भैरोबा होता. कुठली तरी भुतांची देवी होती आणि अवसेच्या अंधाऱ्या रात्री भुतांची पालखी 'त्या' तिकडल्या रानातून येऊन कशी उतरते ते गुरवीण सांगू लागली की अंगावर काटा येई.

देवळाला प्रदक्षिणा घालताना आमच्या डाव्या हाताला लागणारी कौलारांची सारी घरे गुरवांची होती. उजव्या हाताला देवीच्या देवळाला लागून महादेवाचे जुने लहानसे देऊळ होते. दारात दगडाचा गुटगुटीत नंदी बैठक मारून असे. देवळाच्या पाठीमागे, खाली, सगळे हिरवेगार दिसे. आम्ही आलो ती वाट, चिंच, जवळची बाभळीची झाडे...

देवळाच्या डाव्या भिंतीतून डोकावणाऱ्या गोमुखीखाली तीर्थाचे दगडी कुंड होते. त्यातल्या देवीच्या तीर्थाला आंबूसदाट असा एक वास असे. देवीच्या स्नानाचे पाणी कुंडात येऊन साठत होते. आई मला उंच करून त्या खोल कुंडातले पांढरट तीर्थ दाखवी. स्वतः ओणवून तीर्थात उजवा हात भिजवी. डोळ्यांना लावी. माझ्या डोक्यालासुद्धा. ते लावले म्हणजे नायटे होत नव्हते.

तिथल्या भिंतीच्या लहानशा पुढे आलेल्या पट्टीवरून दादा कधीकधी नाव कुणी पलीकडे नेली आहे का पाहत. झाडीतून त्यांना पलीकडे बांधलेली नाव दिसे. नाही दिसली तर ती अलीकडेच आहे असे ठरवत. आम्ही वाडीत आलो की अलीकडे असू आणि आमचे गाव पलीकडे राही हे अद्भुतच होते.

तीर्थाच्या कुंडाजवळ मोठमोठे गोल दगडी गुंड पडलेले असत. रात्री तिथे देव गोट्या खेळायला आले होते आणि ते सकाळी जाताना विसरून गेले आहेत असे दादा सांगत आणि एवढ्या मोठ्या गोट्या मावणारी देवांची बोटे केवढी असतील ते मी हर्वेत शोधू लागे. त्यातली गोटी उचलायला गेलेला रंगा गुरव कसा रक्त ओकला ते सांगता सांगता दादा एक गोटी उचलून छातीपर्यंत घेत, दाणदिशी जमिनीवर आदळत, आणि दादांना काही झाले नाही ना हे पाहताना आई एकदम बोलायची बंद होऊन जाई.

परतताना नदीच्या वाटेच्या डाव्या बाजूस लागणाऱ्या मळीत एक लहानसे पडत चाललेले देऊळ होते. तिथे कुणीही जात नव्हते. उत्सुकतेने आम्ही एकदा ते पाहायला गेलो होतो. सगळीकडे गवत वाढले होते. पायांनी वाट पाडत आम्ही तिथे पोचलो. ते काळ्या अनघड दगडांचे देऊळ पुराच्या पाण्याने निखळत चालले होते. दोनतीन माणसे वाकून मावतील एवढी आत जागा होती. आत काहीही नव्हते; फक्त जुनाट वास होता. पूर्वीच्या कुठल्या तरी यतीची ती ध्यानाची जागा असली पाहिजे. त्याचे कुणालाच काही नव्हते. मळीच्या मालकाने ते पडत चाललेले दगड एक दिवस फेकूनहि दिले असते. देवळाची नदीच्या बाजूची भिंत अजून बरी होती. तिला एक भोक ठेवलेले होते. त्यातून थेट आमच्या पलीकडच्या देवळातल्या पादुका दिसत. तिथल्या निरांजनांत तेवणाऱ्या दोन ज्योती दिसत. त्याच्या अलीकडे नदीचे पाणी. देवळाच्या थोड्या वरच्या बाजूला पाण्याखाली ते भुयाराची वाट गेलेले देऊळ होते आणि नदीतल्या देवळाच्या समोर पलीकडे मठ उभा होता. फार फार वर्षांपूर्वी काहीतरी झाले होते खरेच. त्याच्या त्या उरलेल्या खुणा होत्या.

दादा सांगत, त्यावेळी आपले हे सगळे अरण्य होते. सगळीकडे अंधार होता. आणि नदी देवीच्या देवळाजवळच्या चढणीला घासून वाहत होती. पुढे नदी आमच्या गावाकडे सरकली आणि ते देऊळ पाण्याखाली गेले. ते ऐकून आपल्याला हे आठवत कसे नाही असे वाटे. कधीकधी आमच्या घरात काही बोलणी निघत. बोलण्यातल्या गोष्टी झाल्या त्या वेळी मी नव्हतो असे आई म्हणे आणि मला रडायला येई. मी नसेन कसा!... आई मग म्हणे, "बरं बाबा तू होतास." आपण कधी नव्हतो हे मला खरे वाटत नसे. आपण मोठे झालो की पुन्हा लहान होतो. लहान झालो की पुन्हा मोठे, असे वाटे. नदी सरकता सरकता आमच्या घराच्या पलीकडे जाणार होती का? मग आमच्या घराचे काय होणार होते?

दिवस संपत आलेला असे. आमच्या वडावरली वाघळे उठून नदीवर पाणी पिण्यासाठी घिरट्या घालू लागत. बगळ्यांच्या पिवळ्या पायांच्या

पांढऱ्या माळा झपाझपा परतत असत आणि पसरलेल्या शांत पाण्यात आमच्या गावाचे रूप उलटे पडलेले दिसे. पलीकडून पहिल्यांदाच दिसणारे ते रूप पाहून मला फार आनंद होई. सबंध गाव लांब गेल्यावरच पाहता येते हे कळे. समोरची उतरत आलेली डगर. वरची चिंच. पिंपळा-वडांचे आभाळात गेलेले हिरवे झुबके. पिंपळपारापलीकडे दिसणारा आमच्या घराच्या कोपऱ्याचा ठिपका. डगरीजवळची उंबरांची झाडी. लगतचा कितीतरी पायऱ्यांचा काळा घाट...आमचे गाव वाडीला पाहत असे...वाडी आमच्या गावाला पाहत असे...पाण्यामधल्या झाडांच्या काळ्याहिरव्या सावल्या अधिक काळ्या होत चाल्लेल्या असत...सगळे एकमेकात मिसळत जाई...

त्या रात्रीही झोपेत मी पलीकडे गेलेला असे. देवीच्या देवळातल्या भुयारामधून नदीखालच्या देवळात पोचलेला असे. कितीतरी वेळाने नदीतली एक काळीभोर सुसर देवळात येई आणि मी घाबरून उठे.

गावातली बायकामाणसे मंगळवारी, शुक्रवारी पलीकडे देवीला जात. पलीकडल्या जवळच्या वस्त्यातल्या खूप बायका येत. पण कुठल्याही गर्दीत जाणे आईला नको असे. गर्दी नसलेल्या दिवशी आम्ही पलीकडे जात जाणे असू. तरी वाडीतल्या गुरवांची गोरी म्हातारी माणसे देवळाच्या दारातच बसलेली असत. आमच्याकडे कुतूहलाने बघत आणि दादांना "काय पंत—देवीला?" विचारत.

देवीच्या नवरात्रात पलीकडे जायला हुरूप वाटे. देवी रोज आपले रूप बदली. कधी सिंहावर बसून राक्षसाला मारत असे. कधी मोरावर बसे. असे नऊ दिवस चाले. उद्या देवीने कुठले वस्त्र नेसले असेल याची उत्सुकता लागे. माझी समजूत होती की, देवी स्वर्गातून येताना बदलून येत असावी. पण मग तिथला गुरव देवीला वस्त्रे नेसवतो ते दादांच्या बरोबर एका सकाळी लवकर जाऊन मी पाहिले.

नुकतीच पहाटेची सनई वाजायची थांबली होती. भारद्वाज झाडीतून ओरडत होते. कितीतरी पक्ष्यांचे आवाज मिसळून ऐकू येत होते. देवीच्या

अंगावर काहीसुद्धा नव्हते. तिचे अंग काळेशार, लोण्यासारखे गार पण टणक होते. आमच्या आईइतकी तिची उंची होती. तिला चार हात होते. एका हातात नररुंड होते. ती महाकाली होती. तिचे चांदीचे डोळेसुद्धा गुरवाने काढून ठेवले होते. ती डोळ्यांवरची तांबडे खडे बसविलेली चांदीची टोपणे कुणीतरी नवसाकरिता दिली होती. पण ती काढूनच देवी छान दिसे. खरी वाटे. तिच्या अंगावर काही नसतानाच स्वर्गातून येणारी तिची शक्ती त्या मूर्तीत शिरत असेल असे वाटे. देवीचे कपाळ गुरवांनी रोज मळवट भरून थोडे आत गेले होते. खरे म्हणजे गुरवांनी तिला फक्त स्वच्छ स्नान घालायला हवे होते. पांढरी फुले वाहायला हवीं होती.

देवीला ऊन पाण्याने स्नान चाललेले असताना समोरून सूर्य उगवे. आणि सूर्याचे पहिले किरण देवीच्या मुखावर पडत. मुखाचा भाग मंद तांबूसपिवळ्या रंगाने खुले. धूप पडे. गाभारा भरून जाई. देवीच्या स्नानाचे दही, दूध, अत्तर आणि पुजेची फुले यांचा दरवळ त्यांत मिसळे. आरत्यांची मोठी निरांजने पेटत. आरती सुरू होई. मोठ्या झांजांचा गजर होई. दारातल्या खांबावर बांधलेल्या ढोलावर एक एक काठी पडे आणि लय जलद होई.

नवरात्रात रोज आमच्या घरातून पलीकडे देवीला नैवेद्य जाई. दादा तांबडे सोवळे नेसत. गंध लावत आणि पुरणपोळीच्या जेवणाचे झाकलेले ताट घेऊन नावेने जात. मी त्यांच्याबरोबर जाई. देवीला नैवेद्य पोचल्याशिवाय घरी जेवायचे नसे.

नवरात्रातल्या शेवटच्या दिवशी देवीची यात्रा भरे. आवारावर कडब्याच्या पिवळ्या पेंड्या टाकून मंडप घातला जाई. सगळीकडे माणसेच माणसे असत. या माणसात आपण कुठे चुकलो तर काय होईल, असा विचार मनात येई. दीपमाळेपासच्या चौथऱ्यावर देवीकडे तोंड करून पालखी आणून ठेवली जाई. ती पालखी आमच्या इथल्या पालखीसारखी वाटायची नाही. आमच्या पालखीसारखे तिचे दांडे चांदीचे नव्हते. तिच्यात हिरव्या डोळ्यांचे, फिसकारलेल्या मिशांचे वाघाचे रागीट तोंड

नव्हते. त्याचे कातडे नव्हते. पालखीपुढे बकरे मारत. चारी पायांवर उड्या मारणारे ते जिवंत बकरे केवढ्यांदा तरी ओरडे. तलवारीच्या दुसऱ्या घावात त्याचे मुंडके तुटून पडे. रक्ताच्या उसळ्या सगळीकडे सांडत. ते बकरे मारणे हा पाटलाचा मान होता.

दादा सांगत की, आपली देवी कालीमाता आहे. तिला रक्ताचा नैवेद्य लागतो. ते रक्त बघून मला सुचेनासे होई. पलीकडून येताना काट्याने पायातून आलेल्या माझ्या थोड्याशा रक्ताची आठवण येई. दादा मला आत घेऊन जात आणि देवळात खांबांवरती लावलेली, रक्त सांडलेली चित्रे दाखवत. एका चित्रात कालीमातेने एका राक्षसाचे मुंडके उपसून काढले होते. आणि ते हातात घेऊन ती आकाशात अधांतरी डोळे वटारून उभी होती. रक्ताच्या चिळकांड्या जमिनीवर उडत होत्या. खाली राक्षसाचे मुंडके नसलेले शरीर पसरले होते. दुसऱ्या चित्रात ती सिंहावर बसली होती. तिच्या प्रत्येक हातात काहीतरी शस्त्र होते. पायाखाली घेऊन एका मोठ्या राक्षसाला ती ठार करत होती. तिच्या सगळ्या बाजूंनी आणखी राक्षस होते. तेही मरत होते. भिऊन ओरडत होते. जिकडेतिकडे रक्ताचा चिखल झाला होता.

आमच्या सर्व बाजूंनी नेहमीच न दिसणारे राक्षस होते. त्यांनाही आमची देवी मारून टाकत होती. चांगले वागणाराचे चांगले करत होती. पण मग त्या पालखीपुढे मारलेले कोकरू काय वाईट वागले होते?

संध्याकाळी देवीची पालखी निघे. पण आमच्या इथल्या पालखीसारखे तिला कुठे टप्पे नव्हते. ती कुठे थांबत नव्हती. तिच्यापुढे कुणी गाणे म्हणत नव्हते. ती धरणारे लोक अंगात कपडे घालत आणि पालखी घेऊन गडबडीने पळत पळत प्रदक्षिणा घालत. त्यांच्यामागें ती तशीच गोंधळलेली माणसे झुंडीने जात. ते सगळे चमत्कारीक वाटे. पालखी संपली तरी यात्रेची रात्र गजबजती असे. रात्रभर पलीकडे लळीत चालल्याचे घरातून कळे.

...आमची चिंगूआजी पलीकडे राहत होती. आमच्याबरोबर आई आलेली असली तर आम्ही आजीकडे जात नसू. तिच्याकडे फार वेळ

मोडे. पण कधीतरी आम्ही तिच्या दृष्टीस पडलो की ती फार रागवे. अर्ध्या वाटेवरून आम्हाला परत नेई.

पिवळ्या चकचकीत गुंडीतून दूध घेऊन रोज सकाळी नावेने ती आमच्याकडे यायची. ती एवढीशी दिसे. देवीसारखे खूप मोठे कुंकू लावी. हिरवेगार पातळ नेसे. आमच्या थोरल्या आईइतकी ती होती; पण तिचे केस काळेभोर होते. एखाद्या मुलीसारखा तिचा आवाज होता आणि सगळ्यांना चिंगू आली नाही की चुकल्यासारखे होई. ती तरतर चालायची. तिच्या घरीसुद्धा तिला फार वेळ बसलेली मी पाहिली नाही. ती मला कडेवरसुद्धा घेऊन जाई. तिच्याकडे आमची पलीकडची मळी होती.

देवळाच्या आवारापलीकडच्या दगडी कमानीतून बाहेर पडले की दोन्ही हातांना वाडीची कौलारू घरे लागत. बाहेर उभी राहिलेली जनावरे आम्हाला बघून बुजत. कान हलवत. श्वास रोधून धरत. चळचळ मुतत. मुताचा खमंग वास सुटे. वाडीची घरे होती तो भाग उंचावर वसलेला होता. पावसाळ्यात पुराचे पाणी आले तरी तेवढा टवका पाण्यावर राही. फार वर्षांपूर्वी देवीची पूजा करण्यासाठी त्या रानात गुरवांची दोन घरे आली आणि त्यांचा इतका वेल वाढला होता.

चढउतार, सगळीकडे साचलेला सळसळता पिवळसर काळा पाला, काड्यांच्या पांजराच्या कुंपात वाढणारी झाडे, मऊसर माती यातून वाट जात होती. वाट अशी नव्हतीच. दोन्ही बाजूंच्या घरांच्यामध्ये उरलेल्या कुठल्याही जागेतून जावे. डाव्या हाताला दुसऱ्या बोळात वळले की आजीचे घर येई. समोर सगळा चगाळा असे. बाहेरची दावण जनावरांनी भरलेली असे. शेणामुताचा उग्र वास येई. दावणीला एक मोठी म्हैस बांधलेली असे. त्या म्हशीची गोष्ट आजी नेहमी सांगे.

ती म्हैस आमच्या थोरल्या आईच्या वडिलांनी घेऊन दिलेल्या म्हशीची नात होती. ती कुढल्याही वेळेला धार देत होती. आम्ही आलो की आजी ऊन-ऊन धारेचे दूध प्यायला देई. त्या म्हशीच्या वंशाने आजीचे घर पुढे आले होते. म्हणून ती तिला फार जपे. "माझी गुणाची" म्हणत तिच्यावर

माया करी. आजीचा कारभारी घरातून भांड्न बाहेर पड्न एका वस्त्रानिशी इथल्या वार्डात आला होता. मग त्याला आमच्या थोरल्या आई्च्या वडिलांनी म्हैस घेऊन दिली होती. आमची मळी करायला दिली होती. आणि काहीही घेऊन न आलेल्या कारभाऱ्याने घर उभे केले होते. चिंगूआजीशी लग्न करून तिला आणले होते. याचा आजी पाढा वाचे. आमच्या दादांना आपला मुलगा समजे. तिचा थोरला मुलगा आमच्या दादांच्याएवढा होता.

आत काळेभोर जावळाचे घोंगडे टाकलेले असे. शेणाने सारवलेल्या, जोंधळ्यांनी भरलेल्या कणग्या उभ्या असत. वियाच्या जोंधळ्याच्या पाच-सहा कणसांची जुडी मध्ये टांगलेली असे. आजी आतल्या खोलीत जाई आणि सूपभर वाळलेल्या शेंगा आमच्यापुढे आणून ठेवी. गुळाचे खडे ठेवी. आमच्यापुढे किती नि काय ठेवावे असे तिला होऊन जाई.

आजीबरोबर कधीकधी त्या खोलीत मी जाई. शेंगा सुपात पडण्याचा आवाज कुठून येतो ते मला पाहायचे असे. फक्त शेंगांच्या आवाजावरून जागा कळे; पण आतल्या दाट काळोखाने काहीही दिसत नसे. तिथल्या काळोखाला गार आणि विचित्र असा वास होता.

खोलीला लागून असलेल्या आजीच्या स्वैपाकघरात सारखा धूर असे. तो डोळ्यांना तिखट लागे. आजीचे स्वैपाकघरसुद्धा नेहमी पांढऱ्या मातीने लखलखीत सारवलेले असे. फुटलेल्या बांगड्यांच्या काचा दिव्यावर धरून वाकवून भिंतीत रुतवलेल्या असत. त्यांची हिरवीगार वेल तयार केलेली असे. तिलां मधूनच काचांची तांबडी फुले असत. जोंधळ्याचे कणीस असलेले ताटाचे चित्र कावेने आणि चुन्याने कुठेतरी काढलेले दिसे.

स्वैपाकघराच्या चौकटीत उभे राहिले की सांडपाण्याचा ओला वास नाकात भरे. लहानलहान जांभळी फुले लगडलेली एक वेल बारा महिने तिथे हले. दारातून पाठीमागची घरे दिसत. त्यांच्यामागे आमच्या मळीला गेलेली वाट, सटवाईची चिंचांची झाडी दिसे.

आम्ही सगळे आजीकडे गेलो की तिला आनंद होई. आमच्या आईला भेटायला शेजारच्या, आजीच्या भावकीतल्या गुरवांच्या बायका येत.

परतताना लागणाऱ्या दगडी कमानीतल्या कट्ट्यावरती आई थोडी बसे. डाव्या हाताच्या कट्ट्याला सासर म्हणत. मग उजवीकडे बसायचे. ते माहेर होते.

चिंगूआजीकडे दादा आणि मी खूप वेळा जात असू. आजीला सारखे बोलायला हवे असे. तिचे सगळे देवीच्या विश्वासावर चालायचे. तिच्या अंगात कधीकधी देवी येई. कधी तिला 'द्रिष्टांत' होत. देवीचा एकच हात कसा हलला, देवी पाठमोरी कशी वळली, ते ती दादांना सांगत राही. ते सांगताना आपली चिंगूआजी ती ही नव्हे असे वाटे. इतकी ती वेगळी दिसे. दृष्टांतातल्या देवीच्या हालचाली ती स्वतः करून दाखवी आणि त्या तिने खरेच पाहिल्या असतील हे पटे.

आजीला रात्री स्वप्ने पडत आणि त्या प्रत्येक स्वप्नात कुठेतरी देवीचा संबंध असे. तिच्या स्वप्नांची तिच्या घरच्या लोकांना किंमत कळत नव्हती याचे कधीकधी तिला वाईट वाटे. मग ती आमच्या दादांना तेवढी ती स्वप्ने विश्वासाने सांगे. दादा न कंटाळता ऐकून घेत. काही काही स्वप्नांचे न लागलेले अर्थ ती दादांना विचारी. पण ते सहज म्हणून—खरे म्हणजे माणसांकडून कसले उत्तर तिला नकोच होते. ती कधी कोड्यात पडली की त्या दिवशी संध्याकाळी लवकर जेवण करून झोपून टाकी. आणि थेट स्वप्नात जाई. आम्ही पलीकडे जावे, तशी. स्वप्नात ती कुठेतरी सारखी शोधत राहत असावी. तिला देवी भेटे आणि ती जागी होई. तिचे कोडे सुटलेले असे. कधीतरी, उद्या होणारे बरेवाईट ती दादांपाशी, दुसरे कुणी आसपास नाही असे पाहून, हळू बोले.

आम्ही दुपारी गेलो की आजीकडून परतायला रात्र व्हायची. चांदण्याचे परतताना मजा वाटे. वाटेने पसरलेली सावल्यांची नक्षी, पलीकडचा चांदण्याने चकाकणारा घाट, डगरीवरली उंबरांची झाडी, मुळी न हालणारे चांदी पसरल्यासारखे पाणी, घरी गेल्यावरही झोपेत येई.

पण काळोखाचे दिवस असतानाही आजीकडचे बोलणे सरायचे नाही. आजी भानावर येऊन दादांना उठायला सांगे. "सूनबाई वाट बघल"

म्हणे—आणि एक जुना भगभगता कंदील घेऊन आम्हाला पोचवायला येई. सगळीकडल्या काळोखात कंदिलाचा तांबूस प्रकाश पोचून दिसणारा भाग फार वेगळा वाटे. मनावर उमटून राही. चढण उतरून गेल्यावर चिंचेपाशी काळोख दाट होई. रातकिडे जोरात ओरडत. कुठल्या तरी कंजाळावरून घुबड घूऽ करी. पाणवठ्यापाशी काजव्यांचे हिरवे दिवे लागत. मालवत. आजी आम्हाला कंदील घेऊन जायला सांगे. पण तिने अंधारात जाण्यापेक्षा आम्ही जाणे सोपे होते. नावेपाठच्या काळ्याभोर पाण्यातून आजीच्या कंदिलाच्या उजेडाची तांबूस रेघ आमच्या पाठोपाठ येई. पलीकडून अलीकडेपर्यंत ती उजेडाची लांब रेघ आलेली असे. त्या रेघेला शिवले तर अलीकडून पलीकडे उभ्या असलेल्या आजीला शिवल्यासारखे झाले असते. आम्ही नाव बांधून वर चढेपर्यंत आजी कंदील हातात घेऊन उभी राही. मग माघारी फिरे आणि एकदम आजीचा कंदील दिसेनासा होई. दादा म्हणत, "चिंगूचा कंदील भडकला वाटतं!" नि आजी त्या पलीकडल्या अफाट काळोखात गडप होऊन जाई...

आपण पलीकडे गेलो आहोत असे स्वप्न मला नेहमी पडत होते. कळता न कळता मन तिथून भटकून येत होते. तिथल्या आवारातले दगडी गुंड पाहत होते. दीपमाळांच्या पणत्या मोजत होते. दीपमाळांपलीकडल्या चिंचांच्या झाडांच्या चित्रविचित्र सावल्यात दुपारी हरवत होते. चिंचांच्या पुढे पूर्वेला दूरवर मोकळे रान दिसे. आमच्या डोक्यावरून उंच गेलेले आभाळ वाकून टेकलेले दिसे. टेकलेल्या आभाळापाशी तांबूस धूसर आकार दिसत.

मोकळे रान तुडवत पहिल्यांदाच मी एकदा दादांच्याबरोबर गेलो. तांबूस धूसर आकार स्पष्ट झाले होते. तिथे आगगाडीचे स्टेशन होते. एक केवढीतरी आगगाडी माणसांना घेऊन आली आणि धावत गेली. गाडी-मागून रूळ धावत जात होते. सगळेच न वघितलेले मी बघत होतो.

आणि आभाळ तिथे टेकलेले नव्हतेच. तिथून ते आणखी पलीकडे गेले होते...

आईबरोबर उघड्या आभाळाखालून चालताना कधीकधी मी अगदी अस्वस्थ होऊन जात असे. पाठीमागून पुढून, चहूबाजूंनी कुणीतरी भुरभुरत्या सुखाने व्यापून टाकी. माझे डोक्यावरले केस उडवी. आणि अंगावर स्पर्शाने जाणवणारे कोण आहे याचा शोध घेत मी स्वतःभोवती घुटमळे. पण आईशिवाय कुणीच नसे. त्या न दिसत्या, हेलावत्या सुखामुळे काय करावे ते मला कळेनासे होई.

आईच्या अंगावरून कसलीशी चुण्याचुण्यांची लाट तरळून जाई. समोरच्या झाडांची पाने हळूहळू हलत...दुपारी उन्हाच्या वेळी गलबलत असताना दादा कपाळावरती फुंकर घालत. डोळे उघडता-मिटताना, पापण्यांच्या टोकांना थांबवून घेणारे स्तब्ध तळ अगदी लहानशा हालचालीखाली येत. समोरच्या झाडांच्या महिरपींतून दिसणारे नदीवरले आभाळ सरकल्यासारखे दिसे. सारखे सगळीकडे काहीतरी बदलत चाललेले असे. आणि हे सारे एका कारणाने घडते आहे, असा मला भास होई.

न दिसणाऱ्या वाऱ्याविषयी आई तेव्हा बोले. वारा झाडावर राहतो आणि तो तिथून उठला की त्याला बोलवायसाठी झाडांची पाने हलायला लागतात, असे तिने मला सांगितले होते. वारा दिसत का नाही, त्याचे रूप

[illegible] ..... [illegible]

[illegible] ..... [illegible] ..... विः .....

[illegible] ..... नोः विः .....

कसे असते, तो राहतो कुठे, अशा मनात येणाऱ्या कितीतरी प्रश्नांमागे मी धावत जाई.

वाऱ्याचे घर आकाशात आहे, वरती एक वाऱ्याचा तारा आहे, असे लिनी म्हणे. एका काळोख्या रात्री तिने 'वाऱ्याचा तारा' म्हणून एक उंचावरला ताराही मला दाखवला होता. 'राहायला ताऱ्याचे घर' ही गोष्ट किती छान होती! लिनीला असले काही नेहमी आठवे. आणि खरोखरी वारा आल्यासारखी ती आमच्या घरात येई. ते सांगून टाकायला वाराच जणू तिला उचलून आणी. क्षणभरही जागेवरती न ठरण्याच्या तिच्या गुणामुळे थोरली आई "कारटीच्या पायांवर नक्षत्र पडले आहे!" म्हणे. ते नक्षत्र वाऱ्याचेच असावे...

थोरली आई कधीकधी वाऱ्याला भूत म्हणत असे :

पांढरेफकफकीत दिवस येत. उन्हाने सगळे तापून चाललेले असे. उन्हाच्या उतरत्या वेळेला, नदीवरल्या पोकळीवर पलीकडून आलेल्या वाऱ्याच्या धुळीचे चक्र फिरायला लागे. विलक्षण आवाज करत गावात शिरू बघे. देवाच्या आवारावरल्या पिंपळाला शिवून ते भवतीच्या मोठमोठ्या झाडांच्या पोटांना वेढा घाली. वडाखालच्या निवळ पोकळीत धूळ भरे. देवाच्या आवारावरला प्रचंड पिंपळ गदगदायला लागे. दोन्ही बाजूंनी डोळे झाकून घेतल्यासारखी त्याची पाने आकाशाकडे तोंड करत. नि तो मुळांसकट वरती जाईल असे वाटे.

पिंपळाच्या पांगाऱ्याच्या एकमेकींना घसटून वाढलेल्या दोन उंच उभ्या मुली गांगरून जात. आपल्या पानांच्या पोपटी, पुटपुटत्या पापण्या न मिटता त्यांच्यावरची मोठी चिंच त्या मुलींकडे बघत भीतीच्या सावलीतले हसू आणी. मुकुंदमहाराजांचा कडूलिंब, आमच्या घरासमोरची चिंच, तिच्या खालचा अवाढव्य वड—या सगळ्यांना वाऱ्याची जाणीव झालेली दिसे. दिगंबरशास्त्र्यांच्या कोपऱ्यावरल्या पिंपरणीकडे पाहवत नसे. सगळे संपून गेले आहे अशा अवस्थेतल्या, केस गळून चाललेल्या बाईसारखी ती दिसे. तिच्या पोटात पडलेली एक रुखी चीर वाऱ्याने अधिकच केविलवाणी होई.

आमच्या दारातल्या चिंचेचे कितीतरी शरीर वडाच्या विस्तारात शिरलेले होते. तरी ती वडाशी आणखीनच जवळ झुके. तिची उंचावरची फांदी वडाच्या एका दुवेळक्यात एकदा इतकी घट्ट जाऊन बसली की, पुढे तिथे ती तशीच राहिली होती.

पांगाऱ्याच्या मुलींच्या अंगावरून येणारा वारा, पुढे होऊन, देवाच्या बागेला लागून असलेल्या बाळंभटजींच्या घराच्या भिंतीला धडका देई. मुकुंदमहाराजांच्या मठींत जाई. मिरजकरांच्या धर्मशाळेत शिरे. तिथे राहणारी सोवळी जानकीकाकू "आता काय करायचे?" म्हणत दोन पायात डोके खुपसून बसे. तिथून वारा आमच्या घराची भिंत धरून वर जाणाऱ्या पंडितदादांच्या बोळातून घुमत जाई.

काका त्या वाऱ्याला इतका भिई की, आपल्या पूर्वेकडे असलेल्या घराच्या गजागजांच्या खिडकीला पोती लावून बसे. वारा खिडकीवाटे आत येऊन घराचा पत्रा आकाशात उडवून लावील असे त्याला सारखे वाटे. काकाचे तेवढ्यानेही समाधान होत नसे. तो पत्र्यावरती मोठमोठे दगड नेऊन ठेवी. त्याच्या घराची चकचकीत पत्र्याची पांढरी पाने मोठ्या वगळ्याच्या पंखा-सारखी, वाऱ्याने आकाशात गिरकत गेल्याचे गमतीदार चित्र माझ्या नेहमी डोळ्यांपुढे येई. पण ही गंमत रागीट काकाला बोलून दाखवणे शक्य नव्हते.

पाण्यातल्या भोवऱ्यासारखा गरगरत वर जाणारा धुळीचा भोवरा वाऱ्यामुळे आवारात तयार होई. खाली थांबलेला हलका पाचोळा त्या चक्रातून वर जाई. आवारातली सुटी माती वारा निपटून वर नेई. थोरली आई परचक्राविषयी काहीतरी त्या वेळी बोलत असे. आणि त्या परचक्राचा वाऱ्याच्या चक्राशी काहीतरी संबंध असला पाहिजे असे वाटे.

वारा सुरू झाला की, सारीजणे घराकडे पळत सुटत. घरी पोचेपर्यंत घाटावर पाणी आणायला गेलेल्यांच्या जिवात जीव नसे. वडाखालचे चिंचोक्यांचे, गोट्यांचे खेळ थांबत. गावातल्या साऱ्या घरांची दारे बंद होत. मी, आई, थोरली आई आमच्या लाकडी गजांच्या लहानशा खिडकीतून एकत्र डोकी घालून, बाहेर चाललेला तो वाऱ्याचा विचित्र खेळ पाहत असू.

कुणाच्या तरी घराचे पत्रे उडून गेल्याचा आवाज येई. मागे कधीतरी, वाऱ्यामुळे उडालेल्या पत्र्याने कापून टाकलेल्या उंच महेश्वरकाकाची गोष्ट आईला आठवे. त्याच्या निळ्यातांबड्या रक्ताच्या, वाऱ्याने उंचावलेल्या लाटा डोळ्यांपुढे येत. कुणाचे कडब्याचे छप्पर उसकटून गेलेले असे. वाऱ्याच्या वाढलेल्या वेगामुळे धुळीशिवाय दुसरे काही दिसेनासे होई. आणि काय झाले आहे ते कळेनासे झाल्यामुळे वाऱ्याबरोबरीने वानरे आपलाही धुमाकूळ सुरू करत. कौलांवरून, पत्र्यांवरून उड्या ठोकत, 'हुप्प' असा आवाज काढत ती वातावरणाची भीतिदायक लय वाढवत. कधीकधी दादा बाहेर गेलेले असत आणि त्यांच्या धडपड्या स्वभावामुळे ते कुठे असतील याची आईला काळजी लागून राही.

झाडांचे ढापे एकमेकावर आपटून कडकडत नि आई एखादा लहानसा, भीतीचा सुस्कारा सोडी. या झाडांना, गावच्या घरांना, वारा तळापासून उचलून नेईल अशी भीति वाटे. वाऱ्याच्या ज़ोरदार रेघा बाहेर बघताना जाणवत. आमच्याकडे राहणारे, आफ्रिकेत राहून आलेले आंधळे बापूराव कुठल्या गोबीच्या मैदानातील वादळवाऱ्याची गोष्ट सांगत. वाळूचे डोंगरच्या डोंगर वारा कसा उचलून दुसरीकडे नेतो—छत्री घेतलेल्या माणसालाही तो कसा वरती धरून नेतो ते, पुन्हापुन्हा, कुणी ऐकले नाही तरी ऐकवत.

तेव्हा बंगल्यात, राखी रंगाच्या सालीच्या पिंपळावरच्या भोकात राघूचे एक कुटुंब होते. वाऱ्याच्या धुळीमुळे पिलांचे डोळे जाऊ नयेत म्हणून ते जोडपे आपल्या पाठी वाऱ्याकडे करून बसे. त्यांची नुसती पिसे दिसत. पिंपळाच्या तळातल्या ढोलीत झुपकेदार शेपटांची काळोखकाळी इजाटे राहत. कधीच दिवसा तोंड न दाखविणारी दोन इजाटे, वाऱ्याचे काय चालले आहे ते बघायला बाहेर आलेली मी पाहिली होती.

वाऱ्याच्या चक्राची लय मंदावू लागे. उधळलेली धूळ, पाण्यात तळाला जाणाऱ्या कणांसारखी, हवेच्या काचेतून खालती येताना दिसे. आणि वेग मंदावला तरी काहीतरी तगमगल्यासारखे भासे. दिवस अधिकच कोरडा-पांढरा होई. वारा का आला होता, त्याने असे का सगळे उदसून टाकले, कळत नसे.

दिवस पांढरेकोरडे करणारा वारा झाडांच्या पानातले हिरवेपण दिवसें-दिवस आपल्या फकफकीत सपकाऱ्यांनी शोषून घेई. पिंपळ एखादे एखादे पिवळे दळ ढाळू लागे. झाडांची पाने पिवळट पडत आणि पानझड सुरू होई. वाऱ्यामुळे झाडांच्या पानांचा खच वडाखालती पडे. त्याचा चळचळ आवाज होई.

संध्याकाळी वाऱ्याने खाली आणलेल्या पानांनी वडाखालचे आवार भरून जात असे. धोंडूबाई ते रोज नियमाने खराट्याने लोटून स्वच्छ करी; आवारात ठिकठिकाणी पानांचे ढीग करून जाळून टाकी. पण वारा कधीकधी तिला अतिशय सतावी. तिने लोटून गोळा केलेले पानढीग तो पुन्हा रिंगण घालत आवारभर पसरून टाकी. तिने संध्याकाळी स्वच्छ केलेले आवार सकाळी उठून येऊन पाहावे तर वाऱ्याने आणलेल्या नव्या पानांनी पुन्हा भरून गेलेले असे. एखाद्या दिवशी ते रोजचे काम करायचे धोंडूबाई थांबवी. नुसती येऊन उभी राही. गळलेल्या पानांकडे पाही— त्यांना गरागरा फिरवणाऱ्या वाऱ्याकडेही. आणि वाऱ्याशी भांडायला तयार असलेली ती धोंडूबाई खरोखरीच एकटीच वाऱ्याकडे तोंड करून त्याच्याशी बोलू लागे. त्याला लाज आहे की नाही, तेसुद्धा विचारी.

वाऱ्याचे वागणे सहन न करून घेणारा दुसरा स्वभाव मी पाहिला पिंपळावरल्या आग्यामोहोळाचा. त्याचे पोळे वारा आपल्या वेगाने इतके तिरके करी, हलवी की, ते तिथून उठे नि त्याच्या माशा वाऱ्याला हवेत चावायला सुरुवात करीत.

झाडांची छान पाने वाळून गळून जाताना पाहून खूप वेळा लिनी वडाखालच्या ब्रह्मानंदाच्या कट्ट्यावरती एकटी रडत बसे. आणि मला त्या पाने नसलेल्या अंगांकडे बघताना बोलायला येईनासे होई.

आमच्या घराच्या मागे काळेकरंद रान पसरलेले होते. जोंधळ्याची पिके निघून गेल्यावर वाळलेल्या ताटांची पिवळी बुचाडे रानातून बांधली जात.

त्यातला पिवळा सोनसळी पाला वावरातून सळसळत इकडून तिकडे हले. वाऱ्याचे चक्र सुरू झाले की वावटळीतून गोल फिरत कितीतरी पाला आकाशात जाई.

वाऱ्याने वर नेलेला पाला खाली उतरताना डोळे मिटून ओंजळीत पकडला आणि तसाच जमिनीत पुरला तर त्याचे सोने होते हे लिनीला ठाऊक होते. मी आणि लिनी मिळून तो पाला धरायचा यत्न करत असू. पण त्यातले काहीतरी चुकत असे. आधी पालाच हाती येत नसे. मिळाला तर डोळे उघडे राहिलेले असत. आणि दोन्ही साधले तर, पाल्याचा थोडासा भाग तरी सोन्याचा झाला असेल म्हणून ठरलेल्या दिवसाच्या आधी लिनीच्या माघारी मी तो उकरून बघे. आणि आभाळात उंच नेऊन सोने होण्यासाठी वाऱ्याने पाल्यावर टाकलेला मंत्र वाया जाई. मंतरलेले पण न धरलेलेही कितीतरी पाले वाया जात.

...भरभर वारा सुटणारे लांब दिवस येत. सांजेची उन्हे उतरताना वारा सुरू होई. पहिल्यांदा सावकाश पळायला लागावे आणि मग वेग वाढवावा तसा तो येई. त्याला लहानलहान शुभ्र पिसांची पंखे असावीत असे वाटे. उन्हामुळे नको वाटणारे अंग वाऱ्याने सुखावे. भरारत येणारा वारा पश्चिमेकडे क्षितिजापाशी दिसणाऱ्या गावामागल्या डोंगरातून येत असावा. तो नेमक्या वेळेला येई आणि साऱ्या गावाला खाली लोटू लागे. नवी पालवी फुटू लागलेल्या सगळ्या झाडांचे झोक खालती वळून वाऱ्याची दिशा दाखवत. चवऱ्या ढळल्यासारखे त्यांचे हलणे दिसे. त्या फार पसरलेल्या वाऱ्यातून फिकट पातळ होत चाललेला प्रकाश वाहतो आहे—पसरून राहिलेली मातीही इतकी तरल झाली आहे की, त्या प्रकाशातून वाऱ्याबरोबर वाहते आहे—आपणही दुसरे कुणी न उरता त्या तरल वाहतेपणात मिसळलो आहोत, असे विलक्षणपणे त्या दिवसात कितीतरी वेळा जाणवे. आणि 'आपण आहोत' याचा अर्थ कळतो आहे असे वाटून कसल्या तरी गूढ अशब्दतेने मी भरून जाई.

वरती रानात तात्याभटजींच्या गाईचे शुभ्र वासरू चारी पायांवर वेगात धावत जाताना दिसे. तेही वारा प्यायलेले असे. मला ते भारी आवडे. त्याच्या उनाडपणावर रागावलेले तात्याभटजी उघड्यानेच त्या वासरामागे धावत सुटत. आणि कान उंचावून वारा पीत ते अधिकच उधळत वाऱ्या-बरोबर दिसेनासे होई.

पाठीमागच्या दाराच्या चौकटीत उभे राहून चक्रे फिरवायचे वेड तेव्हा लागलेले असायचे. चक्र कसे करायचे ते दादांनी मला शिकविले होते. जोंधळ्याच्या अशक्त ताटाचा वाळलेला वीतभर तुकडा आणायचा. त्याचा पुढचा थोडा भाग दातांनी तोडून टाकला की, आत मऊ भेंडाची गादी लागे. ते पुढचे खडबडीत टोक दाराच्या चौकटीवर घासले की, गुळगुळीत होई. त्यावर जोंधळ्याच्या पाल्याचे चक्र टोचायचे असे. जोंधळ्याच्या ताटाच्या अंगावर टोपण असलेला पाला काढून त्याचा सगळा भाग स्वच्छ करायचा. आणि दृष्टीने नेमका मध्य घेऊन तिथे बाभळीच्या दुटोकी काट्याने भोक पाडायचे. ते चक्राचे पाते काट्यातच ठेवून भेंडात खोवायचे. पात्याचा मध्य, वजन, तोल हे सगळे जमले तर चक्र वाऱ्याकडे धरताच लगोलग गुंगी लागे. ते तयार करून फिरायला लागेपर्यंतचा वेळ अतिशय ताणाचा जाई. पण माझे चक्र फिरले नाही असे कधीच झाले नाही. ते इतके वेगात फिरू लागे की, कुठेतरी नुसत्या वेगाचे जग असले पाहिजे, असे मनात येई. वरून नेहमी जाणाऱ्या विमानालाही पुढे तसलेच चक्र असते असे दादा सांगत. आणि त्या चक्राचे ताट तोंडात धरल्यावरती आपलेही विमान का होत नाही, असा मला प्रश्न पडे.

चक्राचा गुंगी लागल्यावर होत असे तो घुई आवाज आणि वाऱ्याचा वेग डोक्यात इतका भरून राहिलेला असे की, स्वप्नं पडणाऱ्या रात्री सगळ्या डोक्यात अनेक चक्रे चालू होत आणि त्यांच्या अनेक वर्तुळाकार रेषा डोक्यात उमटताहेत असा चमत्कारीक अनुभव येई.

चक्राचा पाला कधी शेजारच्या आबूच्या शिवऱ्यासारखा कोशा रंगाचा मिळे. कधी तात्याभटजींच्या वासरासारखा पांढराशुभ्र असे. कधी लुगडेदादाच्या

पटक्यासारखा गडद रक्तरंगाचा. आमच्याकडे सगळा जोंधळ्याचाच पाला. पण काळ्याभोर तोंडात येणाऱ्या मिशांचा आवूचा कोकणातला मामा उंच चाकाची गाडी घेऊन एके दिवशी येई. महादूनानाच्या फुल्या बैलाच्या पोळीपासच्या बदामी उमद्या रंगासारखा उसाचा पाला मिळे आणि अतिशय आनंद होई. उसाच्या पाल्याच्या दोन्ही टोकांना दातेरी धार असे. तो जोंधळ्याच्या पाल्याहून अधिक चिवट. आणि त्याचे चक्र फार वेगात फिरे. ते फिरत असतांना थांबवण्यासाठी मध्ये बोट घालून लिनीने एकदा भळदिशी कापून घेतले होते.

आमच्या घराच्या समोरासमोर असलेल्या तीन चौकटीतली पोकळी हा पाठीमागच्या वाऱ्याने भरून गेलेला गार प्रदेश होई. आणि प्रत्यक्ष चांदण्याच्या तुकड्याच्या भवतालासारखा, त्या पोकळीतल्या गार प्रदेशाला शिवणारा, घरातला उरणारा भागही वाऱ्याने जागा झालेला असे. उन्हाने उबळलेले पाणी थोरली आई तांब्याच्या परातीत ओतून त्या पट्ट्यात आणून ठेवी. आणि संध्याकाळच्या जेवायच्या वेळेपर्यंत वाऱ्याने ते अगदी गार करून ठेवलेले असे. वारा तीन चौकटींतून थेट जाऊन पुढल्या भिंतीवर सपके. आणि वळून, दोरीवर वाळत घातलेल्या दादांच्या शुभ्र धोतरात शिरून त्याचा मोठा फुगा करी.

उलट्या वाऱ्याबरोबर दूरच्या शाळेला जायचे म्हणजे मोठ्या भिंतीला धडका देण्यासारखे असे. पण संध्याकाळी परतताना, पाठच्या वाऱ्यामुळे पाण्यात पळणाऱ्या नावेसारखे रस्त्याच्या नदीवरून आम्ही तरंगत येत असू. अंगावरल्या कपड्यात वारा भरून राहिलेला असे. परतताना एका हाताला चिंचेचे दाट बन आणि दुसऱ्या हाताला चिलारीची दाटी लागे. शाळा सुटायइतके उन्ह उतरे. आणि शाळेतून बाहेर पडायच्या आधीच वाऱ्यामुळे वाजणारे चिलारीच्या वाळलेल्या शेंगांचे गाणे कानात भरे. चिंचेच्या बनातले सावल्यांचे हलणे मनास शिवे.

शाळेतून बाहेर पडले की, दोन्ही बाजूंना पाटलांचे वाडे लागत. शाळेपाठीमागून येणारा वारा त्या रस्त्याने भरारत कुंभाराच्या पश्चिम पाहणाऱ्या भिंतीवर आपटे. तिथून तो उजवी घाली. अण्णा पाटलाच्या वाड्यापाशी थांबे आणि पहिल्यासारखी पुन्हा दिशा धरत आमच्या घराकडे सुटे. अण्णा पाटलाच्या वाड्यापलीकडे देशपांड्यांचे घर. त्याखाली तो रस्ता घरांच्या बंदिस्तपणातून निसटे. आणि वाराही. गावातल्या घरांची रस्त्याला अडवणूक होते तशी वाऱ्यालाही होत असली पाहिजे. घरांच्या तटबंदीत गुदमरताना मी त्याला पाहिले होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम...१२०२२१..... विः ..निबंध.....
अभिप्राय ....१९५८-५९..... बोः विः ..३०१.मार्च

संध्याकाळचे पिवळे, वाऱ्याने झुळझुळते पातळ उन्ह पाठीवर घेत घराकडे परतताना आमच्या लांबच्या लांब सावल्या पडत. वाऱ्यामुळे स्थिरपणातही हलणारी सावली चालताना आडवी उभी हले. आडव्या सडकेवर आल्यावर निम्मे चालणे संपलेले असे आणि तिथून माझी सावली अजुनी लांब असलेल्या आमच्या गावाच्या वेशीपर्यंत, वाऱ्याने जणू लांबत जाई. तिच्या आधी जायचे ठरवले तरी ती रोज माझ्या आधी घरी पोचे.

डाव्याउजव्या हाताला धावणाऱ्या दुसऱ्या सडकेवरल्या बाभळींच्या बोगद्यातला वारा, दोन सडका एकमेकींना भेटत तिथे येई आणि आमच्या-बरोबर आलेल्या पश्चिमवाऱ्याला मिळे. तिथल्या चढावरून उतरले म्हणजे आमची सडक खाली थोड्या उताराने धावे. रोज त्या वाटेने धावणाऱ्या वाऱ्यामुळे तो उतार झाला असावा. तिथून आम्ही भेंड आणि चोयांनी केलेली उंच हलकी काकणे रस्त्यावरून सोडत असू—वाऱ्यापासून कातून काढलेल्या चक्रांसारखी. वाऱ्याने त्यांचा उभा तोल सावरला की ती धुमाट पळत सुटत आणि गावात जाऊन दिसेनाशी होत.

आमच्या वर्गाच्या भिंतीवरल्या लाकडी काळ्या रिपांच्या चौकटीचौकटींमागे बाभळीची खानदानी उमदी झाडे होती. पश्चिमेकडून त्यांच्यावरती उन्ह पडले आणि त्यांतून वारा आला म्हणजे पानसावल्यांच्या कुसरीचे नाजूक नृत्य आमच्या पुढल्या जमिनीवर कितीतरी वेळ सुरू राही. त्यातून वाऱ्याला चिमटीत धरता येईल का, असा विचार मनात चाले.

आम्हाला दादा देशपांडे शिकवत. एखादी गोष्ट आठवणीत राहण्यासाठी ते दुसऱ्या एखाद्या तिच्याशी संबंधित असलेल्या मोठ्या गोष्टीचे सान्निध्य घेत. बाभळीच्या झाडातून सळसळत आलेल्या हिरव्यागार वाऱ्याच्या वेळी त्यांनी आमचा वाऱ्यावरला तास घेतला होता. वाऱ्याला साक्षी ठेवून त्यांनी त्याच्याविषयी कितीतरी ऐकवले होते.

वायुवीजनाचे चित्र काढून, घरात वारा आला पाहिजे, घरात कोंडून विषारी झालेला वारा बाहेर कसा गेला पाहिजे, ते त्यांनी दाखविले होते. वारा बिया आणि तुसे कशी उडवून नेतो, ती दुसरीकडे कशी रुजतात,

हे अद्‌भुतच होते. नवे काही ऐकलेकळले की, त्याभोवती मी दिवस न् दिवस राही. डोक्यावरून सुसाटणारा वारा कुठल्या कुठल्या बिया कुठेतरी रुजण्याकरता सारखा नेतो आहे, असे मला वाटे. वरती त्या बिया दिसताहेत का ते मी पाही. आणि आठवणाऱ्या जुन्या गोष्टींच्या, वाऱ्यातल्या त्या बियांसारख्या, मनात बिया असाव्यात, असा अंधुकसा भास होई.

वारा मुरकेबाईंच्या परसातल्या नरपोपईतले परागकण, आमच्या लांब असलेल्या घराच्या परड्यातल्या पोपईच्या नाजूक पिवळट-पांढऱ्या फुलात आणून सोडत होता. त्यांच्या पोपया तयार करत होता. वाटेवरल्या काळ्या शेतातले वेचलेले नागरमोथे उडवून रस्ताभर सुगंध पसरत होता. दूर देशाहून आलेल्या यमुनामावशीची वार्ता शाळेतून परततांना, वाटेवरतीच विनाआवाजाने कानात सांगत होता. आणि म्हसोबाच्या रानात मरून पडलेल्या सावकारांच्या म्हशीचा वास दिशांपलीकडे राहणाऱ्या गिधाडांच्या प्रचंड झुंडीला पोचवत होता.

कुठल्यातरी दूर समुद्रातल्या जहाजांची शिडे भरून त्यांना धूमधूम पळवायचे त्याचे काम चाललेले होते आणि कुठेतरी त्यांना उलटे येऊन तो अडवूनही ठेवत होता.

वाऱ्याचे इतके सगळीकडे भरून राहिलेले असणे अनुभवत असताना देशपांड्यांनी आम्हाला काही विचित्र वाऱ्यांची ओळख करून दिली होती. त्यातला 'मान्सून' नावाचा वारा मला कुणीतरी परदेशातून आलेल्या राक्षसासारखा वाटे. त्याच्या पाठीवरती मारले तर खणखण असा आवाजसुद्धा झाला असता. टोकांशी बाण असलेल्या त्या वाऱ्यांशी माझे मनापासून कधी जमलेच नाही. त्यांचे स्मरण ठेवायचे ते गुण मिळण्यासाठी. ते कुठल्यातरी समुद्रातून येत होते. कुठे कुठे वळत होते. चेरापुंजीजवळ कोसळत होते. मला त्यांचे कायच नव्हते.

खूप वारा वाहणाऱ्या, उंचावरल्या कुठल्यातरी पवनचक्क्यांच्या देशाविषयी देशपांडे सांगत. पवनचक्क्यांना फिरवून वारा पाणी कसे उपशी याचे त्यांना मोठे कौतुक. आकाशाचा निळा रंग कधीतरी दाटभोर झाल्यावरती

तो ओतून ती तयार केल्यासारखी दिसे. आमच्या देवाच्या बागेतल्या उंच तजेल पवनचक्कीचे तेव्हा मला फार वाटे. त्या पवनचक्क्यांच्या देशामधून माझ्या जन्माआधी, एखाद्या भांडखोर पण समजशील मुलीसारखी, ती एकटीच उड्डून येऊन आमच्या इथे उतरली असावी, अशी माझी समजूत होती. उंच मानेने, भुवया उभवून आमच्या गावाकडे बघताना तिला मी अनेकदा पाहिले होते. तिचे वरचे वर्तुळाकार चक्र कापीव पानापानांचे होते. चक्राच्या मध्यातून, प्रकाशाच्या झोतासारखा पुढे मोठा होत जाणारा, वरती काहीतरी निराळी काळी अक्षरे असलेला पंखा होता. ती अक्षरे त्या खूप वारा वाहणाऱ्या देशातलीच असावीत. वारा वाहायला लागला की, वाऱ्याच्या विरुद्ध दिशेला पंख्याचे पाते जाई.

खाली मुळीच वारा नसताना खूपदा पवनचक्की फिरताना दिसे. दादा म्हणत, वारा खाली न येता वरतीच वाहतो आहे. त्या वरून वाहणाऱ्या वाऱ्याकडे मी अंगणात येऊन आभाळात बघे. वाऱ्याचा खाली न पोचणारा प्रवाह आपल्या डोक्यावरून जातो आहे ही जाणीव मला वेढून टाकी. अभ्रांमधून आलेल्या उन्हाच्या वेळी, डोक्यावरून जाणाऱ्या वाऱ्याची खाली पडणारी, कधीतरी दिसणारी सावली मला लिनीने एकदा दाखवली होती. पुढे पसरलेले चकचकते ऊन सौम्य करत, भरभर पळणारी वाऱ्याची ती सावली पूर्वेकडल्या आभाळातून आली होती. आणि आम्ही पुढल्या दारातून परसदारी पाहायला येईपर्यंत आमच्या डोक्यावरून पश्चिमेकडे क्षितिजाशी दिसणाऱ्या गावापर्यंत पोचली होती. तिचे पाऊल लांबलांब पडणारे होते.

लहरीपणाचा वारसा वाऱ्याचा, असे दादा सांगत आणि उन्हाच्या वेळी पाठीमागच्या दारातून दिसणाऱ्या झुळझुळत्या मृगजळाच्या लाटातल्या वाऱ्याच्या लहरी दाखवत.

जोंधळ्याची पिके फूल प्यायला लागली की वारा आडदांडपणे येई आणि दाणा भरू देत नसे. कणसांनी भारावलेल्या उभ्या पिकाच्या ढांगुळ्या ताटातून तो सुसाटत आडवातिडवा जाई आणि ताटे मोडून त्यांची कणसे खालच्या घाणीत टाकी. मळणी होऊन खळ्यात मदन तयार झाल्यावर,

आधीपासून ताप देत असलेला वारा ऐन उफणायच्या वेळी एकाएकी कुठे गडप होई. आणि दिवस-दिवस त्याची वाट पाहत खोळंबून राहावे लागे. त्याच्या त्या छर आल्यासारख्या तऱ्हेमुळे गंगू त्याला "वाऱ्याचा मुडदा वसवला!" म्हणत असे. अंधाऱ्या रात्री रानातले केशरी करडकूट पेटवल्यावर त्यातल्या फुणग्या दुसरीकडे टाकून आगीचे लोळ उठवायचा राक्षसी खेळ तो कधीकधी खेळे. पलीकडच्या भुवनेश्वरवाडीच्या झाडीत उन्हाच्या वेळी दिसणाऱ्या सावल्यांना चुकूनमाकून चालवायला लावायची वाऱ्याची एक लहर होती. तिथल्या पाणवठ्याच्या झाडीच्या बोगद्यात, काळोखात हेलावणारे काजव्यांचे हिरवे दिवे मधूनमधून तो मालवून टाकी; आणि रात्री लोखंडी साखळीने महादबाने जाम बांधलेली नाव खुंट्यासकट उपटून लांबवर पळवत न्यायचा विनोद त्याला नेहमी सुचे.

झाडांची पाने वाऱ्यामुळे गळून जात आणि कुठलातरी चमत्कारिक वारा कधीकधी गावात शिरला की त्या दिवसात माणसातली कितीतरी पाने गळल्याची बोलणी ऐकायला येत. आमच्या समोरच्या वडाच्या आवारात पानातून खाली झिरपणाऱ्या चांदण्याची तांबड्या मातीवर मोठी चित्रविचित्र नक्षी उमटलेली असे. दादांच्याबरोबर मी त्या नक्षीतून जाई. वाऱ्याने वरली चिंच हले आणि तिच्यातून उतरणारी नाजूक नक्षी वडांच्या पानांच्या स्थिर नक्षीतून चालत जाई. वाऱ्याने जिवंत केलेली ती नक्षीची शरीरे मातीवरल्या अधांतरातही एकमेकातून सरकताहेत असे भासे. वडाची नक्षी संपली की, पिंपळ आणि वड यांच्या मधल्या आकाशाला दिसणाऱ्या उघड्या अंतरावर थेट चांदण्याचा स्तब्ध पट्टा पडे. त्या पट्ट्याला लागून एक दगडी पट्टा होता. त्यावर मी दादांच्याबरोबर येऊन बसत असे. तिथे खालच्या देवाच्या आवारातून वरती आलेली, उंबराच्या तळख पानांची डहाळी वाऱ्यामुळे आमच्याजवळ येऊन सारखी डोक्याशी घसटे. दादांना घट्ट धरून मी खाली पाही. खालती खोलात फरशीने बांधून काढलेले देवाचे आवार होते. तिथे मशाल पेटवून चाललेल्या पालखीच्या गाण्याचे सूर वाऱ्यावरून वर तरंगत येत. पुढे पूर्वेला काही हातांवर घाटाखाली नदीच

प्रवाह होता. वर येत चाललेल्या वाटोळ्या चंद्राचे गच्च चांदणे प्रवाहावर पडे. मी अनिमिषपणे पाहत राही. डोहावर हेलकावत हेलकावत एका लयीत वारा वाहत असे. चांदण्याच्या लाटांच्या दुमडी कितीतरी वेळ खालती जात असत. त्या एका लयीतल्या वाऱ्याचे न दिसणारे रूप दिसते आहे असे क्षणभर वाटे. लाटांच्या दुमडीसारख्या वाऱ्याच्याही दुमडी होत असल्या पाहिजेत. वाऱ्यामुळे आपल्या अंगातून तशा न दिसणाऱ्या लाटा निघून कुठेतरी दूरवर पोचत असल्या पाहिजेत, असले मनात येई. आणि दादाही त्या वेळी कळणार नाही असे, पुसट कधीकधी बोलून जात. न कळणारे स्वीकारताना, देताना ते पुढल्या कुठल्यातरी प्रकाशाने उजळते यावरती दादांचा विश्वास असावा. असे ते खूपदा वागत.

आपण बोललेले, इच्छिलेले वारा घेऊन जातो. आपल्यावरून जाणारा वारा, वाऱ्यासारखे एक आपलेपणा दुसरीकडे निर्माण करत असतो. आपल्यातली द्रव्ये विरून घ्यायची शक्ती वाऱ्यात असते, असे काही दादा तेव्हा सांगत.

डोहावरल्या वाऱ्याची लय बघता बघता माझे कधीतरी डोळे लागत.

जातिवंत जनावराच्या शरीराला स्पर्श करताच त्याच्या अंगभर पसरत जाणाऱ्या शहाऱ्यासारखा, वाऱ्याने डोहभर उमटवलेला शहारा मी पाहिला होता. डोहपाण्याच्या पानाचे वाऱ्याने दोन काप केलेले कधीकधी दिसत. मध्यापलीकडचे सगळे पाणी चुण्याचुण्यांचे आणि अलीकडचे, अगदी पारदर्शक दगडासारखे स्तब्ध. ते दोन काप करणारी दीर्घ रेषा वाऱ्याने निश्चितपणाने दाखवलेली असे.

सांजेच्या वेळी डोहावरून शीळ घालत जाणारा वारा दोन्ही काठांना मंतरत जातो आहे असे वाटे.

एखाद्या सकाळी, देवाच्या बागेत लवकर जावे तेव्हा त्याआधीही येऊन गेलेल्या वाऱ्याने तिथल्या पारिजातकाच्या तळी शुभ्र पांढऱ्या फुलांचा सडा शिंपलेला असे. गळलेल्या प्रत्येक नाजूक फुलाला वाऱ्याने एक स्वतंत्र

हलका स्पर्श केलेला असे. प्रत्येक फुलाची खाली थांबायची तऱ्हा निराळी. एक फूल आपली केशरी पोकळ देठाची नळी वरती करून, दुर्बिणीतून पाहावे तसे आकाशाकडे पाही. एक स्वतःच्या दोन पाकळ्यांवर रेलून दुसऱ्या फुलाशी बोले. एक आपली इतरांशी जशी काही सोयरीक नाही अशा तोऱ्यात एकटे दूरवर जाऊन पडलेले असे. प्रत्येक फुलाच्या थांबण्यातून एक-एक निराळी अवस्था निर्माण करून गेलेल्या वाऱ्याच्या न कळलेल्या वाटेकडे मी मुका होऊन पाहत राही.

बंगल्यामागल्या काळसर मातीवर देवत्राभळींच्या लहानलहान गोल पिवळ्या फुलांची वाऱ्याने शिंपण होई. आणि त्यांचा घमघमाट सुटे. मठाच्या वाटेवर पोपटी देठांची बिट्ट्यांची फुले टपटपत नि आमच्यासमोरच्या चिंचेचा पिवळा-केशरी मोहर वाऱ्यानेच अंगणात आणलेला असे. तो कधी जमिनीवर टेकल्यासारखा वाटतच नसे. त्याचे सारखे अधांतरी हलणे सुरू असे.

देवाखालच्या फरशीच्या आवारावर पडलेली अंजिरासारखी लाल उंबरे ...आडव्या सडकेच्या वळणावरली करंजझाडांची पसरलेली जांभळी फुले... नागेशशास्त्र्यांच्या चढणीवरल्या शिकेकाईच्या झाडाच्या, पेरेदार तांबड्या शेंगांची खालची पखरण...

वाऱ्याने शिंपलेला प्रत्येक सडा आणि त्यासाठी शोधलेली निरनिराळ्या छटांची जमीन हे मला एक-एक जिवंत चित्र वाटे. कलावंतांना पडणाऱ्या रंगीत स्वप्नातून वाहणाऱ्या जाणिवेसारखा तो वारा वावरे.

वाऱ्याचे दार असलेल्या घरात राहणारी परी तेव्हा थोरल्या आईच्या गोष्टीतून येत असे. माडीवर एकटे पडून राहिले की एखादा झरा लागल्यासारखा, पश्चिमेकडच्या भिंतीच्या विटांतून ठेवलेल्या भोकातून वारा येऊन मला व्यापू लागे. आणि त्या परीच्या घराचे दार फुटले की काय असे वाटे. ती परी जवळपास आल्यासारखा भास होई. मनावर विलक्षण ताण येई. कुठलेतरी कितीतरी स्मरू लागे. मिळू लागे. लिनीने कधीतरी नुसत्या वाऱ्यावरतीच ठेवलेले निरोप, कुणाकुणांची अनोळखी बोलणी आपोआप आकारू

लागत. छानसा वास असलेला तो वारा एखादे वेळी उत्कटतेने कापरासारखा पेटेल अशी भीती वाटे.

वारा खरोखरी कधीकधी इतका शहाणा होई की, कार्तिकातल्या पहाटे दार उघडल्याबरोबर दिसणारे, समोरच्या आवारात भरून राहिलेले देखणे धुके त्याने दुखावलेले नसे. पिंपळाखालच्या मातीत उमटलेल्या चांदोबाच्या घरांच्या शिल्पांचा कणही त्याने विसकटलेला नसे. संध्याकाळी खेळताना हलकेहलके आलेल्या काळोखाने थांबवलेल्या खेळातल्या मातीवरल्या कच्चलेल्या खुणा त्याने सकाळकरता तशाच ताज्या ठेवलेल्या असत. रथ-सप्तमीच्या दुपारी आई अंगणातल्या काळ्या बोळक्यात शिजणाऱ्या भाताचा कढ कुणीकडे गेला आहे ते पाहायला सांगे. वाऱ्याने तो आमचे शेत होते त्या दक्षिणेला दरवर्षी ढालून तिथे खूप पाऊस पडणार असल्याचे सुचवलेले असे. संध्याकाळी नदीपलीकडे चाललेल्या भुवनेश्वरीच्या देवळातल्या आरतीचे सूर आमच्या माडीवरल्या खिडकीतल्या एका ठरलेल्या ठिकाणी वारा आणून सोडी. सनईच्या नि झांजांच्या आवाजात मिसळलेल्या त्या सुरांना निशिगंधासारखा खोल गंध येई. आणि एखादी नवी गोष्ट सर्वांआधी जाऊन कळवायच्या लहानपणाच्या आतुरतेने, पावसाच्या देशावरून धावत येऊन मातीचा ओला दरवळ त्याने आणलेला असे.

थोरल्या आईजवळ एक जुनी मात्रा होती. तिला चंद्रपुटी दिलेल्या होत्या. कुणाला जास्ती झाले तर त्या मात्रेचे वळसे न्यायला गावातले कुणीतरी येई. संध्याकाळी भणभण करत येणारा तलम वारा आमच्या गावातल्या सगळ्या घरावरती भिरभिरत राहिला की, कितीतरी वर्षे सपकणाऱ्या वाऱ्याच्या पुटी त्या घरांवर चढल्या आहेत आणि थोरल्या आईजवळच्या मात्रेसारखा एखादा गुण प्रत्येक घरावर उतरला आहे, असे मला वाटे. वाऱ्याच्या पुटींची चव लागते का ते पाहायासाठी मी देवघराच्या भिंतीला जीभ लावून चाटून बघत असे. देवघराच्या खरपूस भाजलेल्या मातीच्या विटांच्या भिंतीवर संध्याकाळी उतरत्या उन्हाचा एक पिवळा-कुसंबी तुकडा पडे. उरलेल्या भागांवर झाडांच्या छाया. त्या

तुकड्यावरल्या संध्याकाळच्या सोनकिरणांचे रंग वारा मंद करी. हळूहळू हालत काळोखणाऱ्या त्या वेळच्या घटनेमागे वाराच असला पाहिजे. रात्रीला जा म्हणून सांगणारा आणि दिवसाच्या कंटाळ्यामुळे पुन्हा तिला घेऊन येणारा वारा झोप आणणारे काहीतरी घेऊन येत असे.

कुठल्या कुठून येणारा वारा मला पृथ्वीच्या श्वासासारखा भासे. वाटणाऱ्या कुठल्याही घटनेत वाऱ्याचा एक अटळ वाटा असे. दिसण्यासाठी, तिथपर्यंत पसरत पोचणारी जाणीव वाऱ्यानेच नेलेली असे. आणि बोलण्यातला आवाज काढून घेतला तरी वाऱ्याने न्यावयाचे कांही उरते असे मला वाटे.

लहानपणी पडणाऱ्या स्वप्नातले वजनविहीन आवाज ही एका अनाकलनीय वाऱ्याची अद्‌भुत किमया आहे अशी माझी समजूत होती. त्या किमयेच्या काठावरून जाग येत असताना, जाणीवपूर्वक पुन्हा तीत लोटून घेऊन त्या वाऱ्याचा शोध घ्यायचा मी कितीदातरी तरी यत्न करत असे.

लहान मुलांना देव त्यांच्या बेंबीला दोरी बांधून आकाशातून कांळोख्या रात्री खाली सोडतो, असे थोरल्या आईने मला सांगितले होते. ती दोरी कापायची देवाची मोठी कात्रीही तिच्याजवळ होती. थोरल्या आईला रात्रीही कुणीकुणी नेहमी बोलवायला येई. नि तिथून ती जाऊन आली की, तिथल्या नव्या मुलाचे वर्णन सकाळी तिच्या तोंडून ऐकायला मिळे. नुकत्याच आकाशातून आलेल्या माझ्या लाल इवल्या बहिणीच्या पोटापासची नाळही तिने मला दाखविली होती. खरेच तिच्या पोटाला देवाने बांधलेल्या राजवर्खी दोरीचा उरलेला तुकडा होता. आकाशापासून जमिनीपर्यंतच्या लांब दोरीचा झोक मधल्या पोकळीतल्या वाऱ्यानेच आमच्या घरी थांबवला असला पाहिजे असे मला वाटे. आणि फुलासारख्या छान बहिणीला आमच्या घरी आणून थांबवले यासाठी वाऱ्याला मी मनापासून चांगुलपणा देत असे.

पण तिच्याही आधी एका काळोख्या रात्री देवाने मला आकाशातून सोडले होते. त्या दोरीचा झोकही वाऱ्याने थोरली आई, दादा, आई असलेल्या घरीच नेमका थांबवला होता, हे वाऱ्याचे केवढे मोठे चांगुलपण होते !...

शब्दांच्या संध्याछाया

दुपारचे ऊन्ह पसरलेले असे. गावात सगळीकडे भरून राहिलेल्या शांततेला जणू उन्हाचा रंग दिलेला असे नि त्या शांततेचे काप काढल्यासारखा एक विचित्र आवाज कितीतरी दिवस ऐकू येई.

तो आवाज कसला विचारले की, "तिकडे माणसे कापतात" असे दादा सांगत. "माणसांना का कापतात" विचारल्यावर, "तिकडे मोठी माणसे कापतात' एवढेच उत्तर त्यांनी मला दिले होते. म्हणजे आपणाला तरी भीती नाही, इतके समाधान त्या उत्तरांतून मी मिळविले होते.

पण त्या आवाजाची विलक्षण धास्ती माझ्या मनात राहिली होती. दुपारची वेळ झाली की ती वाढे. आवाज सुरू होई. विळीने कापल्यावर आईच्या बोटांतून किती रक्त भळभळते ते मी पाहिले होते. आणि तिकडे तर माणसांनाच कापायचे काम चालले होते. तिकडून कुठूनतरी, आमच्या पाण्याच्या नदीसारखी रक्ताची नदी निघाल्यासारखे मला वाटे.

तरी त्या आवाजाचे जसे काही काहीच वाटत नाही असे दाखवत, त्या माणसांना कोण कापते आणि कापल्यावर रक्त किती सांडत असेल, ते एक दिवस मी पुन्हा विचारले. पण माझी आतली भीती दादांनी ओळखली होती.

आणि एकदा त्यांनी भीती ओळखली की, त्यांच्यापुढे धर काढायचे कठीण असे. शिक्षा झालेल्या माणेसांना बांधून तिथे कापले जात होते. आणि माणसांना कापताना तिथे रक्त अजिबात सांडत नाही, असे दादा सांगत होते.

काही दिवसांनी गावाच्या न वघितलेल्या एका खोलगट भागात दादांनी एका दुपारचे मला नेले. आजूबाजूला झाडे होती. पण सगळीकडे सामसूम होते. आमच्याशिवाय कुणी माणूस नव्हते. जवळ एक खोल खड्डा होता. त्यात एक रुंद लाकूड आभाळाकडे तोंड करून उभे होते. त्यावर दोन काप टाकलेले दिसत होते. बाजूस कापलेले ओंडके होते. आणि कितीतरी तांबूस भुगा खाली पडला होता. तो भुगा म्हणजे माणसाला कापताना पडणारे, न वाहणारे, वाळलेले रक्त होते. आणि माणसांना कापल्यावर त्यांचे तसे ओंडके होत होते, हे फारच भयंकर होते.

दादांच्याबरोबर मी तिथल्या सावलीत बसलो. वर झाडांची गार पालवी पसरली होती. थोड्या वेळाने काळ्या तकतकीत अंगाची दोन उघडी माणसे आली. त्यातला एक तिथल्या खड्ड्यात उतरला. आणि आतली करवत घेऊन दोघांनी ते लाकूड कापायला सुरुवात केली. गावातल्या दुपारच्या शांततेचे काप काढणारा आवाज जिथून निघत होता तिथे आम्ही आलो होतो. मग दादांनी सांगितले की, "माणसे कापतात" म्हणजे "माणसे लाकूड कापतात."

दादांचे नेहमी असेच असे. त्यांच्या शब्दांचे अर्थ फार पसरत. एका रस्त्याला पुढे दोनतीन वाटा फुटाव्यात आणि वाट चुकावी तसे त्यांच्याशी बोलताना होई.

कुठल्या अर्थाच्या वाटेला आपण लागू ते सांगता येत नसे. पलीकडे जाताना वाटेवर हिरवीगार करंजांची झाडे लागत. त्या झाडांनाच करंज्या लागतात आणि दिवाळीच्या वेळी आपण तोडून आणतो, असे दादा सांगत. आश्चर्याने थांबून मी त्या झाडांच्या गडद पानावळीकडे पाहत राही. पातळ, पिवळट-पांढरट करंज्या खरोखरीच लगडलेल्या असत. मग चिरण्याने घरात पाटावरती आई करंज्या का करत होती ते समजत नसे.

आमच्या पडवीला एक मोठेच्या मोठे उखळ होते. माझा निम्मा हात त्यात बुडे. आमचा तिथला चिंचोक्यांचा खेळ संपला की, सगळे चिंचोके आम्ही त्या उखळात ठेवत असू. कुटण्यासाठी दुसरे लहान उथळ उखळ स्वयंपाकघरात होते. मोठ्या उखळाचा कुणी उपयोग करत नसत. ते व्यायला झाले असल्याचे दादा सांगत.

आमच्या पाठीमागच्या पडकात खड्डा काढून विताना मी कुत्र्यांना पाहिले होते. म्हशीगाईसुद्धा सारख्या वीत. विताना त्यांचे ओरडणे मी ऐकले होते. पण उखळ कसे विणार याची मला उत्सुकता लागून राहिलेली असे. ते विताना ओरडेल का, मला पाहायचे असे. एखाद्या वेळी रात्रीतही ते विईल म्हणून मी बघून येई. त्या उखळाला व्याल्यावर होणाऱ्या तीनचार लहान उखळांचे रूपही मला दिसायला लागले होते. मग पडवीत उखळेच उखळे झाली असती. कुणाला कळू न देता रात्री उखळाकडे जाताना कधीकधी दादा भेटत आणि नेमके विचारत : "व्याले का?" दादांचे ते विचारणे खरे आहे की खोटे, काहीच कळत नसे. शेवटी एकदा, ते उखळ झिजल्यामुळे फुटणार असल्याचे आईने सांगितले. उखळ फुटायला झाले आहे असे न म्हणता व्यायला झाले आहे असे म्हणायचे होते. या सगळ्यामधून विण्याचा आणि फुटण्याचा काहीतरी संबंध मनात उरला होता.

शाळेत अक्षरे गिरवावी लागत आणि आठवड्यातून एकदा पुस्ती काढायची असे. छापील नक्षीच्या नमुन्यांचे एक पुस्तक दादांनी माझ्यासाठी आणले होते. नऊ लहान चौकोन एका लहान चौकटीत बसवून, त्यातले पाच काळे व चार पांढरे अशी त्यातली एक नक्षी दादांनी माझ्या पुस्तीच्या पिवळसर पुठ्ठ्यावर काढली होती. आणि मध्ये 'पुस्ती' असे लिहून त्याखाली माझे छापल्यासारखे नाव. मी ते कितीतरी वेळा नुसते पाहत राही. गौरी, विमली बघायला मागत आणि आमचे मास्तरही. 'पुस्ती' हा शब्द निघताच, पिवळा पुठ्ठा, काळ्या शाईतली नक्षी, नाव आणि आत घटवून काढलेल्या अक्षरातल्या 'वाडीखाली वारा वाटा' असल्या ओळी हे सर्व रूप माझ्या स्वप्नातही उभे राही.

पण आमच्या घराच्या पडक्या भिंतीला 'पुस्ती' द्यावयाचे बोलणे एकदा घरात सुरू झाले. त्या चौकशीत अधिक पडताच, माझी पुस्तीची वही त्या भिंतीला देऊन टाकण्याचे दादांनी मला सुचवले. मी पुन्हा नेहमीच्या अर्थाच्या पलटत्या घोळात सापडलो होतो. पण मी निश्चित कुठे आहे ते कळेना. भिंतीला 'पुस्ती' द्यायची म्हणजे काय ते खरे सांगा, असे दादांच्या पाठीशी लागल्यावर, भिंत पडायला झाली आहे, तेव्हा तिच्यापुढे माझ्या पुस्तीच्या वहीसारख्या अनेक वह्या उभ्या ठेवायच्या आहेत, ही माहिती त्यांनी दिली. हेही खोटेच होते. माझ्या पुस्तीवरल्या नक्षीतले काळे चौकोन नक्षीतून उठून बाहेर आले असते. मोठे झाले असते. आणि त्यांच्या विटा होऊन शहाण्यासारख्या त्या भिंतीला लागून उभ्या राहिल्या असत्या. पण पुस्तीची वही उभी राहणे कसे शक्य होते? मग एकदा शाळेतून येऊन बघितले तर त्या जुन्या भिंतीला लागून एक विटेची भिंत बांधून उभी राहिली होती.

...पावसाळा आला की, चुलीपासच्या जमिनीतल्या पोपड्यातून, गडद केशरी रंगाचे भोम उठे. आई त्यावरती उलथण्याने चुलीतले निखारे ठेवी. आणि ती सगळी पलटण पळून जाईपर्यंत मला बाहेरच थांबावे लागे. त्यातला एखादा चावला तरी भयंकर वेदना होत. तो अंगात इतका घुसलेला असे की, ओढून काढताना एक एक वेळ त्याचा कमरेपासूनचा भाग तुटून निघे. आई त्यांना 'चाचड' म्हणे. चाचड म्हणायला मला आवडे. लहानशाही आकारात त्यांच्या अंगाच्या चढाची जाणीव, त्यांचे खूप जणांनी एकदम वर येऊन चाचपडणे, हे 'चाचड' या शब्दात आले आहे असे मला वाटे.

आई एकदा 'चाचणी'चे लाडू करणार होती. चाचणीचे म्हणजे चाचड घालून केलेले लाडू हे दादांचे त्यावरचे बोलणे. चाचड खायच्या कल्पनेनेच मला कसेतरी झाले. मी ते लाडू खाल्ले नाहीत. चाचडासारखाच रंग त्या लाडवांना होता. आणि 'चाचड' या शब्दातल्या 'ड' ऐवजी, "ड'चे नातेवाईक अक्षर 'ण' 'चाचण' या शब्दात होते. 'ड' अक्षर चाचडाच्या अंगातल्या आंबटतुरट रसाकरता होते. त्याऐवजी 'ण' अक्षर

वापरून लाडवात साखर घातली होती. दादांच्यामुळे माझी असली विचित्र समजूत झाली होती.

शब्दांना लहानसे धक्के देऊन अशा अनेक समजुती दादा करून देत आणि मग त्या समजुतींचा पारा माझ्या मनावरून काढून टाकताना आई मेटाकुटीला येई.

चाचणीचा लाडू घरी खाल्ला नाही तरी शाळेत एक दिवस आमच्या गोपाळ मास्तरांनी आमची चाचणी-परीक्षा घेणार असल्याचे सांगितले. घरी येऊन दादांना विचारल्यावर, चाचणीचे लाडू खाऊन दाखवायची परीक्षा, हा अर्थ त्यांनी सांगितला. आता चाचड खायला लागणार या भीतीने मी घाबरून गेलो होतो. शेवटी चाचणी-परीक्षेतून लाडू न खाता सुटल्यावर चाचणी-लाडू आणि चाचणी-परीक्षा यातल्या 'चाचणी' या शब्दाच्या आसपास मी फार दिवस फिरत होतो.

...आजारीपणात माझ्यासाठी आईने पहिल्यांदा कढी केल्यावर, पाठी-मागच्या दाराची कडी फोडणीत टाकून ती केल्याचे दादांनी मला ऐकविले होते. आणि तिला आलेली काळसर छटा कडीचीच असल्याचे मला पटले होते...

...पश्चिमेच्या दारातून वारा भरारत येत असताना "म्हातारी गेली" म्हणत चटकन उठून दादा वाऱ्याबरोबर धावत अंगणात जात. कोण म्हातारी, ते बघायला हातातले काम अर्धेच टाकलेल्या आईबरोबर बाहेर यावे तेव्हा, पाठीमागच्या रानातल्या फुटलेल्या रुईच्या बोंडातली वाऱ्याने आणलेली म्हातारी दादांनी माझ्यासाठी धरून ठेवलेली असे. डोळ्यापुढे असलेल्या अनाम म्हातारीचे रूप विसकटून जाई. तिचा एकच पांढराफेक केस आणि तो धरून ठेवणारी जवसाच्या रंगाची, जवसाहून लहान असलेली कोयरी दिसे. आणि मरून गेल्यावर म्हातारीचा जीव त्या कोयरीत राहायला आला असावा असा भास होई.

शब्दांभोवतीच्या, नेहमीच्या अर्थाचा प्रकाश दादा दुसऱ्या अर्थाने मालवून टाकत असताना शब्दांची संध्याकाळ होत चालली आहे असे मला वाटत असे...



ठाणे जिल्हा ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९०३९२

पार्टी

आमच्या घराजवळ एक जुना पडका वाडा होता. जातायेता तिथल्या पडणाऱ्या पांढऱ्या भिंती, मातीचे उकीर दिसत. आढ्याच्या मोसक्यातून कोळ्यांची जाळी लागलेली असत. वाड्यातला उजेड, सावल्या कमीअधिक होताना कसेतरीच वाटे. त्या ओसाडीत देवाकरता येऊन राहिलेले एक नवराबायकोचे जोडपे होते. वाड्याच्या खोल आतल्या भागात ते राही. वाड्याच्या वाहेरच्या भागात आणि आतही काळे पडलेले, कधीकाळीचे, ठोक्याठोक्याचे तांब्याचे मोठे हंडे असत. आणि ती बाई ते रोज भरून ठेवी. दोघांना इतके पाणी कशाला लागे कुणास ठाऊक. पण सकाळी पाहावे तर वाड्यात पाण्याचा टिपूसही उरलेला नसे. ऊन पडून डबके आटून जावे तसे भरलेले पाणी रात्रीच्या अंधारामुळे आटून जात असे...रात्री भुतांचे थवे वाड्यात पाणी प्यायला येतात, अशी काही अंधुकशी बोलणी ऐकायला येत. ते ऐकून आमच्या घरासमोर दिसणाऱ्या नदीचे चांदीसारखे पसरलेले पाणी, एखाद्या रात्रीच्या काळोखात, नदीपलीकडच्या झाडीतली भुते पिऊन टाकतील आणि आमची नदी कोरडी पडेल अशी मला भीती वाटे.

घरात जसे आई, दादा घागरीने पाणी आणून हंड्यात साठवत तसे देवाने आमच्या नदीत खूप खोल जागा करून पाणी साठवले होते. कितीही उन्हाळा आला, कितीही वर्षे पाऊस पडला नाही, तरी आमच्या नदीतले पाणी आटणार नव्हते...तसे झाले तर पाणी पिऊन इथली माणसे दुसरीकडल्यापेक्षा अधिक जगतील, असे आई म्हणत असे.

आभाळ आणि माती यांच्यासारखे पाण्याविषयी सारखे काहीतरी वाटत

राही. इतक्या सगळ्या माणसांनी आणूनही नदीचे पाणी संपत कसे नाही, ते कुठून येते, कुठे जाते, कळतच नव्हते.

तिकडे दूर डोंगरातून आमची नदी निघाली होती. वळणावळणांनी येणारे तिचे चित्र दादांनी मला दाखवले होते. आमच्या इथे येऊन ती पुढे समुद्राकडे जात होती.

घरासमोरचे वडाचे आवार ओलांडून गेल्यावर खाली उतार लागे. देवाच्या आवारावर वाकून पसरलेल्या पिंपळापुढे नदीचा घाट सुरू होई. दोन्ही बाजूंच्या गाळाच्या मातीतून तो आपोआप निघाल्यासारखा दिसे. घाटाच्या काळ्याभोर लांब पायऱ्या पाण्यात उतरत जात होत्या. पाण्यातही त्या आणखी खोलखोल उतरत असतील, पाताळात जात असतील असे वाटे.

घाटाच्या दोन्ही बाजूंना काही पायऱ्या उतरल्यावर गोल गरगरीत बुरूज लागत. बुरुजाच्या तळापाशी, सातआठ पायऱ्या एकीपुढे एक ठेवल्याइतकी रुंद पायरी असे. तिला तबक म्हणत. घाट उतरताना डाव्या हाताला देवाची मळी होती. घाटाच्या कडेने निरगुडी वाढलेली होती. उतरताना उजव्या हाताला दुसऱ्या बुरुजावर उंबराचे झाड छाया ढाळी. तिथून घाटाला घासून एक कोरडी घळ नदीकडे उतरे. त्या बाजूला देवळाच्या आवारातला दरवर्षी पडलेला गाळ टाकून मोठी डगर झालेली होती.

समोर पाणी एकदम खोल झालेले होते. डाव्या हाताला लहानसा घाट होता. तिथे पाणी थोडेथोडे खोल होत पुढे गेले होते. लहान घाटावरून नदी येत होती तिकडे पाहिले की लांबवर घरे दिसत. ती एक वाडी होती.

आईबरोबर कधीकधी मी पाण्याला येई. मला घेऊन यायचे म्हणजे तिला खूप ओझे वाटे. ती मला बोटाला घट्ट धरून नेई. समोरच्या घाटाकडे फिरकू देत नसे. लहान घाटावरून कळशी भरून पायरीवर ठेवी. मग पाण्यातल्या पायरीवर मला उतरवून घेई. माझे तोंड धुवी. पायाचा मळ खाण्यासाठी मासे येत. गुदगुल्या होत. पाण्यातल्या पायऱ्या शेवाळल्याने बुळबुळीत झालेल्या असत. पाय घसरेल म्हणून आई जपे. मी कधी नजर चुकवून नदीवर जाईन याची तिला सारखी धास्ती असे.

नदीला इतके घाबरणे दादांना आवडत नसे. त्यांच्याबरोबर मी नदीला जाई. ते सूर मारत. नदीकडे पाठ करून, बुरुजाकडेला उभे राहत आणि पाण्याला डोके न लावता पाण्यात कोलांटी घेत. लोक बघत उभे राहत. आणि असली उडी मारणारे दादा आपले आहेत या भावनेने मला मोठे झाल्यासारखे वाटे. दादा मला पाठीला घेऊन मध्यापर्यंत पोहून आणत. आपल्याला पोहायला आले पाहिजे, सांगत. पाण्याची भीती कमी करत.

एकदा त्यांनी मला बुरुजावरून उचलून एकदम पाण्यात फेकून दिले. नाकातोंडात पाणी जाऊन, भयंकर घाबरून मी पाण्याच्या तळातून वर आलो होतो. पाठोपाठ त्यांनी उडी टाकून मला काठावर आणले होते. पाण्यात पडले की पोहायला येते, असे त्यांचे म्हणणे होते. त्या भीतीच्या क्षणीही मी एकदा पाण्याखाली जाऊन वर आलो होतो. त्यामुळे, मला पोहायला येईलही, असे हलकेच मनात आले होते.

नंतर स्वयंपाकघरातल्या धूर जाणाऱ्या माळ्यावर टांगलेला तांबूस पण काळा झालेला भोपळा दादांनी खाली काढला. त्याला गुंफलेल्या दोऱ्या जुन्या झाल्या होत्या, त्या नवीन विणल्या. आणि तो भोपळा पाठीला बांधून त्यांनी मला तरंगायला शिकविले. भोपळा स्वतः बुडत नव्हता नि मलाही बुडू देत नव्हता. लहान घाटावरून मी बुरुजाला वेढा काढून समोरच्या घाटावर येऊ लागलो. भोपळा न बांधताही आत जाऊ लागलो. आणि माझ्याविषयीच्या काळज्यांतून आईची नदीची एक काळजी संपली.

आमच्या नदीचे पाणी मला फार आवडे. आमचे गाव नव्हते तेव्हा-पासूनच्या अरण्यातही ते होते. ते पसरून राहिलेले पाणी मुळीसुद्धा हलत नसे. त्याच्या सपाट भागावरून चालत जाता येईल असे कितीतरी वेळा वाटे. पाण्यात आभाळाच्या निळ्या रंगाचा तुकडा कुठे उतरलेला असे. मळीची नांगरलेली तांबडी माती उमटलेली दिसे. काठावरल्या कंजाळांच्या काळ्याहिरव्या सावल्या पडलेल्या असत. आणि घाटाजवळ पाणी पांढरे असे. बुरुजावर उभे राहून त्यात तोंड पाहता येई.

पण अचानक एक दिवस आभाळ भरून येई. दिवसाने डोळे मिटल्या-सारखे वाटे. मंद काळोख पडे. स्पष्ट दिसेनासे होई. आणि पावसाला सुरुवात होई. मातीचा सुवास सुटे. सगळीकडे पाऊसच पाऊस...जमिनीतून पाणीच पाणी होई. घरापाठीमागची काळी राने गरगरून वर येत. त्यातून पाणी खाली वाहत येऊ लागे. पाण्याचे लोटच्या लोट वडाखालून नदीकडे धावत सुटत. त्यांचा खळखळ आवाज येई. मातीतून धावतानाही ते पाणी पांढरे दिसे. वडाच्या आवाराला पाण्याच्या लोटांनी ओघळी पडत. घरासमोरच्या झाडांच्या डोक्यावरून पाणी निथळे. झाडे अंगभर आंघोळ करताना हिरवी चकचकीत होत.

तो न संपणारा पाऊस आमच्या घराच्या लाकडी गजांच्या खिडकीतून दिसे. पावसाचे सगळे पाणी नदीला मिळते, नदी निघाली तिथेही याहून खूप पाऊस पडतो, असे आई सांगे. थोड्या वेळाने नदीपलीकडच्या मळ्यातून, वरच्या बाजूस झालेल्या पावसाचे पाणी नदीकडे धावे. ते नदीत पडत असतानाचा मोठा आवाज ऐकू येई. मोठा पाऊस झालेला असे. आणि आता नदीची पांढरी घडी मोडून जाणार असल्याचे लक्षात येई. तिचे छान पाणी तांबडे होऊन जाणार असे. सारखा पाऊस पडणार असे. नदी सारखी मोठी होऊन भरभरून जाणार या कल्पनेने मन भरून जाई.

रात्री गारगार वाटे. पावसाचा आवाज स्वप्नातही ऐकायला येई. वरून नदीला पाणी आल्याचे स्वप्न पडे. पावसाच्या लयीत पहाटे जाग येई. नदीला जाऊन पाणी पाहून यायची घाई होई. सगळ्यांच्या आधी मला पाणी आलेले पाहायचे असे. दादांच्याबरोबर पावसातून मी घाटावर जाई. दादा म्हणत, पाणी यायला अजुनी पाऊस पडला पाहिजे.

घाट धुवून काळाभोर झालेला असे, पण नदी आहे तशीच दिसे. थोडे उभे राहून पाहिले की, नदीच्या पोटात काहीतरी निराळी हालचाल चालल्यासारखी भासे. आपण उभे आहोत तेव्हाच वरून पाणी का येत नाही असा मला प्रश्न पडे. पाणी येईपर्यंत घाटावरच राहावे, दिवसा-रात्री

जेवणसुद्धा घाटावरच घ्यावे आणि नदीचे पाणी पहिल्यांदाच तांबडे कसे होते ते पाहावे असे वाटे.

पाऊस पडतच असे. आणि एका पहाटे दादा मला उठवत. पाणी आल्याचे सांगत. वरून येण्यासाठी, पाणी केव्हा निघाले असेल याचा विचार लगेच मनात सुरू होई.

नवे पाणी पाहायला खूपजण आलेले असत. नदीचा रंग गढूळ होई. समोरच्या घाटाच्या पायऱ्या पाण्याखाली गेलेल्या दिसत. नदीतल्या बुरुजावर पाणी चुळा टाकत असे. गारगार पाण्यात दाट गाळ मिसळलेला असे. पाण्यावर कितीतरी घाण तरंगत आलेली असे. रानशेणी, झाडांमधला वाळला पाचोळा, कुजकी चिपाडे असला पाण्याबरोबर आलेला पवड बघून पाऊस सगळीकडे झाल्याचे गजाननकाका ठरवी. समोरच्या घाटापासचे देवाचे मोठमोठे मासे, गढूळ पाण्यात दिसेनासे झाल्यामुळे वर येईनासे होत. पाण्यातल्या देवळाकडे, खाली सटवाईकडे सुसरींची गडबड चाललेली दिसे. खाली, वर कुठेतरी, शेपटाचे लांब पाते वल्हवत त्या निघालेल्या असत. कुठेतरी त्यांची अंडी मातीतून उघडी पडलेली असत.

नेहमीपेक्षा पाणी जोरात खाली चाललेले असे. चढलेल्या पाण्यात आणि नेहमीच्या पाण्यात पोहायचे निराळे असे. चढलेल्या पाण्याला ओढ असे. दादा मला घेऊन पोहायला येत. पोटाखाली घागर घेऊन दोन्ही हात मारत. मला मागचे पाय धरायला सांगत. स्वतःचे पाय न हलवता नुसत्या हातांनी माझ्यासकट पोहत. अंग गारगार होऊन जाई. लाटांमुळे नाकातोंडात पाणी शिरे. कानातून कळा येत. न घरता पोहायला आले पाहिजे, पाणी चढेल तसतसे जास्त शिकले पाहिजे, महापूर पोहायला गेले पाहिजे, असे दादा सांगत.

पहिल्या तबकावर कमरेइतक्या पाण्यात उभे राहायला मजा वाटे. पाण्याने एखादा दिवस मुक्काम केला तरी तिथे गाळ येऊन साचे. पाऊस उघडला असतानाही कधीकधी पाणी तबकावर थांबून राही. थोडे फुगल्या-सारखे वाटे. त्या वेळी पाण्याला, खाली वेरळेच्या पाण्याचा तुंबा लागल्याचे

काका म्हणे. तिकडे वेरळेचे पाणी आमच्या नदीच्या पाण्याला तटवून पुढे चालल्याने आमची नदी फुगे. वेरळेचा जोर संपला म्हणजे तबकावरले पाणी भरभर उतरायला लागे. पाण्यात खड्डा पडल्यासारखे वाटे. पाण्याला उतरू नको म्हणून सांगितले तरी ते खाली जाई. दोन्ही काठांना उतरणाऱ्या पाण्याच्या खुणा पडत. तांबूस, दाट गाळाची पट्टी खाली सरके. पाणी पात्रात जाणार अशी भीती वाटे.

पाऊस पुन्हा सुरू होई. दिवसभर पाऊस पडे. रात्रीत पाणी तीन बुरुज एकदम चढून वर येई. घाटालगतची निम्मी डगर बुडे. तिथल्या उंबराच्या झाडांच्या खाली झुकलेल्या फांद्या पाण्यात लवून बुडत. वर येत.

आबू गावातल्या घाणीतून तांबडी, गिळगिळीत, वळवळणारी दानवी सदऱ्याच्या खिशात भरून घेई आणि काठीला गळ लावून डगरीला बसे. मासा कसा धरतात ते मला पाहायचे असे. पाणी चढल्यावर देवाचे मासे तळात बसत म्हणून गौरीचे दाजी मासे धरणारांवर तोंड सोडत नसत. वरून जोराने वाहत येणारे मासे गळाला लागत. पलीकडेही गळाला दोरी लावून लोक मळीतून बसलेले दिसत. माशांच्याबद्दल काहीबाही आबू सांगे. गळाच्या दोरीला लावलेले, पाण्यावर तरंगणारे भेंड बुट्ट लागे. मासा गळाला लावलेले दानवे खाऊ लागल्याचे समजे. सटदिशी आबू गळाची काठी वर फेकी. आणि खाताना गळाचा बाकदार आकडा नरड्यांत घुसलेला मासा पाठीमागे फडफडत मातीत पडे. तोंड रक्तबंबाळ झालेला सापासारखा ओंब मासा गळाला लागल्यावर मी पाहिला होता. ओंब मासा लागला म्हणजे आबू मासे धरायचे बंद करी. आधी मिळालेल्या माशांच्या चिंगळ्या आमच्याबरोबर येऊन बसलेल्या वाघ्या कुत्र्याला खाऊ घाली. ओंब खायला फार चांगला असल्याचे सांगे. पाण्यात आनंदाने धावणारे मासे का पकडायचे, त्यांना मारून का खायचे, ते मात्र मला कळत नसे.

डगरीवरून 'गुंडूबुवा' पाण्यात सोडणे गंमतीचे असे. चिपाडाच्या वितीएवढ्या गणगट्याच्या एका टोकाला घट्ट चिखलाचा गोळा लावायचा. पाणी लावून गुळगुळीत करायचा आणि पाण्यात फेकायचा. चिखल

विसविशीत असला तर फेकतानाच निसटून जाई. आणि नुसता गणगटा पालथा पडून पाण्याबरोबर भर्रकन वाहत सुटे. चिखलाचा गोळा बरोबर लागला नसला, एखाद्या बाजूला चिखल जास्त लागला असला, तर गुंड्रबुवा तिकडे झुके. आजारी असल्यासारखा वाटे. पण चांगला जमलेला गुंड्रबुवा पाण्यावर सरळ उभा राहत डौलात जाई. त्याच्या तळाला मातीचा गोळा आहे हे माहीत असल्याशिवाय कळतसुद्धा नसे. तो खूप खाली जाऊन दिसेनासा होईपर्यंत मी पाहत राही. त्याचा पाण्यातला गोळा निसटेपर्यंत तो उभा पोहत जाणार असे. एखाद्या वेळी कितीतरी गुंड्रबुवा पाण्यात पडत आणि त्यांचा ताफाच पोहायला निघे. अर्ध्या डगरीवर आलेल्या पाण्याला धार असे. धारेला पाणी तकतकीत दिसे. पाण्यात लहानलहान भोवरे असत. एखाद्या भोवऱ्यात अडकून गुंड्रबुवा घोटाळे. गरगर फिरे. कधी पाण्यामधल्या घोळात सापडे. मागेपुढे होई. त्याच्याखालची माती निसटून त्याची फजिती होई.

घरासमोरच्या पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी आई नावा करून देई. पण त्या नदीच्या पुराच्या पाण्यात टिकल्या नसत्या.

रात्री भराभर चढून आलेले पाणी दिवसा दमाने चढे. पाऊस थोडा मंदावे. गजाननकाकाजवळ पाण्याच्या चढउताराचे हिशेब असत. तासाला चार बोटे पाणी चढत असल्याचे काका सांगे. दुसऱ्या दिवशी सकाळी आणखी एक बुरूज पाण्याखाली गेल्याचे दिसे. नदीकाठच्या रानात अजुनी पाणी जिरले नसल्याचे काकाचे मत असे. बुरुजावर छाया ढाळणारे उंबराचे झाड नदीचे पाणी पिऊ लागे. त्याच्या तळाची माती सुटे. तिथून देवाच्या फरशीच्या आवाराकडे पाण्याची चोळ फुटे. हळूहळू पाणी आवारात शिरे. उलट दिशेने, त्या पाण्याला समोरून येऊन पाणी मिळे. देवळासमोरच्या डगरीवरल्या उंबराच्या झाडांना पाण्याचा वेढा पडे.

बुडालेल्या बुरुजापासून पडून, उंबरांच्या झाडांना वेढा घालून, दुसऱ्या

बाजूने देवाच्या आवारात यायचे दादा ठरवत. दादांच्याबरोबर मी त्या गारविंचू पाण्यात पडे. ते घागर घेत. विमानाचे शेपूट धरल्यागत मी त्यांच्या पायांना धरी. ते थोडे हात मारत आणि पुढे पाण्याची जोरदार धार सुरू होई. दादांच्याबरोबर मी झपाट्याने खाली जाई. पुन्हा दादा पाणी तोडायला लागत. माझ्यासकट काठाला यायला त्यांना खूप त्रास होई. उंबरांच्या समोर येताच आपण कुठे लागायचे ते सांगत. तिथे पाण्याचे उलटसुलट घोळ असत. दादा जोराने हात मारत. उंबरांच्या झाडांच्या सावलीत येत. डगरीच्या विरत्या मातीला लागत. मला ओढून घेत.

पहिल्यांदा उंबराला वेढा घातल्यावर आपण फार मोठे काही केल्याचे मला वाटले होते. दादांनी मला सांगितले, "तू कुणाला न धरता एकट्याने उंबराला वेढा काढला आहेस." मी ते थोडे खरेही वाटून घ्यायला लागलो होतो. आणि दादा असे म्हणायला लागले की, लवकरच आपल्याला न धरता वेढा काढायला लागणार हेही ओळखले होते. घरी गेल्यावर मी उंबराला वेढा काढून आल्याचे दादांनी सांगितले तेव्हा ते आईला खरेही वाटले नाही.

थोड्या दिवसांनी दादांना न धरता मी उंबराला वेढा काढू लागलो. उंबराच्या सावलीत येताना पाणी तुटता तुटायचे नाही. डगरीला लागता लागता पाणी जोरात खाली ढकले. दादा सांगत की तिथे लागलेच पाहिजे—डगरीच्या खालच्या बाजूला पाण्याचे जोरकस घोळ असत. त्या घोळात सापडल्यावर रंगामामा पार खाली, सटवाईच्या मळीजवळ लागला होता ते आठवून धाकधूक वाटे. चढणाच्या पाण्यात पोहताना, पाण्याचा वेग, पाण्यातले घोळ, भोवरे माहीत पाहिजेत असे दादा म्हणत.

वेगाने खाली जाणारे नदीचे तांबडे पाणी मध्यावर पांढरे दिसे. नि मध्याच्या पलीकडे झाडीमुळे हिरवे वाटे. मध्याच्या धारेपाशी आपण पोहत गेलो तर धारेने कापले जाऊ असे वाटे. खाली जाणाऱ्या पाण्यात, ठेकठिकाणी निरनिराळ्या आकाराचे घोळ दिसत. तिथे पाणी निरनिराळ्या बाजूने फिरत असे. खाली जाणाऱ्या जोरदार पाण्यात, पाण्याच्या उलट दिशेनेही नेणारे घोळ असत.

पाण्याची देवाच्या आवारात चोळ फुटली की, देवाकडे गडबड सुरू होई. देवाच्या आवारात थोडे पाणी येईपर्यंत पाण्यात खेळायला मजा असे. आवारातल्या वाळूत पाय थापून केलेल्या चिमण्यांच्या कोट्यातून लाटा जात. आभाळातून पावसाचे थेंब पडत आणि प्रत्येक थेंबाचे आवारातल्या पाण्यात मजेशीर वर्तुळ तयार होऊन फुटे. आवारात गुडघ्याइतके पाणी झाले म्हणजे गौरीचे दाजी रागावायला लागत. घरी हाकलत. देवळात पाणी शिरायला सुरुवात होताच देव वरच्या देवघरात न्यायचे असत.

देवळाला पाण्याचा वेढा पडत असताना, देवळापाठीमागच्या एका मोठ्या ओवरीला असलेले, गाळाच्या रंगाचे, पन्न्याचे उंच दार उघडले जाई. ते पालखीचे घर होते. तिथल्या भिंती मखमलीसारख्या हिरव्या शेवाळाने झाकलेल्या असत. त्यांना नेहमी एक ओला, कुबट वास येई. भाऊ दातार आणि गोपाळराव तिथली पालखी उचलत. वर घेऊन जात. चांदीची काठी, अब्दागिऱ्या, पालखीचे सगळे काही हलवले जाई. गौरीचा, विमलीचा त्यात उत्साहाने भाग असे. बारीकवारीक वस्तू त्या अवघडत वर नेऊं लागत. आणि पालखीचे घर पाण्याकरता चार महिने मोकळे ठेवले जाई.

वासूनाना कमरेइतक्या पाण्यातून, चांदीचा पत्रा असलेली देवळाची रंगीत दारे पाण्यावर ठेवून तरंगत आणी. गाभाऱ्यातली जरीने भरलेली काळी तसबीर, अभिषेकाची चांदीची झारी वर नेली जाई. घाटाच्या शेवटच्या बुरुजाचा, देवाच्या आवाराकडे असलेला कोनाडा अर्धा बुडला की, पाण्याची लाट देवळाच्या उंबऱ्यावरून गाभाऱ्यात उडी घेणार असे. दगडावर कधीकाळी उमटलेल्या आतल्या दोन पावलांना भेटणार असे. कोनाड्याच्या कंगोऱ्याला पाणी लागताच, भाऊ दातार देवळाची टांगलेली घंटा वाजवायला सुरुवात करी. गावभर घंटेचा आवाज भरून राही. देव वर येणार हे सगळ्यांना कळे. बागेतला बापू देवाच्या फुलांची परडी घेऊन येई. आणि देवळाच्या उंबऱ्यावरून पाणी आत जायची वाट पाहत उभे

असलेले गौरीचे दाजी, पाणी आत जाताच तिथल्या चांदीच्या पादुका चांदीच्या ताटातून बाहेर आणत. देवळाच्या पाण्यातल्या पायरीवरच उभे राहून आरती होई. भाऊ दातार जोरजोराने आरती म्हणत झांजा वाजवी. अर्जुना छातीइतक्या पाण्यात उभा राहून हातातल्या काठीने डोक्यावर टांगलेली घंटा बडवी. वरच्या पिंपळापासून हे सगळे दिसे. आरती संपे. दाजी पाण्यातून देव घेऊन वर येत. तोंडाने काही म्हणत असत. सावकारांच्या लिंब्रापासच्या देवघरात देव येत. दालचिनी, सुंठ, खडीसाखर घातलेला काढा चांदीच्या वाटीतून भाऊ दातार घरोघरी आणून देई. तो ऊनदाट, तिखटसर काढा मिळण्यासाठी देव वरखाली व्हावेत असे वाटे.

कधीकधी दिवसातून कितीतरी वेळा देव वर येत, खाली जात. गाभाऱ्यातल्या पाण्याची लाट खाली गेली की, लगेच्च देव खाली आणावे लागत. लाट वर आली की पुन्हा वर. गौरीचे दाजी इतके म्हातारे झाले असूनही पाण्यात उतरायला नेहमी तयार असत. देवळाच्या मेघडंबऱ्यांपाशी आलेले पाणी असे सारखे दमवत राही. रात्रीही देवळापाशी जागत वसावे लागे. फार वर्षांपूर्वी रात्रीतून एकदम पाणी चढल्यामुळे देव पाण्यात बुडले होते. वरती आणता आले नव्हते. नंतर देवाचा कोप झाला होता. गाभारा काजळीने भरून गेला होता. ओला दुष्काळ पडला होता.

देव वर आलेले असले तरी बुडलेल्या देवळाकडे, पाणी असेल तिथपर्यंत येऊन आरती होई. भाऊ दातार पाण्यात बुडालेल्या पादुकांकडे बघत आरती म्हणे. ते बघताना माझ्या पोटात कसेतरीच होई.

रात्रीअपरात्री झांजा वाजत. आईला जाग येई. स्वतःशीच ती म्हणे, "देव खाली जाताहेत वाटतं."

थोडा उघडलेला पाऊस सुरू होई. पाणी सावकाश सावकाश वर येई. देवासमोरली घंटा बुडे. मेघडंबरीतली पिंडी पाण्याखाली जाई. तिन्ही बाजूंच्या उघड्या ओवऱ्या अर्ध्या उरत. त्यांच्या कमानींची छान रांग दिसे.



देवळाच्या आवारावरच्या पिंपळापासून खाली खोलात दिसणारे पाणी सारखे वघत राहावे वाटे.

देवाच्या आवारावर छाया ढाळणाऱ्या पिंपळापासून, देवळाच्या आवाराला जाणाऱ्या खड्या पायऱ्या होत्या. पायऱ्यांना लागून आणखी एक उंच मोठी गच्ची. खाली उतरताना पायऱ्यांच्या डाव्या बाजूला मातीचा थर होता. देवाकडे पाणी आले की, घाटाच्या उरलेल्या काही पायऱ्या आणि देवळाच्या आवाराकडे जाणाऱ्या पायऱ्या असा दोन्हीकडे घाट तयार होई. देवळाच्या बाजूच्या पायऱ्यांकडे बायका उतरत. तिकडे पाण्याला ओढ नसे. घाटाकडून, उंबरांच्या झाडीकडला घोळ चुकवल्यावर आवारातल्या पाण्यात पोहताना उन्हाळ्यातल्या शांत पाण्यात असल्यासारखे वाटे.

देवळासमोर पोहत आल्यावर पाण्याखाली गेलेली घंटा चुकवून पुढे व्हावे लागे. घंटेच्या पुढचे आवारातले उंबराचे झाड हिरवे चकचकीत दिसे. सगळ्या बाजूंनी पाण्याने वेढलेल्या त्या उंबरावर एक वानर पाण्यात बघत एकटेच वसलेले दिसे. झाड ओलांडून गोल पोहत जाताना पालखीचे घर, देवळामागचे उंबराचे झाड आणि त्याही पुढे, खालून वरच्या उंच गच्चीपर्यंत गेलेले उंबराचे झाड लागे. उंबराच्या झाडामधून वाकडातिकडा होत आमच्यापुढून एखादा साप निघून जाई. दादा सांगत, "त्याला पाण्यात चावता येत नाही."

दादा तिथल्या ओवरीच्या कमानीखालच्या पाण्यात जात. मला पाठोपाठ यायला सांगत. ओवरीतल्या मंद प्रकाशाच्या पाण्यात फार अद्भुत वाटे. मी कमानीच्या छताला हात लावी. आणि पाणी उतरून गेल्यावर, आपल्या डोक्यावर कितीतरी उंच असलेल्या त्या जागी आपण हात लावला याचे किती वाटेल त्याचा विचार करी. कमानीखालच्या पाण्यात अधिकच गार वाटे. तिथे बोलताना आवाज केवढातरी घुमे. कमानीतून घोटाळणारा एखादा साप येईल अशी भीती वाटे. किशाच्या धोतरात एकदा कसा साप गेला होता नि धोतर पाण्यातच फेडून तो कसा काठावर आला होता ते दादा त्यावेळी सांगत नि माझी ती भीती मोठी होई.

दादा आवारातल्या पाण्यात उडी मारत. मलाही उडी ठोकायला सांगत. खाली पाहताना डोळे फिरत. पण दादा खाली असल्यामुळे मी उडी टाकी. पाण्यात उडी टाकताना आडवेतिडवे पडले तर अंगाला मार बसे. अंग लाल होई. उडी सरळ टाकावी लागे. पाण्यातल्या गार भागात शिरताना वर निघण्याची घाई होई. वरच्या मातीच्या थरावरून, गच्चीवरून आणि उंच गच्चीवरूनही मी पाण्यांत उड्या मारायला शिकलो. खोलातले पाणी बघताना छातीत लकाकायचे कमी होऊ लागले. नजर मरू लागली.

दादांच्याबरोबर मठाकडून पडून मी घाटावर लागू लागलो. मठाचा पाणवठा आमच्या घाटाच्या बराच वर होता. तिथून झेप घेऊन थोडे हात मारत पाण्यातल्या कमी जोराच्या धारेला लागायचे. दादा म्हणत, पुढची मोठी धार तुटणार नाही. बघता बघता घाटालगतची मळी येई. तिथे पुन्हा जोराने हात मारावे लागत. उंबरांच्या झाडीला वेढा घालून वर यायचे असे.

सगळा घाट बुडून जाऊन पाणी वरच्या भागाला समांतर झाल्यावर आम्ही पलीकडे पोहत गेलो होतो. दादांनी माझ्यासाठी घागर घेतली होती. थोरातांचा रामा आणि आबू आमच्याबरोबर होते. रामा तर पाणी कितीही चढले तरी रोज पलीकडे पोहत जाऊन पोहत येत असे. आम्हाला पलीकडच्या भुवनेश्वरीच्या पाणवठ्याला लागायचे होते. आम्ही मठाच्याही थोड्या वर मळीत जाऊन पाण्यात पडलो. पाणी फार जोरात पळत होते. तिरकी धार तोडत जायचे होते. बघावे तिकडे नुसते पाणीच पाणी होते. मध्यावरच्या भयंकर धारेपाशी मी पहिल्यांदाच येत होतो. रामा आणि आबू चांगले पोहणारे होते. मी भेंडाळत होतो. दादा मला घागर धरायला देत होते. काही वेळाने आम्ही पलीकडच्या पाणवठ्याच्या खाली लागलो. केवढे तरी पाणी ओलांडून आम्ही पोहून आलो होतो. अंगातले रक्त जणू गोठून गेले होते. पायातून जीव गेल्यासारखे वाटत होते. हात हालवता येत नव्हते. मळीतल्या गाळातच आम्ही थांबलो. अजून आम्हाला मळीतल्या गाळातून पाय बुडवत, वर काढत वरच्या तावदराच्या जांभळीपर्यंत जायचे होते. पलीकडे घाटापाशी लागायचे होते. आणि

नाव मिळण्यासारखी नव्हती. ती भिलवडीकडे गेली होती. आमच्यापासून मैलभर खाली होती.

नाव नेतानासुद्धा अशीच वर न्यावी लागे. नावेला औले मारावी लागत. पाणी चढल्यावर महादू आंबी स्वतः तपकिरी पटका आणि खाकी कोट घालून नावेवर येई. मठाकडून आत पाडलेली नाव पलीकडल्या भुवनेश्वरीच्या पाणवठ्याला लागे. आणि तावदराच्या जांभळीपासून आत पाडलेली नाव आमच्या घाटापाशी येई. पाणी चढेल तशी नाव अधिक वर चढवावी लागे. आत पाडलेली नाव इतक्या जोरात खाली येई की, ती कुठल्या पाण्याखाली गेलेल्या झाडाला थटली असती तर तिचा तुकडासुद्धा बघायला मिळाला नसता. पाण्यातल्या वळणांची महादबाला फार माहिती होती. पाणी चढल्यावर तो स्वतः सुकाणू धरत असे. नावेत कुणी कुठे बसायचे, नावेचा तोल कसा सांभाळायचा, ते तो कुणाचे न ऐकता स्वतः ठरवी. कुणी ऐकले नाही तर कुठल्याही बाजीरावाला नावेतून खाली उतरवी. आमच्या इथली नाव महादबामुळे प्रसिद्ध होती. कितीही पाण्यात तो नाव घाली. महादबाला नाव म्हणजे स्वतःचे घरच वाटे.

नावांच्या शर्यतीसाठी एकदा खालच्या आणि वरच्या डोहातल्या बऱ्याच नावा आल्या होत्या. महादबासारखा, नावेचा मालक असल्यासारख्या चेहऱ्याचा एक-एक माणूस प्रत्येक नावेत होता. पण महादबासारखा रुबाब कुणाचाच नव्हता. नावा आमच्या डगरीच्या चिंचेशी आलेल्या पाण्यापासून सुटणार होत्या. पलीकडच्या भुवनेश्वरीच्या पाणवठ्याच्या झाडीत गेलेल्या पाण्याच्या सरळ रेषेत कुठेही खाली न सरकता न्यावयाच्या होत्या. पाण्याला फार धार पडलेली होती. धारेने नावेला टेकूसुद्धा दिले नसते. काठावर पाहण्यासाठी गर्दी झाली होती. महादबाने औलासाठी पलीकडले गुरव आणले होते. नावा एकदम सुटल्या. औले पाण्यात जोरात फिरू लागली. सरळतीर जाणाऱ्या नावा धारेपाशी येताच मंदावू

लागल्या. नाकासमोरचे पलीकडल्या झाडीतले पाणी एकेका नावेच्या टप्प्यातून चुकू लागले. काठावरल्या आणि नावांतल्या लोकांचा आवाज वाढत होता. धारेने नावांना खाली ओढले होते. आमची नाव मात्र सरळ जात होती. धारेला सरळ कापत होती. महादबाचा घोगरा आवाज औलांवरल्या लोकांना ईर्षा चढवत होता. आमची नाव कुठेही सरळ रेघेतून न ढळता पलीकडल्या झाडीच्या पाण्यात लागली होती. उरलेल्या नावा कशातरी, कितीतरी खाली लागल्या होत्या. अलीकडे आल्यावर आमच्या नावेच्या औलांवर बसलेल्या गुरवांचे तळहात आम्ही पाहिले होते. हातांची पार सालडी निघून ते रक्ताळले होते.

देवाच्या आवाराकडे उतरणाऱ्या पायऱ्या बुडून गेल्यावर, आवारातल्या संथ पाण्याला ओढ सुरू होई. गावाचा तो खोलातला सगळा भाग भरून येताना पाण्याची चांगली दमणूक होई. तिथून पुढे येताना त्याचा वर येण्याचा भाग मोठा, रुंद झाला तरी ते इतके कुचमत नसे. त्याला बराचसा सपाट भाग दिसू लागलेला असे. देवाकडच्या पायऱ्या बुडाल्यावर आई लहान गचीवर धुवायला येई. तिच्यालगतची मोठी गची बुडाली की तिच्याही पलीकडे लागून आणखी एक ओबडधोबड दगडाचा कट्टा होता.

सकाळी येऊन बघावे तर मोठी गची बुडलेली असे. तिच्यासमोरच्या पिंपळाला वेढा पडलेला असे. पिंपळातळच्या काळ्या दगडांवरच्या पादुकांवर लाटा चुचकत असत. आणि पाण्याने वेढलेला तो हिरवागार सळसळता पिंपळ अतिशय आनंदल्यासारखा दिसे. त्याला खरोखरी आनंदाने वाचा फुटेल असे वाटे.

पाणी पिंपळाला वेढा देऊन आल्यावर गजाननकाका पाण्यापाशी खुणा करत राही. पाण्यापासून हातभर वर, जिथे कुणी जात नाही अशा ठिकाणी, ओल्या मातीत पाण्याला समांतर रेघ मारून ठेवी. रेघेवर चिपाडाचे, काटक्यांचे तुकडे उभे रोवी. आणि पाणी उतरते आहे की चढते आहे,

पाण्याचा वेग किती आहे, ते थोड्याथोड्या वेळाने येऊन आमच्या दादांना सांगे. दादांच्याबरोबर चर्चा करी. या वेगाने पाणी चढले तर केव्हा कुठे यायला पाहिजे यावरची मते बोलून दाखवी. पण काकाच्या खुणा करण्याचा आम्हाला राग येई. पाण्याला खुणा केल्या की, त्याचा अपमान होतो. ते उतरू लागते. काका आमच्याकडे आलेला बघून आम्ही पाण्यापासच्या खुणा मुजवून टाकत असू. मग काकाचे आडाखे चुकत. काका ती गोष्ट जिवाला लावून घेई. उतरलेल्या चेहऱ्याने दादांच्याकडे येऊन म्हणे, "नै, पोरं चावट झाली बरं का!" मात्र आम्ही खुणा मुजवताना काकाला सापडलो असतो तर आमची धडगत नव्हती.

काकाच्या खुणांसारखी आम्हाला धास्ती असे ती थांबलेल्या पावसाची आणि पातळ पापुद्र्यासारख्या पडणाऱ्या उन्हाची. पाऊस थांबला, ऊन्ह पसरू लागले की, पाणी उतरायला लागे. पाणी कधी उतरूच नये असे वाटे. आणि मनात सारखे तसे आणत राहिले तर ते चढेलही असा विश्वास येई.

मोठ्या गच्चीवरच्या दगडी कट्ट्याला पाणी शिवले की, तिथल्या पिंपळापासून देवाच्या बागेला घासून जाणारी मठाची वाट पाण्याखाली जाई. तिथे टपटपणारी बिट्ट्यांची पिवळी फुले पिंपळापासच्या पाण्यातल्या घोळात वाहत येऊन तिथल्या तिथे गोल फिरत राहत. मठाकडे वरच्या वाटेने जावे लागे. डगरीकडेच्या घरातल्या तात्याभटजींची, नागेशशास्त्र्यांची गडबड सुरू होई. पुढून त्यांच्या दारापाशी पाणी आलेले असे. पाठीमागून मळीतूनही पाण्याने घेरलेले असे. अगदी लागलेच तर हलायचे असे नागेशशास्त्र्यांचे असे. ते अतिशय निर्धाराने असत.

पाणी दारात आल्यावर नागेशशास्त्री पंचा लावून बाहेर येत. बाहेरच्या चिंचेखाली पाण्यापाशी, दिगंबरशास्त्री, बापूजी, गजाननकाका, प्रसादजी दोन पायांवर बसलेले असत. पाण्याचा वेग वाढता असे. पाण्यातून फडा काढत एखादा पिवळाधमक नाग येई. गारठलेला असला तरी त्याला ताव असे. काठावर टेकताटेकताच त्याला प्रसादजी एका काठीत उरफाटातिर-

फाटा करत. पाण्यातून मधूनमधून सारखे साप येत. पाण्याच्या मध्यातून जोरात वाहत जाणाऱ्या कडव्याच्या गंजीवर, मोठ्या झाडावर वेटोळे घालून बसलेला एखादा नाग प्रवासाला निघालेलं असे. एक केवढीतरी धामीण त्या पाण्यातून आली होती.

गावात नेहमी साप निघत. कोकणातलेसुद्धा साप त्यांत असत. आई म्हणे, "ही काही सापांची भूमी नव्हे." पाण्याबरोबर ते महावळेश्वराकडून येत होते. जागा मिळेल तिथे शिरत होते. काहींच्या अंगावरले रंगीत, मोहक ठिपके बघताना ते विषारी नसते तर किती चांगले झाले असते असे वाटे.

झाडांच्या छायांमधून पसरत येणारे पाणी पाहतापाहता चिंचेपुढे येई. पाऊस सारखा सुरू असे. पाण्याला फार जोर असल्याचे काका म्हणे. मोठमोठी उमळलेली झाडे मध्यातल्या धारेतून झपाट्याने जाताना दिसत. उरलेल्या मळीचे मातीचे कडे कोसळल्याचा आवाज येई. नागेशशास्त्र्यांना घरातून दुसरीकडे हलण्यासाठी सांगितले जाई. पण पडवीत पाणी आले तरी माजघरात राहायची त्यांची तयारी असे. त्यांनी हे धाडस करू नये असे सर्वांना वाटे. रात्री त्यांच्या पुढच्या उंबऱ्याला पाणी लागे. त्यांच्या आणि दिगंबरशास्त्र्यांच्या घरातल्या दिव्यांचा तांबूस प्रकाश समोर आलेल्या पाण्यावर पसरे. काळोखातल्या पाण्यावरचा प्रकाश खालीवर हिनकळे. नागेशशास्त्र्यांचे घर सगळ्या बाजूंनी पाण्यात येई. वडाखाली नाव चालू लागे. नाव नागेशशास्त्र्यांच्या दारात नेली जाई. त्यांनी पडवीतले सगळे माजघराच्या माळ्यावर चढवून ठेवलेले असे. आतलीसुद्धा आवराआवर केलेली दिसे. पाठीमागच्या अंगणातली काळी गाय वर आणून बांधलेली असे. त्यांच्या घरातल्यांचा धीर बघितल्यावर ही माणसे माळ्यावरसुद्धा राहतील असे वाटे. नावेतून त्यांना उंचावरच्या भागात आणले जाई.

आम्हाला चालता येते तिथे वडाखाली. पावसाळ्यात नाव चालते हे उगीचच लक्षात येई. नदीच्या मध्यावर किती पुरुष पाणी असेल त्याचा हिशेब आपोआप मनात सुरू होई. वडाचे आवार पाण्याने भरे. वडाखालचा पिंपळपार अर्धा बुडे. देवाच्या बागेकडून आलेले पाणी

बाळंभटजींच्या घराच्या बागेकडच्या भिंतीला धडके. पुढून वडाच्या बाजूनेही येई. आणखी पाणी आले तर त्यांनाही हलावे लागणार असे. ब्रह्मानंदाच्या पायऱ्यांना पाणी लागे. वडाला लाटा शिवू लागत.

दारातून समोर पाणीच्च पाणी दिसे. पाण्याकडे झुकून पाने वाजवणाऱ्या दोन्ही बाजूंच्या झाडांच्या कमानीतून पलीकडे पार आभाळापर्यंत पोचलेले पाणी...वर्षाचे पाणी ती मोठी झाडे पिऊन घेत. पाठीमागच्या दारूनही वळण घेऊन गेलेल्या नदीचे पाणी आमच्याकडे वाढताना दिसे. पाठीमागून मिलवडीकडे गेलेल्या रस्त्यावर पाणी येई. रस्त्यालगतच्या द्यानू मास्तरांच्या घरात शिरे. दिवसातून एखादीच नाव मिलवडीकडून येई; तीही बंद होई. सगळ्या बाजूंनी गावाच्या वाटा बंद होत. गोल वळतवळत गेलेल्या नदीच्या पाण्यामुळे आमचे गाव बेट होऊन जाई. पावसाच्या उभ्याआडव्या धारांच्या जाळीतून ते पाणी पाहत आईबरोबर मी पाठीमागच्या दारात उभा राही. आई एक लहानसा सुस्कारा सोडी. "परमेश्वराचे काय खेळ आहेत!" असे म्हणे. पाणी आणखी चढले तर सबंध गावात शिरून जाईल. पण त्याच्याच कृपेने गाव, प्रत्येक पाण्याच्या वेळी, न बुडता हसत उभे राही.

तरी आई रात्री जागी राहून स्वतःशीच काळजी करी. रात्रीत पाठीमागून पाणी येऊन गाव वाहून गेले तर काय करायचे?

पावसाच्या आणि चढणाऱ्या पाण्याच्या आवाजात वसुदेवाला यमुनेने कशी वाट दिली ती गोष्ट आई सांगे. आणि कधीकाळी आमचे गावच मथुरा होते, आमची नदीच यमुना होती, असे वाटू लागे. मग आमच्या भरलेल्या नदीने कुठून वाट दिली असेल ती जागा मी डोळ्यापुढे आणून बघे. आईच्या दुसऱ्या गोष्टीत ती एकएक पायरी चढत गंगा भेटायला येत असे. आणि गोष्टीतल्या त्या कुणाला तरी भेटताच ती कशी उतरून गेली ते ऐकत असताना, आमची नदीही तिच्या मुलाला भेटायला येते आहे, तो न दिसता गावात कुठेतरी उभा आहे. आणि त्याला स्पर्श करून ती परतणार आहे, असा भास होई.

काका वडापाशी पाण्याजवळ असे. पावसाचा जोर असे. सगळीकडे अंधारून आलेले असे. पाऊस, चढणारे पाणी आणि झाडांची सळसळती पाने यांचा एक मिसळलेला आवाज गावात भरून राही. येणारी लाट पुढेच येते आहे. पाठीमागून येणारी लाट आधीच्या लाटेच्या पुढे येऊन उभी राहते आहे, असे काका सांगे. या वर्षी चौदा साल होणार काय, अशी काकाला चिंता पडे. गावातल्या सगळ्यात उंचावर असलेल्या आमच्या घराच्या उंबऱ्याला चौदा साली पाणी लागले होते. पलीकडची सगळी घरे पाण्याखाली गेली होती. त्या साली कुठे, किती पाणी होते ते काकाला माहीत होते.

घरासमोरच्या वडाला वेढा पडल्यावर महापूर आला असे समजले जात असे. वडाखाली पाणी आले म्हणजे वडाला केव्हा वेढा पडतो असे होऊन नाई. कधीकधी चढणारे पाणी वडाच्या दोन्ही बाजूंनी येई, पण वेढा न घालता परते. त्या वेळी हिरमुसायला होई. पण गंमत म्हणून थोडे उतरून गेलेले पाणी पुन्हा वर येई. पुसटसे पसरलेले ऊन्ह मावळे. वडाला वेढा पडे, आणि महापूर आल्याचे गावात जिकडेतिकडे होई.

आमच्या गावापाठीमागच्या अंकलखोपहून महापूर पोहायला लोक आज-उद्या येतील, असे बोलले जाई. वडाखालचा पिंपळपार बुडे. शिराळकरांच्या घरात पाणी जाई. तिथून ते गजाननकाकाच्या घराच्या लांब भिंतीला घासून पुढे धावणार असे. पण काका तिथे मातीचा मोठा तुंबा लावून पाण्याला आडवी. भिंतीच्या पायात पाणी शिरू देत नसे. पाण्यापाशी सारखा असणारा काका पाण्याचा कोण होता, कुणास ठाऊक...

बाहेर बोलवायला आल्यासारख्या रात्रीच्या चढणाऱ्या पाण्याच्या जाणिवेने, लोक महापूर पोहायला केव्हा पडताहेत याची आई वाट पाही.

सकाळी अंकलखोपच्या वाटेकडून शिंग वाजे. ढोलाचे आवाज ऐकू येत. जवळजवळ येत. लोकांच्या आवाजांची गजबज त्यात मिसळे. महापूर पोहायला लोक आलेले असत. त्यांना बघायला अवघे गाव गोळा होई. लंगोट लावलेले, धोतराचे काचे मारलेले, कानात पाणी जाऊ नये म्हणून डोक्याला टावेल गुंडाळलेले, कितीतरी उघडे लोक नाचत येत. पुढे ढोल

असे. लेजिमा असत. त्यात महापूर दरवर्षी पोहायला जाणारे जुने लोक असत. काही नवीन मुलांना महापुरात नेण्यासाठी आणलेले असे. आमच्या गावातली माणसे पोहायच्या तयारीने त्यांच्यात मिसळत. कुणाजवळ भोपळ्यांची सांगड असे. कुणी घागर घेई. नाना सामंतांची सगळ्यांना आठवण येई. ते आता आपल्यात नाहीत म्हणून सगळे हळहळत. महापूर पोहायला जायची आवड त्यांनीच लोकात वाढवली होती. ते गावातल्या लोकांना महापूर पोहण्यासाठी जमवायचे. नवीन-नवीन पोहणारे शिकवून तयार करायचे. धीर द्यायचे. महापुरातून जाणाऱ्या त्या यात्रेचे नानाच मुख्य असत—महापुरात पडणाऱ्या प्रत्येकाला नानांची उणीव भासे.

एवढ्या मोठ्या पाण्यात पोहायला जायचे नाही म्हणून दादांना थोरली आई सांगे. सकाळपासून तोंडात काहीच न घेता राही. तरी दादा न ऐकता जात. थोरली आई आपल्या एकुलत्या मुलाची काळजी करत, दादा परत येईपर्यंत जेवायची थांबे. आणि आई दारात वाट बघत उभी राही.

नदीची पूजा केली जाई. नागेशशास्त्री घडघड पूजा सांगत. नदीला हिरवे लुगडे, नारळ देऊन ओटी भरली जाई. तिचा मान केला जाई. "आली आहेस तिथेच थांबून परत जा" अशा अर्थाची प्रार्थना होई. आणि मोठा जयजयकार करत पाण्यात उड्या पडत. डगरीच्या चिंचेपासून पुढे लोक एकदम धारेला लागत. जिकडे तिकडे पाण्यातून खाली जाणारी डोकी दिसत. बघता बघता दादा पाण्याबरोबर खाली जाऊन दिसेनासे होत. सगळा शुकशुकाट होई.

पाणी तोडताना पलीकडच्या सटवाईच्या मळीपाशी तळात दाबणारा घोळ चुकवावा लागे. घोळात सापडेल त्याला पाणी बुडवून टाकी. दुसरा घोळ होता तो भिलवडीच्या घाटावरच्या ओवऱ्यांच्या अलीकडून जाणाऱ्या ओतातला. तो कुणीकडल्या कुणीकडे आडरानात घेऊन जाई. ओताजवळच्या पाण्याखाली गेलेल्या देवळावर गाडीच्या चाकाएवढा भोवरा झालेला असे. त्या भोवऱ्यात आमची मोठी नाव सापडली असती तरी गरगर फिरून बुडाली असती, असे दादा म्हणत.

तो ओत आणि घाटावरच्या ओवऱ्या यांच्यामधल्या शाळेच्या उंचवट्या-पाशी पोहून लागायचे असे. तिथे पोहताना खरा कस लागे. पुरातून गारठून आलेल्यांच्यासाठी तिथल्या उंचवट्यावर कडव्याच्या पेंड्या पेटवून शेकण्याकरता जाळ केलेला असे. पोत्यांनी हावळा भाजलेला असे. पोहत येणारांची वाट बघत लोक उभे असत. पोहून येणारांना शिरा, कॉफी देत. दादा सांगत, तिथे पोचेपर्यंत अंग इतके गारठून जाई की, जमिनीला पाय टेकले तरी कळत नसे. एकएक माणूस जवळपास लागे. कोण मागे उरला आहे, भेंडाळला आहे, बघितले जाई. त्याला आणण्याकरता लोक मागे रेंगाळलेले असत. सगळे सुखरूप काठाला लागत. "सगळ्यांना धरून जायचे" ही महापुराच्या पाण्यातली भाषा असे.

भिलवडीला उतरलेली माणसे पुन्हा पाण्यात पडत. भिलवडीइतकेच पुढचे अंतर पोहून जायचे असे. भिलवडीच्या खाली फार उंच लाटा मारत. चांगल्या दमाचे लोक पुढे जात. उरलेले नावेने परतत. दादा, बापूजी, आणखी काही माणसे पुन्हा पाण्यात पडत. अंकलखोपला लागून तिथून दुपारी चालत येत.

महापुराची वर्णने गावात सुरू होत. मध्येच पाऊस पडून दिसेनासे कसे झाले, मग वारा कसा सुटला, ते ऐकायला हुरूप वाटे. गजाननकाका तपशिलाचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठी जागरूक असे. महापूर पोहून झाला, आता पाणी उतरेल, असे म्हटले जाई. उघडीप पडे. महापूर पोहायला पडल्याबरोबरच पाण्याने दम टाकल्याचे काकाने पाहिलेले असे. आमच्या दारापाशी आलेल्या पाण्यात, झाडांची गडद हिरवीकाळी नक्षी पसरून राहिलेली असे. आणि दोन दिवस आळशी अजगरासारखे थांबून राहिलेले पाणी हळूहळू मागे सरायला लागे.

एकदा महापूर येऊन गेल्यावर पुन्हा तेवढे पाणी येत नसे. महापूर पोहायला आतापर्यंत दुसऱ्यांदा कधीच लागले नाही असे थोरली आई सांगे.

पाणी उतरेल तशा, पाणी येऊन गेलेल्याच्या ओल्या खुणा घरांवर, झाडांवर उरत. तिथे बुरशी येऊन विचित्र वास येई. शिराळकरांच्या वोळात पडलेल्या आंब्याच्या कोयांना तांबडीलूस पाने फुटत. वडाच्या आवारांत पावलांइतका मऊ गाळ अंथरून पडे. कुणी न तुडवलेल्या, सपाट, वाळत आलेल्या गाळावर पहिल्यांदा पावले उमटवत जायला आनंद वाटे. गाळावर वाऱ्यामुळे बारीक रेघा पडत. आणि मोठ्या ताटात ओतून कापलेल्या खरवसासारखेते चित्र दिसे.

पाणी उतरेल तसा, ओवऱ्यांवरल्या गच्चीवरचा गाळ पाण्यात फेकला जाई. घाटावरच्या पायऱ्याही पाणी खाली जाईल तशा स्वच्छ कराव्या लागत. रोज सकाळी लवकर उठून बापूजी, पंडितदादा, गजाननकाका यांचा हा कार्यक्रम असे. पाणी उतरताना निसरडे होई. कुणी ना कुणी पाण्याला जाताना आपटून राडेराड होई. वाळत चाललेल्या वाटेच्या गाळावर पावसाचे थोडेसे शिंतोडे पडले तर पायाची बोटे रुतवून चालावे लागे. खाली गेलेले पाणी मध्येच कुठेतरी, बरेच दिवस न उतरता तसेच थांबून राही. पुन्हा थोडे वर येऊ बघे; पण त्यात दम नसे. ते पुन्हा उतरत जाई. देवाच्या आवारातले पाणी कमी होई. आवारात किती गाळ पडला असला पाहिजे त्याचा गजाननकाका अंदाज करी. दरवर्षीपेक्षा गाळ जास्त पडल्याचे काकाचे नेहमीचे मत असे.

देव खाली नेताना कमरेइतक्या गाळातून जावे लागे. गाभारा धुण्यासाठी काळजीने पाहावे लागे. पादुकांपाशी एखादा साप निवांत बसलेला असे. त्याला बाहेर काढून मारायचे असे. ओवऱ्यांमधल्या गाळातून पाण्याबरोबर बाहेर पडायचे विसरलेले साप असत. एखादा सुसरीचा बांडही गाळात रुतलेला असे. जवळ गेले की फिसकारे. कमरेइतक्या गाळातून, चांदीची आरती हातात घेऊन गौरीचे दाजी, भाऊ दातार, 'इंदुकोटि तेजकीर्ण' म्हणत देवळाभोवती प्रदक्षणा काढत. देवळाकडे जाण्यापुरती, गाळ खोदून खोल वाट काढलेली असे. त्या वाटेतून जाताना डोक्याच्या वर गाळाची उंची असे. गाळाच्या कापात मधूनमधून वाळूचे निळसर थर दिसत.

देवळासमोरच्या डगरीच्या उंबरझाडांच्या पानांना गाळाचा रंग चढलेला असे. चिखलांतून डोकी वर काढल्यासारखी ती दिसत. पाण्याच्या जोराने बुरुजापासच्या उंबराच्या तळाची माती सुटून ते घाटाकडे कले. आवारातला गाळ काढायला किती दिवस लागतील त्याचा काका हिशोब करी. त्या उंबराच्या तळात, उकरलेल्या गाळाची भर टाकली पाहिजे असे म्हणे.

एक-एक बुरुज पाणी खाली जाई. पाण्याचा रंग निवळे. घाटावरले काळसर निळसर मासे कल्लयांनी मधूनच पाणी कापून जाऊ लागत. पलीकडून शेपूट हलवत, सबंध अंग दाखवत सुसर पहिल्यांदाच पाण्यावर निघे.

बुडून गेलेल्या मळ्यातल्या शेवऱ्यातून गाळ अडकलेला असे. दादांच्या-बरोबर मी आमच्या पलीकडच्या मळीत जाई. आमची कितीतरी मळी पाण्याने कापून गेलेली दिसे. मळीतला काठचा कंजाळ खूप खाली नदीच्या पाण्यातून डोके वर काढताना आढळे. डगरीवरून घसरून पाण्यात पडलेल्या मुलासारखा तो दिसे. दादा सांगत, "आपली मळी कमी होत चालली आहे. आपल्या बाजूच्या सगळ्याच मळ्या पाण्याच्या वेगाने कापत चालल्या आहेत." आणि समोर पलीकडच्या मळ्या वाढत चाललेल्या दिसत. असेच होत राहिले तर काय होईल अशी भीती मनात तरळे. दादा म्हणत, "मग एक दिवस आपल्याला मळींच उरणार नाही..."

घाटाच्या शेवटच्या तबकावरून पाणी खाली गेले की, पावसाच्या उरल्यासुरल्या दिवसांचा वास संपे. डगरीची पाणी उतरल्याची खूण खाली जाई. तबकावरून आणखी चार पायऱ्या पाणी खाली येई. आणि बारीकशी ओढही संपून पाणी शांत होई.

रात्रीच्या अंधारात दादांच्याबरोबर घाट उतरून मी खाली येई. बुरुजावर पाय सोडून बसे. गारसर वारा अंगावर येई. आमच्या समोरच्या पाण्यात चांदण्याचे नक्षीदार आभाळ उतरलेले असे. पाय टाकला की आभाळात पोचता येईल असे वाटे. तिथे पाणी नसेच. पाण्याचे आभाळ झालेले असे. आणि पलीकडच्या झाडीतली भुते आमच्या नदीचे पाणी रात्री पिऊन कशी टाकत नाहीत हे कोडे मला सुटे : त्यांना ते आभाळच वाटत असले पाहिजे...

पुस्तकाचे दिवस

झाडाच्या उघड्या अंगावर टपटप पोपटपाने फुटावीत तसे दादांच्या शब्दांनी वाटे. पण कधीकधी दादा काय वाट्टेल ते सांगत; नि त्या खोट्या न वाटणाऱ्या खोटेपणामुळे, परतीचा ऋतु आल्यावरती एक-एक पान गळायला लागावे, त्या वेळसारखे खरोखरी मला अगदी रडायला येई...

आमच्या जुन्या घराच्या स्वयंपाकघरातल्या, कावळ्यासारख्या नितळ, निळ्याकाळ्या रंगाच्या लाकडी कडीपाटावरून पाली इकडेतिकडे फिरत असत. तपकिरी-करड्या रंगातल्या. नक्षीदार शरिरांच्या. मी त्यांच्यावर खालून हात उगारी. नि दादा सांगत, पाली आपल्यावर रागावल्या की, नदीत राहायला जातात आणि त्यांच्या सुसरी होतात...

दादांचे कायतरीच होते. पण तेव्हापासून मी पालींचा नाद सोडून दिला होता. खरेच, यातली एखादी पाल आपल्यावर रागवून नदीत राहायला जायची. नि आतापर्यंत किती पालींना त्रास दिला ते मी आठवत बसे.

आमच्या कडीपाटावरल्या पाली मात्र मग फारच शेफारल्या होत्या. आपल्या वरती आलेल्या डोळ्यांनी त्या मजकडे टकटक पाहत. जिभा बाहेर काढत. दादांनी त्यांना दिलेले ते मोठेपण मला भयंकर छळत राही. मी एक-एक वेळ स्वयंपाकघरातून उठे नि अंजीकडे धूम ठोकत असे.

पालीपासून सुसरी होत असल्या तरी पाली कशा होत होत्या, हा प्रश्न होताच...

अंजीकडे गेले तरी पाली असत. पण ती त्यांना मुळीच भीत नसे. तिला सुसरींची दुसरीच माहिती होती. ती म्हणे, सुसरी पावसातून पडतात नि पावसाच्या पाण्यातून नदीत जातात. ते ऐकून कोसळणारा पाऊस माझ्या डोळ्यापुढे येई नि त्यातून उतरून एकीमागे एक कितीतरी लहानशा सुसरी नदीकडे मोठ्या होण्यासाठी निघाल्याचें चित्र मी पाही.

पण पाली नदीकडे जाताना मी पाहिल्या नव्हत्या नि पावसातून सुसरी पडताना अंजीनेही. पाण्याला जायच्या तयारीत असलेल्या मोकळ्या कळशीत कुठली पाल लपून सुसर व्हायला निघाली आहे का, ते आम्ही डोकावून पाहत असू. पाऊस यायच्या वेळी मातीइतक्या उत्सुकतेने भारून राहिलेले असू. पण कितीदा मोकळ्या कळश्या नदीला जाऊन आल्या— किती मोकळे पाऊस कोसळून गेले...

आईला कपाटातले दूध झाकले आहे की नाही ते वारंवार पाहायची सवय होती. खरे म्हणजे कपाट हेच एक मोठे झाकण असताना पुन्हा झाकण कशाला? पण पाल पडलेल्या पातेल्यातले दूध पिऊन मेलेल्या कुणाची तरी गोष्ट त्यावेळी आई सांगे. पाली भयंकरच असतात. तरी इतक्या मोठ्या झालेल्या पाली नदीत हिंडत होत्या. पाणी उष्टावत होत्या. तिथलेच आईदादांनी आणलेले पाणी आम्ही पीत होतो. मग ते नदीचे दूध विषारी कसे होत नव्हते?

आई कळशी घेऊन घाटावरून आली की, कधीतरी हळूसर आवाजात सुसर निघाल्याचे थोरल्या आईला सांगत असे. तिच्या चेहऱ्यावर एक लहानशी भीतीची सावली आलेली असे. नि तिचा अंधुक स्पर्श तिच्या

हळू सांगण्यालाही होई. इतक्या सुसरी असलेल्या नदीच्या गावी पहिल्यांदा आल्यावर आई किती घाबरली होती ते थोरली आई सांगे. पण नदी तर शेजारणीसारखी होती. समोर दारात बसले की, वडाचे तांबडे आवार डोळ्यात भरे. दगडी कट्टा, खाली मोठा पिंपळ नि त्या खाली पिंपळ-पानांच्या महिरपीतून थोड्या खोलात, नदीच्या पलटत्या छटांचा मोठा शांत पट्टा सरकताना दिसे.

सुसर निघाल्याचे आईचे हळू सांगणेही दादांना नेमके ऐकू येई. नि ते भीती वाढणारे काही आणखी बोलत.

"सुसर निघाली आहे" हा गावातला नुसत्या आवाजाने डोळ्यांपुढे येणाऱ्या दृश्याचा एक ठराविक प्रकार होता. समोर पाहिले की सुसर निघाल्याचे लगेच कळे. कितीतरी जणे घाटावर, डगरीवर गोळा झालेली असत. नि आश्चर्य, कुतूहल मिसळलेली ती लाट सगळ्यांच्या तोंडावरून उमटत, हेलावत जाई. सगळ्यांचे डोळे सुसरीकडे लागलेले असत. ती न दिसलेल्या कुणालातरी कुणीतरी बोटाने दाखवत असे.

सुसर निघाल्याची हवेतली कंपने उत्कंठा वाढवीत. दादांच्याबरोबर सुसर पाहायला मी कितीदातरी गेलो असेन. खरे म्हणजे, इतक्या वेळा दादांच्या बरोबर जाऊन 'सुसर' काय आहे हे मी पाहिलेच नव्हते. नदीच्या मध्याच्या पलीकडे कुठेतरी, तपकिरी रंगाची बाकदार लांब रेषा पुढे सरताना, मध्येच बुडून पुन्हा पुढे निघताना दिसे. त्या रेषेलाच लोक सुसर म्हणत. ही एवढीशी असलेली रेषा कुत्र्यांना, माणसांना, हत्तीलाही कशी ओढू शकते ते मला कळत नसे. दादांना कितीतरी वेळा "सुसर कुठे आहे?" म्हणून मी विचारी. दादा अनेकदा दूर बोटाने दाखवत तरीही मला ती दिसत नसे. हवेत बांधलेला राजवाडा न दिसणाऱ्या माणसाप्रमाणे सुसरही न दिसणारी माणसे पापी असली पाहिजेत असे मला वाटे. मी ती दडपून दिसली म्हणे. पण तेवढ्याने माझी सुटका होत नसे. दादा लगेच "कुठे आहे दाखव बघू" म्हणून सांगत नी मला घाम सुटे. कुठल्यातरी, पाण्यात आलेल्या सुसरीच्या रंगाच्या कंजाळाच्या

फांदीकडे मी बोट दाखवी. तसल्या, कितीतरी ठिकाणी पाण्यात आलेल्या फांद्यांकडे दादा बोटे दाखवत. ती तिथे एक सुसर आहे, ती दुसरी, असे सांगत नि हसायला लागत. मग दादा इथपर्यंत जात की, आपल्या नदीत सुसरीच नाही आहेत, लोक खुळे आहेत, पाण्यात आलेल्या त्या कंजाळांच्या फांद्यांना ते सुसरी म्हणत असतात, असे सांगत. ते सुसरीचे इतके महत्त्वाचे प्रकरण निकालात काढत. आणि गावातले सगळे लोक खुळे असल्याच्या दादांच्या त्या बोलण्याने, डोहावरती झुकलेल्या सगळ्या कंजाळझाडांची पाने गळायला लागलीत असे मला वाटे.

सुसरीचे रूप कसे असेल हे, मनांत पाल खूप मोठी करून मी डोळ्यांपुढे आणलेले होते. पण तिची छद्मी दृष्टी, करकरीत दाढा, चुंबळ—एवढा तिच्या शरिराचा पुढचाच पाण्यातून वरती आलेला भाग मी चित्रशाळेच्या सचित्र इसापनीतीत पहिल्यांदा पाहिला. इसापनीतीतल्या त्या पहिल्याच गोष्टीत कुठल्या एका ईजिप्त देशातून नाईल नावाची नदी वाहत होती. तीत खूप सुसरी होत्या. तिच्या काठावरली कुत्री फार शहाणी होती. तहानलेली दोन कुत्री नदीवर येत. एक काठावर भुंकत राही. त्याच्या आवाजावर सुसर तिकडे सरे. तोवर दुसरे, पाणी पिऊन मोकळे होई. त्याच्यावर टपलेल्या नदीतल्या एका सुसरीला या गोष्टीचा राग आलेला होता. पण त्यांना ती साळसूदपणे तसे भ्यायचे कारण नाही म्हणून सांगत होती. सुसरीच्या त्या गोष्टीमुळे, त्या साऱ्याच गोष्टी सुसरींच्यावर असत्या तर किती बरे झाले असते असे वाटले होते. इसापनीतीत आणखी एका गोष्टीवर येऊन मी थांबलो होतो. त्या गोष्टीत सुसरीचा पाण्यात वरून दिसणारा भाग दिसत होता. कुठल्यातरी, जिकडेतिकडे पसरून राहिलेल्या पाण्यात एक तारू मध्येच फुटलेले होते नि त्यातल्या एका वुडणाऱ्या माकडाला आपल्या पाठीवर घेऊन ती सुसर किनाऱ्याकडे निघाली होती. त्या चित्रातल्या सुसरीचे काटेरी, तरवारीच्या पात्यासारखे लवचीक शेपूट हालताना मी पाहिले होते. ते चित्रात पाहिलेले सुसरीचे शरीर जसे काही खरोखरी पाहिल्यासारखे मनात भरून राहिले होते.

ती सुसरीची गोष्ट वाचताना थोरल्या आईला पूर्वी कुठेतरी दूरदेशी नदीवर स्नानाला गेल्याचे आठवले होते. त्या नदीत इतक्या सुसरी होत्या की तेथे ठराविक ठिकाणीच आंघोळीला उतरावे लागे. चारी बाजूंनी तिथे पाण्यात जाळ्या लावलेल्या होत्या—त्या जागेशिवाय इतर ठिकाणी नदीत सोडलेला पाय पुन्हा वरती काढता येईलच असे सांगता येत नसे. लंकेच्या समुद्रावरून उड्डून जात असताना सांडलेला मारुतीचा घाम एका खालच्या मगरीने गिळला होता नि त्यापासून झालेला मकरध्वजही तेव्हाच माझ्या डोळ्यापुढे आला होता.

सुसरीतला नि मगरीतला सूक्ष्मसा फरक दादांनी त्यावेळी मला सांगितला होता. मगर सुसरीहून मोठी क्रूर. अधिक खोल पाण्यात राहणारी. मगरीच्या डोक्याचा भाग—चुंबळ—सुसरीच्या डोक्याहून खूप वाटोळी आणि जबडा-नाक या भागाचा सुळका त्यातून पुढे आलेला.

आमचे गाव मध्ये वर्तुळाकार घरांचे होते. त्यातून उत्तरेकडे व दक्षिणेकडे जाणाऱ्या सरळ मळीरस्त्याच्या दोन्ही बाजूंना घरे वसलेली होती. म्हणजे, आमचे घर होते तिथला गावाचा वर्तुळाकार भाग नि त्यातून जाणारा कुणीकडलाही एक रस्ता हे मिळून जसे एक मगरीचे तोंड होत होते.

दादा कितीतरी लवकर उठत असत. एकदा झुंजुमुंजू झाल्यावेळी दादांनी मला मठाच्या पाणवठ्याकडे नेले होते. समोर पापणी उघडू लागलेल्या झावळ्या डोहाचा प्रवाह पसरला होता. वरच्या बाजूने येणाऱ्या अफाट पाण्याच्या वळणावर तावदरवाडीची गोजिरवाणी घरे डोहात उलटी होऊन डोळे चोळीत होती. दोन्हीकडेच्या तांबड्या मळ्यातल्या शेवऱ्या नि वरण्याचे वेल ताजेपणाने तरतरत होते.

मठाच्या पाणवठ्याला अगदी अरुंद पण कितीतरी खड्या पायऱ्यांचा घाट होता. आमच्या समोरच्या घाटाहून तो गरीब वाटे. आमचा घाट काळाभोर, कातीव तबका-पायऱ्यांचा होता. कुठल्यातरी दुसऱ्याच जन्मात उतरून यावे तसे, तो मठाचा घाट उतरून खाली असलेल्या उंबराच्या झाडापाशी आम्ही आलो. सगळीकडे शांत होते. एखादा मासा म्हशीच्या

कानासारख्या कड्याच्या टोकाने पाण्याचे पान मधूनच चिरी तेवढेच.

मागे वळून बघताना तो उभा घाट म्हणजे हिरवेपणात उतरून आलेले खोदकाम वाटत होते. आमच्यासमोर दहाएक हातांपुढे डोहाखाली असलेले एक देऊळ होते. त्यावर उन्हाळ्यातही नेहमी गुडघ्याएवढे पाणी राही. देवळाचा विस्तार डोहात बराच मोठा होता. शेवट पलीकडेपर्यंत गेलेला. पलीकडच्याही काठाच्या दहाएक हात अलीकडे ते पाण्यातच संपे. पलीकडल्या बाजूला पाण्यातून हातभर वरती आलेला एक दगडी गरूड उभा असे. एवढीच ती देऊळ असल्याची वरून दिसणारी खूण. देवळाचा भाग संपला की, डोह पुन्हा खोल होई.

दादांनी देवळाच्या थोड्या अलीकडे मला पाहायला सांगितले होते. तिथे पाण्याच्या खोलातून वरती यावी तशी एक उसळती थरथर ऐकू येत होती. सुसर पाण्याच्या तळात असायची ती एक कधीतरीची खूण होती. थोड्या वेळाने ती थांबली. नि पाण्याच्या रूपावर एक सूक्ष्मपणे दिसणारा भुरकट रंगाचा तुकडा वरती आला. ते सुसरीचे नाक होते. दबा धरून यावे तशी ती सावधपणे वरती येत होती. नाक, कपाळ, तोंडाची चीर, चुंबळ. ते तिचे दर्शन हलवून टाकणारे होते. मी पाहिलेली ती पहिली खरी सुसर. थोड्या वेळाने तिने पाठीचा भाग वर काढला. मग धारदार शेपूट. एखाद्या आग्यामोहोळाचा पापुद्रा काढून घालावा तशा रंगाचे तिचे अंग होते. दादा पाण्यात पालथे तरंगत राहिले असते नि त्यांचा पाय धरून मीही तरंगत राहिलो असतो तितकी तिची नाकापासून शेपटापर्यंत लांबी होती. तिचा आडवा ऐवज म्हशीएवढा होता. ते धूड बघून मी हबकलो होतो. आणि दादा पोहायला गेल्यावर आईचा जीव इतका का खालवर होतो ते मला कळले होते.

तिथे कुठेतरी आपले खाणे तिने कुजत ठेवले असावे म्हणून ती त्या निर्जन वेळी आली असावी. थोड्या वेळाने तिने आमच्या उलट दिशेला तोंड वळवले. काही अंतरावर जाऊन, वर आल्याइतक्यातच धिमेपणाने पुन्हा ती पलीकडच्या बाजूला पाण्यातल्या दगडी गरुडावर लागली.

आपल्या नदीत सुसरीच नाहीत म्हणून सांगणाऱ्या दादांनी मला खरो-खरीच सुसर दाखवली होती.

दादा नि मी मळीकाठाने तिथून परतत होतो. आपण जसे सुसरीला भितो तशी सुसरही आपल्याला भीत असल्याचे ते सांगत होते. म्हणून तर घाटावर इतकी माणसे आंघोळ करत होती, पलीकडे पोहतःजात होती आणि गुरांच्या डगरीसमोर डोहाच्या मध्याच्या अलीकडून निघालेली सुसर घाटासमोर येताना दिशा वळवून मध्यापलीकडून जात होती.

दादा नदीला आंघोळीला जात. माझी आंघोळ थोरल्या आईबरोबर ऊन पाण्याने घरीच झालेली असे. थोरली आई दादांना सांगे, "तुझं तू आंघोळीचं बघ. त्या पोराला नदीवर नेऊ नको." पण कधीकधी दादांच्या-बरोबर मी घाटावर जाई. माझ्या लहानशा पायांना तो घाट उतरायचा, चढायचा म्हणजे काहीतरी मोठ्ठे केल्यासारखे वाटे.

उन्हाळ्यात घाटाचा शेवटचा बुरूज पाण्यातच राहिलेला असे. पाणी कितीही कमी झाले तरी बुरुजाच्या दुसऱ्या कंगोऱ्याबरोबर राही. उतरल्या-बरोबर समोरचा लांबलचक घाट सर्वांसाठी होता. त्याच्याही दोन पायऱ्या नेहमी पाण्यातच असत नि पुढे एकदम खोल पाणी लागे. तावदरवाडीकडे तोंड करणाऱ्या घाटाच्या लहानशा भागास देवघाट म्हणत—देवाच्या सोवळ्यासाठी तिथे उतरत—तिथले पाणी थोडेथोडे खोल होत पुढे गेले होते.

देवघाटाच्या पायरीवर एकदा उतरल्यावर माझ्या पायांना भयंकर काही गुदगुल्या करणारे लागले होते. मी घाबरून तबकावरती आलो होतो. जसे काही सुसरीने येऊन मला तोंड लावले होते. अंजीने त्या वेळी मला वेडावले होते. पाण्यातले मासे माणसाच्या पायांचा मळ खायला येत. अंजी किती तरी वेळ पाण्यात पायरीखाली पाय बुडवून उभी राहत असे. माशांना मळ खाऊ देत असे. त्यामुळे तिचे पाय गोरे झालेले होते.

आमच्या इथले मासे माजल्यासारखे होते. एकएक मासा माणसा-एवढा. वरून काळसरनिळसर नि खालून तांबूसपांढऱ्या अंगाचा. देवाला

येणारे लोक घाटावर मासे पाहायला येत. बुरुजावरून खायला शेंगदाणे टाकत. नि त्यांची डोहात इतकी झुंबड उडे की, तेवढ्या भागात सगळीकडे मासेच आणि कुठेतरी त्यांच्या फटीतून पाणी दिसे. त्या देवाच्या माशांचे, डोहात वर तावदरवाडीपर्यंत मैलभर नि खाली सटवाईच्या डोहापर्यंत मैलभर राज्य होते. तेवढ्या डोहात दोन्ही बाजूंना मासे मारायचे नव्हते. पण ते माणसाएवढाले मासे मी आमच्या घाटासमोरच्या तेवढ्याच भागात पाहिले. इतरत्र होते, पण एवढे मोठे नव्हते.

अंजी म्हणे, आपल्या घाटाजवळ सुसर येत नाही म्हणून तिथे एवढे मोठे मासे एकत्र आले आहेत. पण सुसर माणसांच्या वर्दळीमुळे तिथे दिवसा नाही आली तरी रात्री तिथले पाण्यातले रान तिला मोकळेच होते की. आणि मासे सुसरीला कसे सापडत असतील ? मासे भारी चपळ नि त्यांचे अंग किती सळसळीत पाऱ्यासारखे.

अंजी आणखी एक सांगे, त्या माशांची चव चांगली असते म्हणून. ते ऐकून मला कसेसेच होई नि अंजीबद्दल आपल्याला जे वाटते ते वाटू देऊ नये काय, असा विचार मनात येई. मी चेहरा कसासा केला की, ती आणखीनच चेकाळे. माशांच्या आठवणीने तोंडात ओंजळ-ओंजळ पाणी आणी. आणि माझे खांदे गदगद हालवत मोठ्यांदा हसे. अंजीचा नाना रात्री अंधारातच त्याच्या घराखालच्या लक्षुमबाईच्या मळीत येऊन चोरून जाळे टाकून बसत असे नि एखादा मासा सापडला तरी त्याची चांगली चंगळ होत असे. मोठा मासा लागला असावा आणि आवरेना म्हणून तो जाळे ओढत पाण्यात शिरला होता. त्या रात्रीपासून नाना कुठे दिसलाच नाही. अंजी कितीतरी दिवस नानाच्या आठवणीने रडत असे. त्याला सुसरीने नेले म्हणून सांगत असे. त्यामुळे मला फार वाईट वाटे. अंजीच्या तोंडातली माशाची चव तेव्हापासून गेली होती. अंजीच्या आईचे काय बिघडत नव्हते. तिचे नि नानाचे सारखे भांडणच उभे राहत असे. तिने दुसरा 'भाड्या' पाहिला असता, असे थोरली आईसुद्धा म्हणे...

दादा बुरुजावरून पाण्यात उड्या मारत. बुरुजावरून पाण्यावरल्या हवेतच दोन कोलांट्या घेऊन पाण्यात पडत. कधी अंगाचा मुटकुळा करून स्वतःला फेकत नि सूरही मारत.

सूर मारत नि पाण्याखाली जाऊन कितीतरी वेळ वरती येत नसत. मला भीती वाटे. दादांना सुसरीने खालतीच धरले की काय असे मनात येई. त्यापेक्षा आईला तिच्याजवळ असलेल्या, पण कधीच उपयोग करत नसलेल्या शक्तीने, दादांना नदीला आंघोळीला जाऊ देऊ नको, असे सांगावेसे वाटे.

दादा पाण्यात बुड्डून जवळजवळ मध्यात डोके वरती काढत. तिथून घाटाच्या तबकावर उभ्या असलेल्या मला हाका मारत. मला थोडा धीर येई. तोवर ते आकाशाकडे तोंड करून मध्यावरती तरंगत राहत. त्यांनी पाण्यातच मांडी घातलेली दिसे. आणि दोन हात सरळ आडवे पसरलेले असत. काही हालचाल न करता ते तसे पाण्यावर कितीतरी वेळ तरंगत राहत. त्याचा मला फार त्रास होई. मध्यापासून पाण्यातल्या देवळाचा गरूड अगदी जवळ होता. तिथे कुठे सुसर आहे का, मी पाही. खालून पलीकडल्या भुवनेश्वरीच्या पाणवठ्याकडून सुसर निघाली आहे का, बघे.

कधीकधी दादा ते तरंगणे थांबवून पुढे होत. पलीकडे, घाटाच्या अगदी समोर असलेल्या हिरव्याकंच कंजाळझाडांच्या कमानीखालच्या मातीत जाऊन लागत. त्या कंजाळदाटव्यात एखादी सुसर येऊन पडल्याची शक्यता असे.

दादांचा हा प्रकार कितीतरी वेळ चाले. तिथून परतताना ते आडव्या हाताऐवजी उभे हात मारत. दोन औलांऐवजी चार औलांवर आलेल्या नावेसारखे वेगाने येत. घाटाला लागेपर्यंत माझ्या जिवात जीव नसे नि आम्ही घरी जाईतो आईच्या.

दादांना पोहायला येत होते ही आईच्या मते काही चांगली गोष्ट नव्हती. पोहायला येते म्हणून ते फार वेळ पाण्यात राहत. नदीत सुसरी फिरत असताना पलीकडे पोहत जात. मळीला वैरण आणायला पलीकडे गेले नि नाव अलीकडे असली तरी त्यांचे नडत नसे. गवताचा भारा ते पाण्यात टाकत नि पोहत दोरीने अलीकडे ओढून आणत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ..... दिः .....
क्रमांक ..... नोंद दिः .....

दादा कधीकधी मला पलीकडे नेत. मळीतून येऊन आम्ही चिंगू-आजीच्या छपरात बसलो होतो. आजी गोष्टीवेल्हाळ आणि दादांचे बोलणे संपता न संपणारे. अंधार भरत चालला होता. लवकर जायला हवे होते. पण मधे बोलायची सोय नव्हती. दादा तिथून उठले तेव्हा मिट्ट अंधार पडला होता. आजीच्या घरी त्या दिवशी पोचवायला यायला कुणी नव्हते. दादांच्या बोटाला धरून मी चालत होतो. वाडीच्या दगडी शिवेतून बाहेर पडत होतो. भुवनेश्वरीच्या आवारातून खाली उतरण उतरत होतो. काहीच दिसत नव्हते.

उतरणीखालच्या चिंचेच्या तळून नदीकडे वाट पळे. दोन्ही बाजूंच्या उंच, शेलाट्या बाभळींमधून ती जात होती. दादांच्याबरोबर त्या वाटेने मी किती वेळा तरी आलो असेन. चांदण्या रात्री त्या ऐसपैस चिंचेची खूप मोठी, फतकल घातल्यासारखी सावली पडे नि तिच्याखाली हारीने उभ्या असलेल्या बाभळींच्या बसलेल्या सावल्या. चिंचेची सावली एका मोठ्या सुसरीची सावली होती नि बाभळींच्या सावल्या बसायला आलेल्या लहानलहान सुसरींच्या होत्या. जशी ती त्यांना कुठल्या कथा सांगत होती. डोहात कसे वागायचे ते शिकवत होती.

चिंचेखाली आम्ही आलो तेव्हा चांदण्यात पडणाऱ्या झाडांच्या सावल्या काळोखातही पडल्याचे वाटत होते.. त्यातली कुठलीही सावली धरायला आली असती. आम्ही डगरीशी आलो त्यावेळी नाव पलीकडे होती. पलीकडल्या उंबरांच्या झाडीतल्या खोलातून डोळे किलकिले करून डोहावर उतरणारा देवाच्या आवारातला प्रकाश विझून गेला होता. झाडीमागल्या घरातल्या दिव्यांचाही ! दादांनी पलीकडे कुणालाही हाक दिली नाही. त्यांना ते आवडत नसे. त्यांनी अंगातले कपडे उतरले. माझ्याकडे दिले. नि माझे न ऐकता त्या न दिसणाऱ्या पण कळणाऱ्या काळोखाच्या पाण्यात ते उतरले. कुठे काहीसुद्धा दिसत नव्हते. कसल्या तरी धुरकटाने वरले टपोर तारेही खालती पाण्यात उतरत नव्हते. दादांना कळायला कधी लागायचे होते कुणास ठाऊक. असल्या काळोखपाण्यात उतरू नये हे

मलासुद्धा कळत होते. मी भयंकर भीतीने गोठून गेलो होतो. काठावर एकटा उभा होतो. नि दादा पोहता पोहता सोबतीचा दुवा म्हणून मला थोड्या-थोड्या वेळाने एक-एक हलकी हाक देत होते. तेवढ्यावरूनच ते किती पुढे गेले ते ओळखायचे.

काळोखलाटांची चळत सरकणारा आवाज थांबला तेव्हा पुन्हा एकदा जीव खालवर झाला. दादा नावेत चढत होते. नावेची साखळी सोडल्याचा खळखळाट झाला. नि तिथून येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्या सुसरीच्या राज्यातून ते सुखरूप पलीकडे गेले होते. त्यांनी मला नावेतून परत नेले. दादांचे ओले अंग बघून, आधीच रागावलेल्या थोरली आई नि आई आमच्याशी बोलायलाही तयार नव्हत्या.

...अंजी माझ्या कितीतरी आधी पोहायला शिकलेली. ती देवघाटाकडे कुणाचे न ऐकता येई. सोवळ्यातल्या माणसांवरती तिचे पाणी उडे. पण तिला कुणी बोलले तर ती त्याला तत्परतेने शिव्या देई. "ए भटा, प्वाट फोडीन!" म्हणून कुणाही मोठ्या माणसाला सुनावी. मला आश्चर्य वाटे नि गंमतही. ती एवढ्या कुणालाही कशा शिव्या देऊ शकत होती, कुणास ठाऊक. याबाबत तिने अगदी तिच्या आईच्या हातावर हात मारला आहे, असे थोरली आई म्हणे.

अंजी हळूहळू परकर वर करत गुडघाभर पाण्यात शिरे. परकराची दोन घोट्यापासची टोके चिमटीत घेऊन परकर पाण्यावर आपटे. परकरात हवा घोट्यापासची टोके चिमटीत घेऊन परकर पाण्यावर आपटे. परकरात हवा भरे. शीड फुगावे तसा तो तिचा परकर अपरंपार फुगे. मग ती परकराचे मागले टोक पुढे घेऊन बेंबीखाली खोची. तिच्या पाठीमागल्या मांड्यांच्या वरल्या भागावर हवेचे दोन भोपळे बांधल्यासारखे वाटे. तेवढ्यावरती तरंगत तिचे जहाज पुढे जायला लागे. ती एकटी दोन पाय पाठीमागे आपटत, सगळ्यांच्या अंगावर पाणी उडवत दूरवर जाई. सुसरीला 'रांड' म्हणे. नि तिला पाण्यातून 'वड्डून' मारण्याची भाषा बोले.

मी नदीत उतरण्यासाठी कपडे उतरी नि पुन्हा पाण्याच्या, सुसरीच्या भीतीने तो बेत रहीत करी. दादांनी मात्र एकदा मला सरळ उचलले होते

नि मोठ्या घाटाकडे बुरुजावरून फेकून दिले होते. मी नाकातोंडात पाणी जाऊन अगदी तळाशी टेकून वरती आलो. दादांनी पाठोपाठ उडी टाकून मला धरून काठावर आणले होते. ते मला बुड्ड्र कसे देतील? पण तेव्हा देवघाटावर असलेल्या आईला हे मुळींच आवडलेले नव्हते. दिवसभर त्या प्रकाराने ती अगदी अबोल झाली होती. आणि दादा घरात नसताना मला बोलावून तिने "त्यांच्याबरोबर आंघोळीला जात जाऊ नको" म्हणून सांगितले होते.

पण दादांना त्याचे कायच नव्हते. कधीकधी एका खांद्यावर मी, दुसऱ्या खांद्यावर माठ घेऊन दादा नदीला येत. मला ते पाण्यातही पाठकुळीला घेत. त्यांच्या गळ्यात मी माझे हात घाली. ते सोडायचे नाहीत म्हणून दादा सांगत नि हळू वर्तुळाकार हात फिरवीत मला मध्यापर्यंत पाण्यातून पोहत फिरवून आणीत.

मध्यावर गेल्यावर मी सटवाईच्या डोहाकडे पाही. कितीतरी दूर. तिथून सुसर वरती येत असल्याचे वाटे. मी दादांना सांगे नि ते म्हणत, ती इथवर येईपर्यंत आपण घरीसुद्धा जाऊ. दादांचे पाण्यातले, पाण्यातल्या सुसरींविषयीचे ते ताळे अगदी अचूक असत. त्यांच्या त्या सामर्थ्याने सुसर दादांना काहीच करू शकणार नाही हे पटे. दादांचा नेहमी जाणवणारा मोठेपणा पाण्यात असताना अधिकच मोठा होई. त्यांचे नांव घेतल्यावर सुसर पळून जाईल असा माझा विश्वास होता. पाण्यातल्या भीतीच्या वेळी मी त्यांचे नाव घेत असे.

दादांनी मला पहिल्यांदा पाठीला भोपळा बांधून, मग कमरेला धोतर बांधून नि हळूहळू तसेच सोडून पोहायला शिकविले. ते म्हणत, सुसर जशी सहज पाण्यात तरते तसे पोहावे. आपण पोहतो आहोत असे पाण्यात आपणास वाटू नये.

बुड्डून कितीही खालती खोल गेले तरी पहिल्यांदा तळाला पायच लागत नसत. नि खाली जाऊन वर यायला श्वास पुरेपर्यंत, किती खोल जायचे ते

ठरवावे लागे. बुडायचे धडे मला आवू देई. तो बुडणार दांडगा होता. त्याच्याबरोबर पाण्यात त्याचे हात धरून मी पहिल्यांदा बुडत असे. खाली जात असताना, शब्दातून मन सरकावे तसे, कितीतरी मोठ्या माशांच्या बुळबुळीत अंगांमधून अंग सरके. नि पुन्हा ती सुसरीची भीती पाण्यातल्या मनातही घर करायला येई.

तळाला जायला यायला लागल्यावर मी खालून मुठी भरून चमकदार काळसर रेती घेऊन वरती येत असे. पण बुडण्याचे सुख होते ते नदीच्या खोल तलम तळाशी जाऊन तिच्या मऊ, लोण्यासारख्या गार भागावरून हात फिरवण्याचे. आमची नदी खरोखरी इतकी रसरशीत होती की, तिच्या अंगाचे अंजीच्या आईच्या अंगाशी मला साम्य भासे. नि अंजीच्या आईच्या पदराखालच्या अंधारातल्या पोटावरून हात फिरवावा तसा तो नदीच्या तळावरून फिरवलेल्या हाताचा स्पर्श वाटे. नदीच्या तळाला जाऊन मी डोळे उघडी. पहिल्यांदा सगळा अंधारच दिसे. मग डोळे मिटल्यावरही मंद दिवसाकडे वघत असताना एक पिवळसर पांढरा प्रकाश पसरल्यासारखा भासतो तसा प्रसन्न प्रकाश तिथे पसरल्याचे सुख डोळ्यांस स्पर्श करी. त्या तरत्या प्रकाशसुखात काहीतरी अंधुक सावल्यांचे ठिपके आल्यासारखे वाटे नि सुसरीची आठवण येई. पण त्या प्रकाशाच्या गूढ तळात असणाऱ्या सुसरी तिथून दिसाव्यात असे मात्र वाटे.

सुसरी कितीही वेळ तळाशी कशा राहू शकत होत्या ? तिथे तळात ऐकू येण्यासारखी त्यांच्या कानात कसली यंत्रे होती ? आणि त्यांच्या डोळ्यांच्या भिंगांची बनावट कशाची होती ?...

...नदीच्या त्या गूढ पाताळातल्या तळात वावरताना मनात येई की, हाताचे तळवे फिरवताना इथेही माती लागते आहे. या तळाच्या माती-खालीही पुन्हा आणखी पाणी आहे. आणि त्याही पाण्यात सुसरी आहेत. पाण्याखाली पुन्हा पाणी आणि सुसरी खालती सुसरी.

पाणी पहिल्यापासूनचे. वर आकाशगंगेचे न सांडणारे उलटे पाणी नि खालीही पाणी. देवाच्या बागेतल्या विहिरीतले पाणी पाहिल्यावर हा माझा

समज घट्ट झाला होता. कुठल्यातरी मोठ्या शक्तीने पाण्यावर टाकलेल्या मातीवर आपले गाव वसलेले आहे, ही माझी कल्पना दादांना मी बोलून दाखविली तेव्हा त्यांनी मला सांगितले होते की, आपले हे घरसुद्धा त्या पाण्यावरल्या मातीवर वसलेले आहे. ते पाणी हलत नाही म्हणून बरे. पण त्या पाण्यात मोठ्या सुसरी आहेत नि त्यातली एखादी सुसर खवळली तर माती फोडून इथेसुद्धा येईल.

थोरल्या आईने दादांना "असले काही पोराला सांगत जाऊ नकोस" असे सांगितले होते. पण बरेच दिवस वडाखालून जाताना आपण मातीखालच्या पाण्यातल्या सुसरीवरून तरी जात नाही आहोत ना, असे मला वाटे.

मागे कधीतरी आमच्या गावात संध्याकाळच्या सुमारास क्षणभर सगळी जमीन कापली होती आणि फळ्यांवरली भांडी खाली पडली होती असे थोरली आई सांगे...ते ऐकून, आमच्या डोहाच्या तळालाही त्या भूकंपाने तडे गेले असले पाहिजेत आणि डोहतळाच्या खालच्या पाण्यातली एखादी सुसर त्या तड्यातून डोहात राहायला आली असेल, असे मला वाटत असे. पण ती शंका दादांना विचारायचे धाडस मला होत नसे...

लहानपणी मी जी जीव व्यापून टाकणारी स्वप्ने पाहिली त्यात आमच्या नदीचा ऐलपैल पसरलेला अफाट डोह थोड्या वेळापुरता उजाड झाल्याचे एक होते. नदीचा गूढ काळा तळ मला पाहायचा होता. भुवनेश्वरीच्या देवळाच्या पायथ्यापासून वाहता वाहता अलीकडे सरकल्याने प्रवाहाखाली गेलेले ते मोठे देऊळ बघायचे होते. पाणी संपल्यामुळे उघड्या पडलेल्या साऱ्या सुसरींना मी एकदम पाहणार होतो. त्यांची घरेही मला दिसणार होती. आणि खरोखरी त्या किती आहेत ते मला कळणार होते...

उजाड झालेल्या डोहाखालची सुसरींची घरे पाहायला मिळाली नाहीत तरी सुसरी कशा, कुठे राहत असतील याचा शोध घेत आम्ही फिरत

असू. त्यावेळी दिसणाऱ्या ठळक सुसरींच्या वस्त्यांची आबूला चांगली माहिती होती.

दिसणाऱ्या सुसरीत भुरी सुसर सर्वात जुनी नि फार मोठी होती. मोठ्या झाडाचा ओंडका पडल्यासारखी ती पाण्यात वाटे. चंद्राला पडलेल्या खळ्यासारखे तिच्या आसपासच्या पाण्याला खळे पडे. ती पाण्यात सरकत असताना तिच्या अंगरेघांकडे पाणी खोलसे ओढ घेई.

भुरी कड्याकडच्या डोहात राही आणि पाणी पात्रात असलेल्या दिवसात एखाद्या आगगाडीसारखी ठरलेल्या वेळी निघत असे. उजाडताना ती वरून कड्याकडल्या डोहातून निघे. घाटावरून बघताना पलीकडे नदीच्या वळणावर तावदरवाडी दिसे. आणि तिथून नदीच्या दोन्ही बाजूंनी असलेली गोल कंजाळझाडांची डोकावणारी गडद दाटी, त्या भुऱ्या सुसरीच्या यायच्या गतीने भारावल्यामुळे की काय, आधीच पुढे धावून आल्यासारखी वाटे. भुरी सुसर तावदरवाडीच्या वळणावर दिसायला लागे नि आबू मला बोलवायला येई. आम्ही घाटाच्या वर मठाच्या मळीपर्यंत जात असू. तिची नेहमीची जायची यायची वाट पलीकडून होती. तावदराची मळी ओलांडून ती मठासमोरच्या पाण्यातल्या देवळापाशी येई. अगदी थोडी, दगडी गरुडाशी थांवे. तिथून धिमेपणाने पुढे होई. मी नि आबू पोटमळ्यातून, मक्याणामधून वाट काढत भुरीला समांतर खालती खालती सरकत असू. भुवनेश्वरीच्या पाणवठ्याच्या थोड्या अलीकडे ती बुडी घेई. पलीकडल्या एवढ्या लांबच लांब काठावर तिथेच काय ती अधिक माणसांची वर्दळ असे. तिथून बुडून ती आमच्या मळीखाली पाण्यावर अंग काढी. तिच्या मधल्या, न दिसणाऱ्या प्रवासाच्या अंतराचा ताळा आम्हाला इतका नेमका ठाऊक झाला होता की, तिच्यात नि आमच्यात अंतर पडलेले नसे.

रंगा पाटलाच्या मळीसमोर पलीकडे, नुसत्या चिंचांच्या दाट बनात सटवाईचे पडके देऊळ होते. देवळाखालची मळी संपली की लगेच सटवाईचा काळा खोल डोह. त्या डोहात शिरायच्या आधी भुरी डोळे मिटल्यासारखे आपले अंग पाण्यात मिटवून घ्यायला लागे नि त्या खोल

डोहात नाहीशी होऊन जाई...तिथल्या डोहातल्या आसरांना दर वर्षी चिंगूआजी परडी सोडत असे...त्या आसरांच्याकडे भुरी वसायला जाई की काय कुणास ठाऊक. तिच्याबरोबर इतके चालत येऊन आम्ही मात्र काठावर उरलेले असू. ती पुन्हा कुठल्या कडेला लागते का, पाहत असू. ती पुढे कुठे जाईल? काय करील? आम्हाला काही कळेनासे होई. आम्ही सुने सुने होऊन तिथे उभे राहून परतत असू.

कड्यापासूनचा जवळजवळ दोन मैलांचा पाण्यातला प्रवास भुरी तन्वेतीत करत असे. मळ्यांच्या डगरीवरून येणारे सकाळचे कोवळे सूर्यकिरण अंगावर घेत ती कितीतरी वेळ खालती सरके, आणि दुपारची उन्हे उतरताना सटवाईच्या डोहातून पुन्हा कड्याकडे परत फिरे. संध्याकाळी वाडीकडल्या घरांकडे परतणाऱ्या पाखरांच्या डोहावरल्या धावत्या सावल्यासारखी ती परतताना घाईत असे. तिन्हीसांजेला ती कड्याकडे पोचे.

ज्यांची भीती वाटे असे तीन डोह आमच्या नदीत होते. सटवाईचा, आमच्या घाटाजवळचा नि कड्याकडचा.

गावच्या दक्षिणेला आपआपल्या रानातून वांधलेली घरे होती. त्या वस्तीला 'डाग' म्हणत. मठाच्या मळीवाटेने तिकडे गेले की जिथे ती घरे संपत त्याच्याखाली कड्याचा डोह सुरू होई. डागेची शेवटली-शेवटली घरे विरळ-विरळ होत गेली होती. त्या घरांना जाणारा रस्ता खालवर होत, खळग्याचढातून जात होता. तांबूस नि काळ्या मातीच्या रंगमिश्रणांचा. तांबडगोंडाच्या रानात गावाच्या वस्तीचे शेवटले, एकुलते एक गायकवाडांचे घर नदीकडे वघत उभे होते. गायकवाडाच्या करड्या-भुरक्या घराच्या भवती सगळे मोकळे होते. दुसऱ्या कुठल्याच घराची सलगी त्याने केलेली नव्हती. तिथले रान थोडे दडु झाले होते. थोड्या पुढे तो रानमातीचा दडु तुकडा एकदम तुटलेला होता. मुरुमाड मातीच्या थरांवरल्या थरांचा एखाद्या प्रचंड पात्याने काप काढावा तसा तो तुटलेला कडा होता. पावसाळ्यात येणाऱ्या पाण्याच्या अफाट वेगाने तो दरवर्षी तुटत होता. त्या भीती वाटणाऱ्या खोलीखाली पुन्हा पसरलेले सपाट हिरवेगार रान होते.

खाली उतरल्यावर, वर बघताना कड्याची उंच छाती दिसे. वरले आकाश दिसे. पसरून राहिलेल्या आशाळूच्या हिरव्या रंगातून पुढे गेले की काठावर, मोतिया रंगाच्या चुनखडीसारखा घट्ट भाग होता. त्याच्या थोड्या खाली मळीच्या तांबडमातीची नदीला किनार होती. तिथून कंजाळाची डेरेदार, सुसरीच्या अंगरंगाच्या खोडांची झाडे होती.

पुढे पसरलेला प्रचंड डोह—डोहापलीकडे हिरव्या दाटीने झाकलेले सामसूम दृश्य. काठच्या झाडीच्या गडद पारदर्शी सावल्या दोहोबाजूंनी एकमेकींना स्पर्शायला जवळजवळ येत.

कड्याखालचा भाग स्वप्नात पाहावा तसा होता. तिथला गडद काळा, भीती वाटावा असा डोह नि डोहाचा वास असलेला आसमंत म्हणजे कुणीतरी अतर्क्य शक्तीने समोर उभारलेले एक जिवंत चित्र होते.

...कड्यावरून उतरणाऱ्या वाटेच्या अगदी समोर काठाशी त्या मोतिया चुनखडीचा एक खडक होता. नदीत झेपावण्याच्या तयारीत, शेपूट सावरून बसलेल्या सुसरीच्या आकाराचा. आपोआप तुटलेला. तो खरोखरच जबडा उघडलेल्या सुसरीसारखा दिसे. त्याला 'सुसरीचा खडक' म्हणत. लेण्यात उजाडेपर्यंत राहिल्यामुळे खडक झालेल्या अप्सरेसारखी ती कुणी शापीत सुसर होती काय नकळे. पण ती खडकसुसर तिथल्या सुसरींच्या साम्राज्याच्या खुणेसारखी भासे. तिच्यावर उभे राहिले तर, ती चालायला लागेल, डोहात जाऊन बुडी घेईल, अशी भीती वाटे.

त्या खडकाखालती बाजूला, पाण्यातून वर येऊन पडलेली भुरी सुसर आम्ही उन्हाची पाहिली होती. एखाद्या डोंगरावर जाणाऱ्या वाटेसारखा तिच्या पाठीच्या पन्हाळीचा डोक्याकडे जाणारा भाग होता. आमची चाहूल लागताच तिने पाण्यात धाडदिशी उडी घेतली. नि थोड्या वेळाने काही अंतरावर जाऊन तिने अंग वर काढले. ती पाण्यात निघाल्यावर, दिवसातून एकदाच उडता यायची शक्ती वापरून नितळ पंखांचे दोन अस्वस्थ मोर पात्रावरून पलीकडे उडत गेले होते.

तिथे काळ्या डोहात आम्ही अनेकदा भुरीला एकटीलाच पाहिले होते.

तिच्या भयंकर उग्र रूपातही एक खानदानी शान असे. तिच्या वंशाचे रूपच तसे उग्र होते त्याला ती काय करणार? त्या डोहात एकमेकांना स्पर्शायला येणाऱ्या दोन काठच्या प्रतिबिंबांच्या मधल्या मोकळ्या पाण्यात निघालेले तिचे शरीर बघताना मोहक वाटे.

कड्यावरल्या गायकवाडाच्या एकुलत्या घराचे अंजीच्या घराशी काही तरी नाते होते. तिथली गायकवाडांची गोजा, भुऱ्या सुसरीबद्दल बरे बोलत नसे. "लैऽऽकी हाय" म्हणत, हवेत हात उडवत ती भुरीच्या नावाने बोटे मोडी. तिच्या घरात बसूनही कड्याखालच्या डोहातल्या भुरीच्या हालचाली जाणवत. गोजाच्या बोटे मोडण्याच्या आवाजाने उमटणाऱ्या डोहातल्या लाटाही. दिवाळीतल्या पाडव्याच्या संध्याकाळी भुरीने गोजाच्या नवऱ्याला तिच्यादेखत ओढून नेले होते. गोजाला ओरडण्याशिवाय दुसरे काहीही करता आले नव्हते. तिने आरडाओरडा केल्यावरती मुळीक डांब्यापासून माणसे धावत आली होती. बापूंनी दोन नळ्यांची बंदूक आणली होती. तोपर्यंत भुरी त्याला पोटाखाली धरून राजरोसपणे मध्यापर्यंत गेली होती. तिच्याजवळ जाऊन विझलेल्या बापूंच्या गोळीमुळे तिने जी बुडी मारली ती आठ दिवस. त्याचे हाडही तिने हाती लागू दिले नव्हते.

...भुरीच्या तावडीतून सुटून आलेल्या आंदा राडेबद्दल मुळकाचा मन्या शाळेत आम्हाला सांगत असे. तो इतके तळमळीने कुठलेही सांगे की, ती त्याची तळमळ खोट्या गोष्टीलाही खरे करील असे वाटे. मन्या सांगायला लागला की, आमच्या वर्गातल्या गौरीचे डोळे तर कुतूहलाने तिच्या अंगाएवढाले मोठे होत. आंदा राडेला शेपटाच्या एका झपाट्यात भुरीने खालती घेऊन ओढून नेले होते. त्यावेळी तो कड्याखालच्या पोटमळीत धोतराच्या खोच्यात मके घेऊन खुरप्याने टोकत होता. पण राडे, त्याच्या माघारी लोकांनी त्याचे दिवस घातल्यावर एक दिवस येऊन घरी उभा राहिला होता. त्याच्या लोकांनाही भूत वाटावा इतका तो विचित्र झाला होता. अंगभर ओरखडे उठलेले होते. शरिरावर कपडे नव्हते. नि त्याचा रंग तांबडमातीत लडबडल्याने सुसरीसारखा झाला होता. भुरीने

त्याला तिथल्या नदीजवळच्या मातीच्या पोकळ खबदाडीत, तो मेला समजून कुजण्यासाठी नेऊन ठेवले होते. पण राडे बुडणार दांडगा असल्याने त्याचा श्वास खूप वेळ राहिला होता. भुरी, त्याला कुजायला लागला की नाही ते मधूनमधून येऊन चाचपून पाही. तेवढ्यापुरता तो निपचित मुडद्यासारखा पडून राही. नि ती बाहेर गेल्यावरती जवळच्या खुरप्याने तो आतून टोकरत बसे. धोतरात असलेल्या मक्यावर तो जगला होता. नि एक दिवस जमिनीच्या छताला भोक पाडून वर आला होता. त्या खबदाडीखालचे विलक्षण वातावरण अजूनही मनात उतरून राहिले आहे.

...भुरीच्या तोंडून निसटलेली दुसरी शिकार धोंडूबाईच्या घुल्याची. धोंडूबाईचा आरडाओरडा परसदारी सुरू झाला की ओळखावे, तिचे एखादे कुत्रे सुसरीने नेले. जगाला शिव्या घालणारी भयंकर धोंडूबाई पाण्यात बुडलेल्या सुसरीला नदीच्या काठावर उभे राहून शिव्या घाली. पण ते शिव्या देणारे तिच्या तोंडाचे यंत्र घरापासूनच सुरू होऊन तरातरा नदीपर्यंत जात असे. धोंडूबाईची रास मकर असली पाहिजे, असे थोरली आई कधीतरी का म्हणे ते कळत नसे; पण मला मात्र धोंडूबाई सुसरीच्या जन्माला जायची ती माणसाच्या जन्माला आली आहे असे खरोखरी वाटे. तिच्या तोंडाची बाह्यरेषा थोडी फार लांबट, सुसरीच्या वळणावर गेलेली होती. तिच्या आईच्या पोटात ती असताना तिच्यावर सुसरीची छाया निश्चितच पडली असली पाहिजे. धोंडूबाईला, जिवणीच्या शेवटापासली कातडी नेहमी थोडी वरती करायची सवय होती. त्या वेळी तिचे पिवळट, टणक, वाजवीहून थोडे मोठे दात दिसत. दाढांच्या जवळचे थोडेसे अंतर दिसे. नि भुऱ्या सुसरीच्या दाढेत असलेला मणी धोंडूबाईच्याही दाढेत कुठल्यातरी रूपात असला पाहिजे असा माझा समज होता. तेव्हा आमच्या घरी थोरल्या आईच्या तोंडून "बळाने काढू ये मणि मकरदाढेत दडला" हा श्लोक मला नेहमी ऐकायला मिळत असे...

कुठल्यातरी अमानवी छाया पडून जन्माला आलेली माणसे असतात

हे खरे असले पाहिजे. धोंडूबाईला उन्हात अधांतरी धरले असते तर तिची छाया दुरून दिसणाऱ्या, मळीत पडलेल्या सुसरीसारखी वाटली असती.

माणसांना तोंडाने पाखडणारी धोंडूबाई कुत्र्यामांजरांना फार जवळ करी. तिच्या परिवारात घुल्याला मानाचे स्थान होते. त्याचा, कुत्र्यात नि माणसातही तेव्हा चांगला भाव होता. त्यावेळी तो नुकताच भुरीच्या तावडीतून निसटून आला होता. त्यामुळे धोंडूबाईची त्याच्यावर विशेष माया. डगरीला पाणी पिऊन परतताना भुरीने त्याला धरायचा यत्न केला होता. पण फक्त शेपटीच तेवढी तिच्या दाढेत देऊन घुल्या सटकून आला होता. कुत्र्याने भुरीच्या किरणातून निसटावे ही खरोखरी साऱ्या सुसरजातीला पाण्यात लाजेने बुडून घ्यायला लागावे अशी गोष्ट झाली होती. वाण्याच्या कोपऱ्यावर, वडाखालती, पंडितदादांच्या बोळातून वर घुल्या कितीतरी कुत्रे स्वतःभोवती जमवी; आपल्या थोड्याशा उरलेल्या शेपटाचा तुकडा अभिमानाने हलवत असे. महत्त्वाचे काही त्यांना ऐकवत असे. ते सारे बवे त्याचे मोठेपण मुकाट्पणे मान्य करत. घुल्याकडे बघून मोठी माणसेसुद्धा, "तो बघ घुल्या" म्हणून त्या वेळी बोटे दाखवत. आणि तो आपले कान त्या बोलण्याचा वारा भरून घेण्यासाठी अधिकच उभे करी. त्याचे ते मोठेपण पाहून आपलेही एखादे नख सुसरीला देऊन मोठे व्हावे असा मोह मला होई.

भुरी सामर्थ्यवान होती यात शंका नाही. मोठ्या वंशातल्या एखाद्याच जातिवंत जिवाच्या शरिरात कुठेतरी एखादा अभेद्य, मौल्यवान खडा असतो असे थोरली आई सांगे. एखाद्या नागाच्या फण्यात मणी असतो, आणि एखाद्या सुसरीच्या दाढेतही. तो मकरमणी भुरीच्या दाढेत असला पाहिजे अशी माझी खात्री होती.

भुरीने आपल्या कारकीर्दीत ज्या काही थोड्या माणसांना पाण्यात कायमचे नेले त्यात सांगलीच्या छत्रकारकुनांच्या मुलाचाही घात तिच्या नावावर संशयास्पदपणे घातला गेला होता. त्या वेळी सांगलीची काही मुले आमच्या घाटावरून सकाळची पोहायला पडली होती नि पाण्यातल्या

देवळापाशी, भुरी येताना दिसल्यावर मध्यातूनच परत फिरली होती. पण तो मुलगा भुरीच्या भीतीने पाण्यातून निघालाच नाही. तिथेच तो आतून कुणी ओढल्यासारखा बुडाला होता. दुसऱ्या दिवशी पलीकडे पंतांच्या मळीला तो फुगून लागला. त्याचा फक्त उजवा पाय तेवढा मुळातून उखडलेला होता. आणि हे काम भुरीशिवाय दुसऱ्या कुणाचे नव्हते, असे शिंगटे नानाने ठामपणाने ठरवले होते. शिवाय देवाच्या डोहातले ते भुरीचे कृत्य अतिक्रमणाचे झाले असेही नानाचे म्हणणे होते.

भुरीसारख्या एवढ्या प्रचंड जित्रापाने आपल्या आयुष्यात दोनचार माणसे नेली तर खरे म्हणजे तसे काय होते? पण गावातल्यांना आपला समोरचा डोह देवाचा आहे, येथे असे चालणार नाही, या सोईस्कर भावनेवर, सुसरीसारख्या जन्माने क्रूर प्राण्याकडून स्वभावाची गरिबी राबवून घ्यायची होती...

भुरीच्या सामर्थ्याविषयी माझ्या मनात थोडीफार शंका आली ती सांगलीकरांचा तळ वडाखाली पडला त्या वेळी. दूरच्या शाळेतून संध्याकाळी परत आल्यावरती, वडाखाली पडलेला तो सांगलीकरांचा तळ आजही माझ्या डोळ्यापुढती येतो. वडाखालचे गाळमातीचे सगळे तांबडे आवार लख्ख झाडले गेले होते. पाण्याचे शिपकारे मारल्याने उमललेल्या मातीचा दरवळ सुटला होता. पांढऱ्याफेक कापडाच्या राहुट्या तणावा देऊन उभ्या राहिल्या होत्या. पण त्याहून नवलाच्या दोन गोष्टी दुसऱ्या दिवशी सकाळी त्या लवाजम्यात आल्या. मी त्या पहिल्यांदाच पाहत होतो. पिंगट पिवळट वाणाचे उंचच उंच उंट नि त्याहून अजस्र असलेला काळा मातकट हत्ती. माझ्या त्या रात्रीतल्या स्वप्नांची पोकळी भरून तो हत्तीच होता. हत्ती पाटावर काढून पूर्वी दादांनी मला दाखवला होता. हत्तीच्या उमदेपणाच्या, अचाट शक्तीच्या कथा मी वाचल्या होत्या. एका सशाने, पाण्यातली राणी म्हणवून घेणाऱ्या सुसरीची नि हत्तीसारख्या मातीवरल्या राजाची एकमेकांच्या ताकदीविषयी शर्यत लावून फजिती केल्याची, द्यानू मास्तरनी सांगितलेली गोष्ट कानात जागी होती. सुसर पाण्यात असताना हत्तीलाही ओढू शकते,

हे ऐकले होते. कुठल्यातरी शापामुळे एक यक्ष हत्ती झाला होता. पाण्यात एका सुसरीने त्याचा पाय धरला होता नि विष्णूसारखा देव त्याला सोडवण्यासाठी प्रत्यक्ष आला होता. ती गजेंद्रमोक्षाची कथा थोरल्या आईने मनात जिवंतपणे सोडली होती.

...हत्ती नि सुसर यांच्या संबंधातले अनेक संदर्भ जिवंत होत होते आणि त्यातले काहीतरी इथे घडेल असे वाटत होते. भुरी आता त्या हत्तीला ओढेल आणि त्याचा यक्ष होईल अशी माझी खात्री झाली होती.

तो यक्षहत्ती माहुताला पाठीवर घेऊन कलत्या दुपारी, आपले लहानगे शेपूट पाठीमागल्या रुंद मांड्यांवर इकडून तिकडे आपटीत, गुरांच्या पाणवठ्याची डगर उतरी. नदीत शिरे. त्याच्यामागून आम्ही कितीतरीजण जात असू. तो अवघा डोह खळबळून काढी. नांगराने माती उकरावी तसे पाणी फाडत पलीकडे जाई. कितीतरी वेळ त्याचा हा कार्यक्रम चाले. पण त्या तीन चार दिवसात भुरीचा आणि कुठल्याच सुसरीचा डोहात पत्ता नव्हता. मला मात्र भुरीचा भयंकर राग आला होता. डोहाची मालकी जमिनीवरल्या प्राण्याने घ्यावी नि डोहाच्या राणीने कुठेतरी खबदाडीत नाक खुपसून राहावे हे तिच्यावरल्या माझ्या विश्वासाला तडा पाडणारे होते. पुढे कधीतरी दादांनी मला सांगितले की, हत्तीला ओढणाऱ्या सुसरी तिकडे दूर असतात. आपल्या सुसरींना हत्ती ऐकणार नाही.

आपण असल्यापासून भुरीला डोहात पाहत असल्याचे राघूदादा सांगे. राघूदादा गावातला सर्वात जुना म्हातारा होता. त्याच्या साऱ्या भुवयासुद्धा पांढऱ्याशुभ्र झाल्या होत्या नि त्यांचे डोळ्यांवर येणारे वजनही त्याला तेव्हा पेलेनासे झाले होते. पण त्याचे स्मरण मोठे होते.

कुणी बांधला असेल यावर विश्वास न बसण्याइतका आमचा जुना घाट बांधायच्या कामावर आपण असल्याचे राघूदादा ऐकवत असे. नदीतून येणाऱ्या गाळ-मातीचे ढीग पडणाऱ्या काठाला घाट बांधताना धरच लागत नव्हता. त्या वेळी जनावरांच्या शिंगांची पोतींच्या पोती तिथे ओतली होती. त्या शिंगांना मुळे फुटली नि त्यावर घाटाचे बांधकाम

केले असल्याचा राघूदादाचा दावा होता. राघूदादा सांगे की, त्या वेळी भुरी कड्याकडे राहायला गेली नव्हती. ती सटवाईच्या डोहात तेव्हा राही.

तेव्हा भुरीचा जोडीदार होता. तो तिच्याहून मोठा दिसे. राघूदादाने जोडीदाराबरोबर मळीत वरती येऊन पडताना भुरीला अनेकदा पाहिले होते. रंगा पाटलाच्या मळीतल्या पांढऱ्या वाळूतली, भुरीच्या नराची दुसऱ्या एका नराशी लागलेली कळवण सांगताना राघूदादा थरकवून टाकत असे. ते दोन नर एकमेकांना आप काटेरी शेपटे फिरवून कसे मारत होते, विजेसारखे कसे तळपत होते, त्यांचा आवाज नदीवरल्या पोकळीत कसा भरून राहिला होता, त्यांचे फिसकारे कसे कढत होते, ते राघूदादा पुनःपुन्हा सांगे. पूर्वीसारखी प्राण्यात आणि माणसातही तशी रग राहिली नाही म्हणून दुःख करी. भुरीच्या नराने दुसऱ्या नराला पाण्यात पळून जायला लावले होते; आणि पाण्यातही तो त्याच्या मागे लागला होता. ते भांडण भुरीच्या मालकीकरताच असावे. राघूदादा सांगे, नदीत आता कुठे दुसऱ्या सुसरींची डोस्की वर दिसायला लागलीत. त्या वेळी ते एकटे भुरे जोडपे डोहातल्या जगावर राज्य करतांना दिसे.

गुरांच्या पाणवठ्याच्या कोपऱ्यावर, निळिंबीच्या जाळीपाशी डोके वर काढलेल्या भुरीच्या नराची चुंबळ, यात्रेच्या मुक्कामातल्या एका कलेक्टरनी कडाकून फोडली होती. तो गोरा कलेक्टर एका पायाने थोडा लंगडत होता. त्याचे पुढे कितीतरी वर्षे गावात नाव निघत होते. त्यावेळी डोहातले पाणी तिथे लाल झाले होते. आणि नेहमी शांत असणारा डोह नंतर खूप वेळ त्या नराच्या तडफडण्याने खळबळत होता. राघूदादा सांगे की, इतका खळबळलेला डोह त्या आधी नि पुढे कधीच गावाने पाहिला नाही. जणू डोहालाच काहीतरी यातना झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी ते धूड सटवाईच्या डोहात फुगून वर आले होते. त्यानंतर भुरी मयंकर खवळली होती. ऊनऊन सुस्कारे सोडत डोहातून सैरावैरा धावत होती. डोळे ढाळत होती. कुठल्याही वस्तीच्या पाणवठ्याजवळ येत होती.

पाण्यातली झाडे दाढांनी कडाडा फोडत होती. आणि माणसे त्या दिवसात अगदी जपून नदीकडे जात होती.

घरातला कर्तासवरता पुरुष निघून गेल्यावर एखाद्या बाईचे व्हावे तसे भुरीचे झाले होते. जिवाला कंटाळल्याची तीच लहर भुरीत मधूनमधून येत होती काय, नकळे. जीवनाच्या ओढीविषयीचा एक सूक्ष्मसा परकेपणा तिच्यात कधीकधी दिसे. तेव्हाहून सटवाईचा डोह वसतीसाठी तिने सोडला होता. पण कड्याकडून आठवणीने ती तिकडे जात होती. भुरीने त्यानंतर कुणाशी सोयरीक ठेवली नाही. तिची एखादी औलादही डोहात उरली नाही, असे राघूदादा खेदाने म्हणे. क्रूर प्राण्यातलीही जातिवंत औलाद टिकावी म्हणणाऱ्या राघूदादाच्या उमद्या मनाचा मला ठावच लागत नसे.

...दादांनी हस्तलिखीत मासिकात काढलेला शिकारी जिवंत होऊन, उठून आल्यासारखा खाडिलकर नावाचा एक सांगलीचा माणूस कितीतरी वर्षे न चुकता खांद्यावर मोठी बंदूक टाकून येत असे. गावातल्या एखाद्या उन्हाळ्यातल्या उजाडणाऱ्या दिवसाबरोबर तो येई. दादांच्या चित्रातल्या शिकाऱ्यासारखे त्याने खाकी खोबणींच्या रेघारेघांचे पायमोजे घातलेले असत. डोक्यावरल्या हॅटची चामड्याची वादी हनुवटीवर ताणलेली असे. आणि त्याचा खाकी, कोपरापर्यंतचा सदरा अर्ध्या चड्डीत घातलेला असे. एवढा मोठा माणूस चड्डी घालतो हे गमतीचेच होते. गाजरी गोऱ्या रंगाचा, घाऱ्या डोळ्यांचा तो धिप्पाड माणूस आमच्या गावातल्या माणसांहून एकदम निराळा वाटे. त्याच्यावरोबर आणखी दोनतीन अंधुक लोक आलेले असत.

खाडिलकर आल्या-आल्या घाटावरल्या डगरीवर उभा राही. डोक्यावरला घाम निपटून काढी. आणि डोळ्यांना दुर्बीण लावून पसरलेल्या डोहाकडे दूरवर बघे. त्याच्याभोवती एक-एक असे खूप जण गोळा होत. सुसरींच्या हालचालीविषयी, चेहऱ्यावरून फार माहीतगार वाटणाऱ्या लोकांना तो विचारी. कुठल्या कुठल्या सुसरी राहिल्या आहेत, कुठे आहेत, त्याचा

तपशील गोळा करी—मग नावेच्या दत्तूची त्याची मुलाखत होई. खाडिलकर आल्यावर दत्तूची मजा असे. त्याचा भावही तेव्हा वाढे. खाडिलकर चढणाऱ्या उन्हाच्या वेळी नावेतून बंदूक घेऊन सुसरींच्या शोधात निघे. नावेत अजिबात बोलायचे-हलायचे नसे. दत्तू नुसत्या लांब कळकावर नाव नेई आणि ती हलते आहे असेसुद्धा वाटत नसे. कड्याकडल्या घळी, मुळीक-डांब्याच्या मळ्या, पाण्यातल्या देवळाजवळची पलीकडची कंजाळदाटी, गुरांच्या पाणवठ्याच्या निळिंवीच्या जाळीचे झुकले वळण, सटवाईचा डोह, रंगा पाटलाची दरड, केडी नानांची आंवराई—सगळीकडे नाव जाई. खाडिलकर आपल्या बंदुकीच्या गोळ्यांची शक्ती कशी आहे ते नावेत सांगे. सुसरीविषयीच्या शब्दांभोवतीचा प्रकाश नावेभर पसरल्यासारखा वाटे. आणि काही नवे पाहायला मिळणार या उत्सुकतेने मी शिगोशिग होई. पण इतके वेळा दत्तूने वरती आलेल्या सुसरी खाडिलकराला दाखवल्या तरी एकही सुसर त्याला मरत नसे. कड्याकडे सुसरीवर आवाज टाकला की, थेट खालती सटवाईच्या डोहापर्यंतच्या सुसरींना त्या आवाजाची भयानकता कळत असे नि सगळ्या सुसरी सावध होत. त्या आवाजानेही एखादी धीट सुसर मळीतल्या वाळूत पडून राहिलेली असे. पण ती इतकी तयारीत असे की खाडिलकराच्या बंदुकीतली गोळी सुटल्यानंतर ती पाण्यात धापकन उडी घेई आणि सुसर पाण्यात नि गोळी वाळूत पडे.

पसरून राहिलेल्या उन्हाच्या दुपारी वडाखाली सावलीत चाललेला आमचा गोट्यांचा डाव अर्धाच टाकून आम्ही त्या वेळी नदीवर पळालो होतो. घाटासमोरच्या मळीत गाळमातीच्या रंगाची सुसर पाय पसरून उन्ह खात पडली होती. पलीकडच्या काठावरून, तिच्या आकाराच्या शेवटच्या बाह्यरेषांना मोठे करत, ते वातावरण माझ्यापर्यंत आले होते. खाडिलकराच्या गोळीच्या पाठीवर बसलेल्या तडाक्यामुळे सुसर झडझडून मळीतल्या हवेत थोडीशी वर उडाली होती आणि पाण्यात कोसळली होती. पण चुंबळीवरच गोळी लागली तर सुसर मरते असे शिंगटेनाना सांगे. सुसरीच्या पाठीचे कातडे इतके जाड असते की, पायात लागून राहिलेल्या काट्याचे

पायात कुरूप होते तशी गोळीही सुसरीच्या कातड्याच्या पहिल्या थरात घर करून राहते. त्या गोळीभोवती शरिरातल्या द्रव्यांची वर्तुळे तयार होतात. आणि मग दादा म्हणत, अशा नुसत्या अंगभर गोळ्या लागून कुरुपे झालेली, पांढऱ्या मळकट कपड्यांचा झगा घालून येणाऱ्या कडकलक्ष्मीसारखी एक सुसर आपल्या नदीत आहे...

खाडिलकर आपल्या दिसण्याने, बोलण्याने मोठा वाटे. सुसर मेल्यावर ती पाण्यातून वर कशी ओढायची, मिरवणूक काढत तिला सांगलीला कसे न्यायचे, याचे खरपूस वर्णन तो करी. दरवर्षी न चुकणाऱ्या उन्हाळ्यासारखा तो येई. त्याच्या येण्याची पुढेपुढे सवयच झाली होती. पण तो गोळ्या 'इनाकारण्या' खर्च करत असल्याचे शिंगटेनानाचे मत होते. डोहातल्या त्या जित्रापांना नुसते डिवचून जाण्याच्या नाना विरुद्ध होता. जनावर पाडायला पाहिजे होते एक, नाहीतर निवांत तरी राहायला हवे होते. कधीकधी खाडिलकर पाण्यातच गोळी घाली. तिथे पाणी लाल झाल्याचे सांगे. सुसर पाण्यातच मेल्याची खात्री देई आणि आतल्या आतच वाहून जाईल असे म्हणे. पण पुढे खाडिलकरचे कौतुक राहिले नव्हते. "हितं पानी लाल झालं, तितं पानी लाल झालं करल न् जाईल निघून...खजाळीचं सुसर मारत्यात! ह्यांच्या बानं मारली हुती!" अशी नाना माघारी खाडिलकरची चेष्टा करी. मोठ्यांदा हसे. नि हे काम बामणाचे नाही, म्हणे.

तरी खाडिलकरांच्या पुढे मारायच्या वेळी एका वेळी एकच सुसर असे. पण पाटीलवाड्यातल्या बापूंना, एकदम पाच सुसरींचे ताट पुढे वाढून आलेले असताना, त्यातल्या एकाही सुसरीचा घास न घेता आल्याचे मी पाहिले होते. देवघाटाजवळ त्या दिवशी सकाळ व्हायच्या आधीच पाच सुसरी एकत्र आल्या होत्या. घाटावर माणसे गोळा झाली तरी चाहुलीला दबणाऱ्या सुसरी मागे सरत नव्हत्या. पाण्यात बुडत नव्हत्या. रात्री तात्याभटजींनी मुळीकडांच्यापाशी नदीत टाकलेले गाईचे मेलेले वासरू फुगून

टम्म झाले होते. आणि वारा नसलेल्या संथ रात्रीत सकाळपर्यंत घाटापाशी आले होते. त्या कुजलेल्या वासराचे सुसरी पाच बाजूंनी लचके तोडत होत्या.

त्या सुसरीत भुरी दिसत नव्हती. एक कुठलीशी अनोळखी मोठी सुसर पहिल्यांदाच गावाला तोंड दाखवत होती. ती उभ्याआडव्या अंगाची सुसर गेल्या पाण्यात वरून आली असावी. ती कचकन लचका काढी आणि तिच्या बळाने उरलेल्या चारी सुसरी तिच्याकडे ओढल्या जात. उरलेल्या चारी सुसरी जवळजवळ एकाच आकाराच्या होत्या. एक सुसर काळी होती. आमचे गाव पूर्वी दाट अरण्य होते. त्या अरण्यातून वाहणाऱ्या नदीत राहताना, अरण्यातला काळोखरंग तिला आला असावा. ती थोरल्या आईच्या गोष्टीतल्या क्रूर चेटकिणीसारखी वाटे. मुळीकडांब्याच्या मळीच्या आंब्यांच्या झाडीतल्या अंधारघळीत ती राही. एकीवरती सोनेरी झाक होती आणि ती देवाची सुसर म्हणून अंजी सांगे. गुरांच्या पाणवठ्याला झुकलेल्या निळिंबीच्या जाळीच्या वळणाला पाणी प्यायला आलेल्या कुत्र्यांना नेहमी नेणारी सुसर त्यात होती. आणि अस्ताव्यस्तपणे झोपणाऱ्या एखाद्या बाई-सारख्या, आकाशाकडे पायपोट करून उन्हात तापत पडणाऱ्या, रगा पाटलाच्या मळीत राहणाऱ्या सुसरीचाही त्यात भाग होता. दिवसाढवळ्या चाललेली ती क्रूर गंमत थांबवण्यासाठी कड्याकडून बापूंना सायकलवर घालून आणले होते.

गावात तेव्हा ज्या अगदी थोड्या बंदुका आल्या होत्या त्यातली बापूंची एक. त्यांची दुनळीची बंदूक सर्वांत भारी होती. घाटालगतच्या दिवटीच्या मळीत बसून त्यांनी त्या पाच सुसरींवरती आवाज टाकला होता. आणि गोळी त्या बिचाऱ्या वासराच्या मासात रुतली होती. पाची सुसरींनी पाण्यात डोकी बुडवली होती. त्यातली मोठी सुसर तिथे बुडून फार लवकर मध्यावरती निघाली आणि वेगाने पाण्यातल्या देवळाच्या गरुडावर जाऊन लागली. तिथे तिने टाकलेले फुसकारे नदीच्या पोकळीभर पसरलेले होते. सुसरीने रागाने केलेला तसला प्रकार मी पहिल्यांदाच पाहात होतो. तिच्या नाका-पासच्या सुस्काऱ्यातून वाफेसारखे काहीतरी पांढरे वरती उडत होते. सोनेरी

सुसरही वासरापासून निघून गेली होती. उरलेल्या तीन सुसरी मधूनच निघून जात होत्या. पुन्हा दबत येत होत्या. आणि बापूनी नाण्यासारख्या मोजून आणलेल्या गोळ्या फुकट संपून गेल्या होत्या.

सटवाईच्या डोहाखाली मासे धरायला लावलेल्या नीरात कोळ्यांना एक सुसर सापडली होती. पण पाण्यात उतरून भालेधरच्यांनी सुसर मारली ती आसाममधून आलेल्या दोन माणसांनी. ते दोघे सुसरी मारायचाच धंदा करत. तिकडे दूर, थंड देशातल्या बायका सुसरीच्या कातड्याचे कपडे करत होत्या. त्यांच्यासाठी ते सुसरींची कातडी काढून विकत होते. सुसरीचे कातडे, तिचा जीव घेऊन काढायचे आणि त्याचे माणसांनी कपडे करून का घालायचे ते मला कळत नसे. सुसरीच्या कातड्याचे कपडे सुसरीनेच घालणे काय वाईट होते?

ते दोघे आमच्या नदीचे ठिकठिकाणचे वरच्या भागातले डोह धुंडत आले होते. त्यांच्याजवळ दोन्ही बाजूंना हवेच्या नळ्या असलेली एक अगदी लहानशी होडी होती. दोघांना उचलता येईल एवढी. नदीवरल्या प्रवासात ते होडीतच राहत. स्वयंपाक करत. तिन्हीसांजेची उन्हे उतरून गेल्यावरती पाण्यातल्या देवळावर नाव टेकवून त्यांनी ती सुसर मारली होती. मासाचा तुकडा एका मजबूत दातेरी गळाला लावून ते पाण्यात टाकत आणि सुसर गळाला अडकली की पाण्यात उतरून वरच्या-भाले घेऊन हल्ला करत. त्यांना सुसरी मारायला परवानगी नव्हती. आणि त्या रात्री गावात कलेक्टरांचा मुक्काम असल्याचे कळल्यावर त्यांनी रातोरात आपली होडी पुढे हाकारली होती. नाहीतर त्यांनी ती सुसर आमच्या इथे फाडली असती. आणि तिच्या पोटात, तिने खाल्लेल्या एखाद्या बाईची काकणे, सोन्याचे दागिनेही आम्हाला दिसले असते.

...संध्याकाळी घाटावर, साबणाचा पांढराशुभ्र खूप फेस काढत, कपडे धूत एकटेच बसणे हे कुतूहल, भीती मिसळलेले सुख असे. सौम्य काळिमा वातावरणभर पसरत येई. हळूहळू सावल्या गडद व्हायला लागत. लाटांच्या तळातला भाग अधिकच काळा होई. एका लयीत लाटा खालती चाललेल्या

असत. घाटाच्या काळ्याभोर रंगात आपणाला मिसळून जायचे आहे अशी येणाऱ्या काळोखाची इच्छा जाणवे. ते काळोखाने भूल घातलेले वातावरण अंगाने स्पर्शताना मी विस्मित होई. धुताधुता एकटेपणाच्या आणि सुसरीच्या भीतीने, पाण्यातल्या पायरीवरून चटकन पाय काढून घेई. पायऱ्या चढून घाटाच्या तबकावर उभा राही. पलिकडल्या पाण्यातल्या देवळाच्या गरुडापाशी काळोख वर्तुळाकार फिरत काहीतरी ठरवतो आहे असे वाटे. आणि त्या गरुडावर येऊन एका सुसरीने आपला केवढाच्या केवढा जबडा उघडलेला दिसे.

त्या सुसरीला ती रोजची संध्याकाळची सवय होती. ती तिथे जबडा उघडून पडे. आणि पिवळ्या चोचीचे मातकट रंगाचे दोन पक्षी तिच्या जबड्यात उतरताना प्रकाशाच्या वेळी खूपदा स्पष्टसे दिसत. ते जबड्यात आतवर जात. दिसेनासे होत. तरी सुसर डोळे मिटून सुखावलेली दिसे. दादा सांगत, ते पक्षी सुसरीच्या दाढेत झालेले किडे, आळ्या खातात. तिचा जबडा स्वच्छ करतात.

एवढा मोठा अंगाचा ऐवज असलेली ती सुसर काय वाटेल ते खायला तयार होती. पाण्यातल्या गरुडावर ती उन्हाची जबडा पसरून राही. आणि जबड्यातल्या सावलीत खूप माशा शिरल्या की, एकदम जबडा मिटून घेई. माशा गिळून टाकी. माशांच्या त्या क्षुद्र घोटाने तिला काय होणार होते? ...सुसरीच्या तोंडात दात होते ते फक्त शिकारीकरता. तिला चावण्याकरता दात नव्हते. कुजलेल्या मासाचे लचके ती तसेच गपागप गिळी. आणि मग नदीतळातले दगडधोंडे खाऊन पोटात ते लचके पचवी. ही आबूची माहिती होती.

जुन्या चुनकळीसारखी सुसरीची विष्ठा आबूने मला गुरांच्या पाणवठ्याला दाखवली होती. लवकर उठून गेले की, सुसर रात्री वरती येऊन गेल्याच्या सरपटी दिसत. अंजीच्या आईला मी एकदा ती घाटावर भांडी घासत असताना, सुसर डगरीला कशाला येते ते विचारले होते. गुरांचे पडलेले 'श्यान' खायला ती येत असेल, असे तिने मला सांगितले होते. अंजीची

आई कधीकधी कामाला घरी आली नाही म्हणजे थोरली आई, "गेली असेल कुठेतरी शेण खायला!" असे म्हणे. अंजीची आई शेण कसे खाईल हे मला कळत नसे, तसे सुसरही शेण कशी खात असेल तेही.

तेव्हा गावात सारखे दरोडे पडत. दरोडेखोर येत आणि गोफणगुंडा सुरू करत. त्यांना तोंड देण्यासाठी गावातल्या माणसांनी गोफणी करून दगड मारायची सवय सुरू केली होती. संध्याकाळी डगरीवरल्या मोठ्या चिंचेपाशी सगळे गोळा होत आणि नदीत गोफणीने दगड मारत. अगदी लांब गेलेला माझा दगड मध्याच्या अलीकडेच पोचे. डोहात अलीकडे, जवळ निघालेल्या सुसरीला गोफणीने मारायचा माझ्या मनांत वेत चाले. तो दगड मी बरोबर तिच्या चुंबळीवर मारणार होतो. लगेच जीव जाण्याच्या प्रत्येकाच्या ज्या जागा मला माहीत होत्या त्यात सुसरीची चुंबळ ही. तिथे साधा दगड लागला तरी ती मरेल असे मी ऐकले होते. दादांना ते खरे का म्हणून विचारले तर सांगत, दगडच काय, गाळमातीचा ढेकूळ तिच्या चुंबळीच्यावरती जाऊन फुटला तर, फुटलेल्या ढेकळाच्या कणांच्या वाऱ्यानेही सुसर मरेल...ते हे सांगत आणि मुळीच हसत नसत. दादांच्या असल्या फेराच्या बोलण्यात मी नेहमी सापडे नि खऱ्याखोट्याच्या पाण्यात खालीवर होई. सुसरीच्या चुंबळीच्या ठिकाणी पूर्वी तिसरा डोळा होता आणि चुंबळ म्हणजे त्या बंद झालेल्या डोळ्याची उरलेली खूण आहे, हे मी शाळेत ऐकले. नंतर दादांना मी त्याविषयी बोलल्यावर त्यांनी सांगितले होते की, आता सुसरींनी तिसऱ्या डोळ्याच्या ठिकाणी दुर्बिणी बसवून घेतल्या आहेत, आणि त्या त्यातून रात्री आकाशातल्या चांदण्या बघत असतात...

सुसरीची सरपट पडायला लागल्याच्या वार्तेने, गावातले उन्हाळ्याच्या दिवसातले वातावरण सावध होऊन राहिल्यासारखे वाटे. आबूबरोबर अगदी सकाळी जाऊन ती सरपट मी अनेकदा पाहून आलो होतो. निळिंबीच्या जाळीच्या वळणापासून ती सरपट पाण्यात जाई. त्या वळणाजवळ वर एक घळ होती. मेलेल्या माणसांना तीत जाळत. घळीच्या थोडे वर एक उंच लिंब होता. लिंब्राच्या आसपास फिरून नदीत परतल्याच्या खुणा, सुसरीच्या

शरिराच्या सरपटीवरून दिसत. पाणी प्यायला येणाऱ्या जनावरांच्या शेणामुताने खरपूस झालेली माती सुसरीला आवडते म्हणून आबू सांगे. ती खाण्यासाठो ती रात्रीची येत असावी.

रात्री तिला वरती चढताना पाहायचे म्हणून मी नि आबू डगरीवरच्या चिंचेजवळच्या ओवरीवर येऊन बसत असू. चांदण्या रात्री चोरासारखी तीही येत नसावी. वरच्या बाजूला काळोखात, सगळे गाव गुडघ्यात डोके घालून गुड्डप झोपी गेलेले असे. डोहापलीकडील वाडीही. काळोखात खालती सरकणाऱ्या डोहाकडे बघत, निळिंबीच्या वळणावर लक्ष ठेवत, ओवरीवर आम्ही तिष्ठत असू. डोळे मिटायला लागत इतका वेळ होई. वडाखालच्या दाट झाडीतून घुबड आपला भीतिदायक फिरकीदार आवाज वातावरणात टाकी आणि त्या आवाजाचा भांड्यातून पडसाद यावा तसा नाद गावाला कापवीत अंगात भरे. तरीही आम्ही धीर धरत असू.

सुसर वरती येत होती ती जागा रात्री भुतांची होती. पण भुतापेक्षाही सुसरीची ताकद अधिक असली पाहिजे. ती खाऊन टाकील अशी भीती त्यांनाही वाटत असली पाहिजे. ओवरीवर विस्तारून आलेल्या चिंचेच्या खोल पानावळीत निजलेल्या खारी उगीचच झोपेतून चाळवत, विचित्रशा चिरकत नि लगेच निळिंबीच्या जाळीपासचे पाणी फाकल्यासारख्या आवाजाची जाणीव होई. आम्ही श्वास रोधून धरत असू. सुसरीचा स्पर्श मातीत शिरशिरल्याचे निश्चितपणे वाटे. हळूहळू एक काळोखा अंधुक आकार पुढे सरायला लागे. थोड्या वेळाने त्या काळोख-आकारातला एक पडदा सरकावा तसा एकदम मुठीएवढा जिवंत तांबडा ठिपका दिसू लागे. त्या रात्रीतल्या अंधारात, सुसरीचा बाजूने दिसणारा तांबडा डोळाच नुसता वरती सरकतो आहे असे वाटे. थोड्या वळलेल्या कोनाच्या वेळी सुसरीचे दोनही डोळे दिसत, आणि आपण काही वेगळे पाहतो आहोत ही भावना मनभर होई. डगरीच्या लिंबापाशी तो तांबडा डोळा थांबल्यावर आबूने तिच्यावर बॅटरीचा झोत टाकला होता. त्या इतक्या रात्री ते सुसरीला अकल्पित होते. ते उमद्या रंगाचे दांडगे धूड प्रकाशात

४२०२१ वि: निबंध
१८८५ दि: २०।७।६५

निथळत क्षणभर स्तब्ध राहिले होते. आणि मग धडधडत धडधडत ती पाण्यात जाऊन कोसळली होती. ती पाण्यात ज्या सफाईने वेगात जाई तसे तिला मातीवरून जाता येत नव्हते. घुटमळत, कष्टत चालावे तसे तिचे चालणे होते. तो तांबडा डोळा रात्री वर सरकताना आम्ही पुन्हाही पाहिला होता.

सुसरीची सरपट लिंबाच्याही वर पडत चालल्याचे पुढच्या काही दिवसात दिसे. लिंबाच्या वरल्या वाजूला चिंच होती तिथपर्यंत ती सरपट आलेली असे. सुसरीने इतकी मर्यादा सोडू नये. उद्या ती चिंचेपासच्या भेडस-गावकरांच्या गोठ्यातले वासरूसुद्धा नेईल या विचाराने रात्री जागून, सुसरीला काठ्यांनी धोंबलण्याचे दिगंबरशास्त्री ठरवत. ओवरीपाशी चार जणांनी जमून राहायचा बेत करत.

...वर चढत चाललेल्या सुसरीच्या सरपटीमुळे आई मनातून कुठेतरी भ्यायल्यासारखी वाटे. काळोख्या रात्री आम्ही अंथरुणावर पडलेलो असताना सहजपणाने बोलावे तसे, "सुसर फार वर यायला लागली आहे," असे अस्पष्टपणे बोले. पण दादा तिच्या मनात कुठेतरी असलेल्या भीतीला नेमके ओळखत. सांगत की, ती आता फारच धीट झाली आहे. चिंचेपासूनसुद्धा ती आता वरती यायला लागली आहे. वरच्या रस्त्याने शिदूभटजींच्या घरावरून ती पाठीमागे येते. पाठीमागच्या रस्त्याने आपल्या घरावरून पुढे जाऊन ती गावाला प्रदक्षिणा घालते आणि मठाच्या पाणवठ्याला पुन्हा पाण्यात शिरते, असे दादा सांगत.

रात्र फार झालेली असे. बाहेर काळोख अधिकच दाटल्यासारखा वाटे. थोड्या वेळाने "आता सुसरीची प्रदक्षिणेची वेळ झाली असेल" असे दादा म्हणत. आईला कुठून सुसरीचा विषय काढला असे होई. मला भयंकर भीती वाटे. त्या भीतीत नुसती सुसरीचीच भीती नसे. आणखी कसलीतरी भीती त्या सुसरीवर बसून अंधारातून येणार असे. घरापलीकडच्या काळ्या वावरात शिंगटेनानाचा फुल्या बैल नुकताच पुरला होता. तो कुजून त्याची घाण यायला लागली होती. सुसर फेरी घालायला आली की, वाट ,आडवी करून

त्यालासुद्धा खायला जाईल असे वाटे. थोड्या वेळाने शिदूभटजींच्या कोपऱ्यापाशी कसल्यातरी हालचालींचा भास होई. हळूहळू हालचाली वाढत. खूप पावले तिकडून मठाकडे चालल्यासारखी वाजत. जवळजवळ येत. सुसर आली वाटे. मी आईला बिलगे नि ती सांगे, "अरे, गस्त जाते आहे..."

...सुसरीच्या वरती वाढत जाणाऱ्या सरपटीचे गूढ पावसाळ्याच्या सुरुवातीला उलगडे. नदीच्या पाण्याची उन्हाळ्याची स्वच्छ घडी मोडून जाई. पावसाळ्याचे लाल पाणी येई. वाढायला लागे आणि एका सकाळी चिंचेखाली सगळे गाव गोळा होई. चिंचेजवळच्या घळीत सुसरीचे पहिले पिल्लू निघालेले आबूने पहिल्यांदा पाहिलेले असे. मग ती जागा अलगदपणे उकरली जाई. कानात जानवे अडकविलेले उघडे दिगंबरशास्त्री खुरप्याने हळूहळू तिथली माती मोकळी करत. तिथला प्रकार विलक्षण असे. अलीबाबाच्या गुहेत पांढऱ्या रुप्याच्या नाण्यांचा ढीग दिसावा आणि संपूच नये तसा सुसरीच्या पांढऱ्याशुभ्र, लहान नारळाएवढा अंड्यांचा एकावर एक रचलेला व्यवस्थित ढीग पाहून मी थक्क होई. प्रत्येक अंडे इतके तयार झालेले असे की, ते मातीतून मोकळे करताकरताच, त्यातले वीत-दीड-वितीएवढे सुसरीचे पिलू स्वतःच्या नाकावरती असलेल्या शरिराच्या एका लहानशा शिंगासारख्या भागाने, टपकन अंड्याचे पांढरेशुभ्र टरफल फोडून बाहेर येई. पुरत्या वाळलेल्या चिंचेचे टोपण जमिनीवर फटकन फुटून आतून चिंचेचें अंग दिसावे तसे. ते फिसकारत जबडा उघडी. आपल्या आईची कुळी सांगे. स्वतःचे तांबडे क्रूर डोळे हलवी. आणि त्या नुकत्या जन्माला आलेल्या पिलात इतकी ताकद असे की, भुकेने वखवखलेल्या त्याच्या जबड्यात दिलेल्या चिपाडाच्या तुकड्याचे ते कडकड तुकडे करी. कुणाच्याही बोटाचा त्याने भुगा केला असता.

तो अंडी घातलेला खड्डा मोठ्या माणसाच्या मांडीइतका जवळजवळ खोल असे. जनावर व्याल्यावर वार आणि इतर रसांचे वास सुटतात तसा वास त्या खड्ड्याभोवती उभे राहताना नाकात भरे.

इतकी साठसत्तर अंडी घालून ती तयार होईपर्यंतचा काळ सुसर रात्री तिथे येत असली पाहिजे. पण असले काही तिने तिथे तयार करून ठेवले असेल याची कुणालाही कल्पना येऊ नये याचे सगळ्यांना आश्चर्य वाटे. त्या जागेवरून कितीदा लोक चढूनउतरून गेले असतील; पण सुसरीने, तिथून रात्री पाण्यात परतताना तिथली माती जशीच्या तशी केलेली असे. जणू मातीनेच स्वतःचे अंग पुन्हा सावरून घेतलेले असावे. सुसरीच्या त्या जन्मजात बाईपणाचे बायकात मोठे कौतुक चाले. प्रत्येक पिल्लू अंड्यातून बाहेर पडले की, नदीकडे तोंड वळवून पळत सुटे. त्या पिलाला कुणी तिकडे जाऊ देत नसत. एका टोपलीत त्यांना टाकले जाई.

उकरता उकरता तो सगळा खड्डा जिवंत झालेला असे. ती अंड्यांची उतरंड हलताना दिसे. खालच्या अंड्यातले पिल्लू वरच्या अंड्याला ढोसळत वर तोंड काढी. ते वयाने वरच्यापेक्षा मोठे असे. सुसरीने ते आधी घातलेले असे. त्यातली काही थोडी अंडी कच्ची असत. त्यातल्या पिलात स्वतःच्या नाकावरल्या शिंगाने अंड्याचे टरफल फोडून बाहेर येण्याएवढी ताकद अजून यायची असे. हलकेपणाने ते टरफल फोडले तरी त्याच्या मागच्या बाजूला अंड्याच्या कवचीचा पृथ्वीच्या एखाद्या भागासारखा तुकडा चिकटून राही. पण तो धरूनसुद्धा ते अशक्त पिल्लू नदीकडे धावू बघे. आबू शेपूट धरून हवेत त्याचे तोंड खाल्ती करी नि ते उलटे वळून चावायला येई.

सगळ्या पिलांचा रंग कंजाळझाडाच्या सालीसारखा तपकिरी आणि कमीअधिक करड्या छटा मिसळलेला असे. त्यांच्या चुंबळीच्या लहान-मोठेपणावरून, पाठीमागल्या काट्यांच्या उंचीवरून, धारेवरून, त्यातले नर-मादी ओळखता येत. नराच्या शेपटीवरले काटे मादीहून उंच असत. तो अधिक रुंद, टणक वाटे. पिलाच्या चुंबळीवर दादा मला हात ठेवायला सांगत. त्याच्या इतर शरिरापेक्षा तो भाग मऊ लागे. पण त्याच्या चुंबळीवर कितीही मारले तरी ते त्रागा करी, एवढेच. पण मरत नसे. आणि सुसरीच्या चुंबळीच्या नाजूकपणाविषयीचा माझा जुना भ्रम संपे.

सुसरीच्या पिलाच्या पुढे आलेल्या नाकाडावर दोन भोके असत. मोठ्या

सुसरी ती दोन भोकेच तेवढी पाण्यावरती आणून वरली हवा घ्यायला शिकलेल्या असत. पिलाच्या डोळ्यात एक सरकपडदा असे. आणि त्रासामुळे तो पडदा मागेपुढे करून ते डोळे उघडी, बंद करी. त्याच्या गळ्यापाशी त्याला गुदगुल्या होत नि तिथला, तोंडापासला भाग अगदी मऊ असे. त्याच्या पाठीवरले शरीर-रंगाच्या गडद छटांचे नक्षीदार डाग पोटाखाली संपत जात. आणि पोट उलटे करून पाहिले की, खालचा रंग वरल्या रंगाहून अगदी वेगळा दिसे. तांबूसपांढरट रंगाचे त्याचे पोट. आणि त्याच रंगात अंधुकपणे शरिराच्या खोलातून जाणवणारे उभे-आडवे चौकडे...

दोन्ही बाजूंनी त्याच्या शेपटावर टोकाकडे निमुळते होत गेलेले काट्यांचे फाळ असत. मध्ये पन्हाळ. आणि त्यात अतिशय जोर असे. त्याचा त्याला पोहायला, शिकारीला तडाखा द्यायला उपयोग होई. एवढ्या लहानशा पिलाची म्हशीएवढी सुसर कशी होत असेल, कळत नसे. सुसरीला, पाजण्यासाठी स्तने नसताना ते कशावर जगणार असेल, उकलत नसे.

पाणी चढून त्या जागेवर यायच्या आत पिले निघावीत इतक्या अंदाजाने सुसरीने तो घाट घातलेला असे. पण पाणी लवकर चढायला लागून तो फसून जाई. आणि त्यातून, दिवसा बाहेर पडून त्या पहिल्या पिलाने ते सगळे सुसरीच्या आवाक्यापलीकडे नेलेले असे. त्या सुसरीला, वर चाललेल्या प्रकाराची कशी जाणीव होई नकळे. ती त्यावेळी जवळपास सारखे पाण्यावर डोके काढी. पाण्यातच सरसर वर्तुळाकार रिंगणे काढी. खालती धावत जाई. वेड्यासारखे करी. तिचे सगळे तिच्या डोळ्यादेखत वरती उद्ध्वस्त होत चाललेले असे नि तिची पाण्यात उलघाल चाले.

काही पिलांना पोरे पाण्यात नेऊन सोडत नि ती अंड्यातच पोहायला शिकल्यासारखी सराइताप्रमाणे पोहत. दिसेनाशी होत. सगळी पिले नदीत सोडायला नकोत म्हणून टोपलीभर पिले रानात नेऊन पुरली जात. काही नुसतीच रानात विखुरत नि त्यांना घारी नेत. पिलांचे हालहाल होत. पण त्यांचे तसेच व्हायचे असे. इतकी साठसत्तर पिले दरवर्षी एका सुसरीला

झाली आणि जगली तर नदीत सुसरींना राहायला जागा मिळाली नसती. इतक्या पिलातले एखादेच पिल्लू शेवटी सगळ्या धकाधकीतून जगे. उरलेली वाहून जात, मरत; बाकीच्यांना मोठ्या सुसरी मटकावून टाकत.

सुसरीच्या काही पिलांना मुले गावात घेऊन जात. सुसरीचे पिल्लू ही त्या दिवशी घरोघरची गोष्ट होई. त्यातले एक पिल्लू केडीनानांनी आपल्या विहिरीत नेऊन सोडले होते. आणि खूप मोठे झाले होते. नदीच्या पातळीला आमच्या गावी विहिरीला पाणी लागे. त्यामुळे नदीच्या पाण्यातच राहिल्यासारखे ते तिथे मजेत होते. दुसरे पिल्लू देवाच्या बागेतल्या विहिरीत वाढत होते. ते आपले डोके, विहिरीच्या आतल्या पुढे आलेल्या दगडावर काढून ठेवत असताना भागूच्या मुक्याने त्याच्यावर मोठा दगड टाकला होता. आणि त्या अतिशय उंचावरून अवचित आलेल्या दगडाने त्याचे भरीत होऊन गेले होते.

...देवाखालच्या आवारात पाणी येऊन गेले की, मातीचा तांबूस चिकणा गाळ पडे. तिथून परतणाऱ्या पाण्यातून जाताना सुसरीचे एक हात लांबीचे पिल्लू गाळात रुतून राहिले होते. तो बांड प्रसादजीनी घरून आणून घरातल्या मोठ्या घंघाळ्यात ठेवला होता. त्याला शेवाळ, शेण, माती ते खायला घालत. घंघाळातले पाणी रोज बदलत. त्याच्या हालचाली बघताना दिवस पुरत नसे. तो बांड घंघाळ्यातून चुकून वरती आला असताना प्रसादजींच्या कारी कुत्र्याने त्याला फाडले होते.

पावसाळ्यात सुसरींना वाईट दिवस येत; आणि नदी आमच्या दूरातल्या शाळेसारखी वाटे. मोठी सुट्टी संपल्यासारखी, वाटेल तसे वागायची नदीची पावसाळी सुट्टी संपे. तिचे वाहायचे काम शिस्तीने, शहाणपणाने सुरू होई. शाळेतल्या मास्तरांच्या बदल्या होत, काही नवीन येत, काही कधीच न बदलणारे नेहमी तसेच राहत, तसे नदीतल्या सुसरींचे होई.

आमच्या नदीत कितीतरी वर्षे रहिवासी झालेल्या ठळक सुसरीतलीही एखादी सुसर डोहातून हरवली जाई. तरी ती फार लांब वाहवलेली नसे.

अंकलखोपजवळच्या नाहीतर त्याखाली त्र्यंबकवाडीच्या डोहात ती थांबून राही. पावसाळ्यात नदीला गाळमातीचा गढूळ गाढ रंग येई. सुसरींच्या घळींतून पाणी जाई. त्यांची घरे बुड्डून त्यांना घराशिवाय दिवस काढावे लागत. चढणाऱ्या पाण्याला खाली नेणारी अतिशय ओढ असे. पाण्याची धार सुसरींना तोडता येत नसे. पावसाळी हवा पडली की, पाण्यातल्या सुसरींच्या अस्वस्थ हालचाली दिसत. घराशिवाय राहायला लागणार असल्याची जाणीव त्यांना त्या हवेतूनच होई. पाणी खालती धावे तशी सुसरींची उलट दिशेने धाव दिसे. आणि घाटाचे दोन बुरूज बुडले की, त्या सबंध पावसाळाभर जवळजवळ दिसेनाशा होत. अलीकडच्या अलीकडे नि पलीकडच्या पलीकडे राहत. जसजसे पाणी येई तसतशा वेताबेताने त्या पाण्याबरोबर वर येऊन जीव धरून राहत. पाणी थोडे खाली उतरेल तशा खालती होत.

...पावसाळ्यात खूप पाणी चढून पूर आला की, पोहायला पडायचे, ही दादांची अगदी आवडीची गोष्ट. घाट बुड्डून गेल्यावर दादांच्याबरोबर मी नि सदा घाटाच्या वरल्या डगरीवरून पोहायला पडलो होतो. अंगातून कळा आणणारे गार पाणी वेगाने धावत होते. मध्यावरची पाण्याची धार पाहताना आपणसुद्धा त्या धारेच्या पानाने कापले जाऊ वाटे. आम्ही पलीकडे भुवनेश्वरीवाडीच्या पाणवठ्याखाली लागलो; आणि पुन्हा पलीकडे घाटावर लागायचे म्हणून मळीच्या कडेकडेने वरती जात होतो. मळीच्या गाळात मांडीइतका पाय जाई—शेवरीच्या झाडाचा आधार घेत, एक पाय गाळातून काढत नि दुसरा रुतवत जायला लागत होते. दादा पुढे होते. घाटाच्या समोर आलो तरी पुढे बरेच पुढे जायला हवे होते. मठाच्या समोर थोडे पुढे तावदराच्या मळीत आम्ही ती कसरत करत येत होतो. तिथल्या जांभळीखाली पाण्यात पडायला उतरण्यासाठी दादा पाय पुढे टाकणार तोपर्यंत सदाने त्यांना मागे ओढले होते. आमच्या पुढे गाळात लडबडलेली सुसर गारठून ओंडका होऊन पडली होती. त्या गाळात ती कंजाळाच्या ओंडक्यासारखीच वाटत होती. दादांचा तिच्यावर पाय पडला असता

तर काय झाले असते ते आठवून आम्ही सुन्न झालो होतो. सुसरीवर पाय पडल्यामुळे त्या पायातून वारे गेलेला महादू मुळीक आम्ही पाहिला होता.

आम्ही इतक्या जवळ आल्यावर केवळ लाजेकरता ती हलली. गाळमातीच्या रबड्यातून सरकत पाण्यात बुडली. ते सगळे जसे तिच्या जिवावर आले होते. आम्ही नावेने परत पलीकडे जावे या विचारात होतो. पण मग आम्ही पलीकडून पोहून आलो असे कुणी म्हटले नसते; आणि दादांनी सांगितले की, तिला या पाण्यात काहीसुद्धा करता येणार नाही. ती तिथेच काठाशी बुडून राहिली असेल; थोड्या वेळाने तिथेच निघेल. आम्ही तिथून थोडे वर गेलो. दादांनी पहिल्यांदा पाण्यात झेप टाकली. नि मागोमाग आम्ही.

पावसाळ्यातल्या काळोख्या रात्री आभाळ ढगांनी वेढून गेले होते. काळोख अधिकच साकळत चालला होता. नदीच्या पाण्याने सगळ्या अंगाने घेरून गेल्यामुळे वेट झालेले आमचे गाव पाण्याखाली चालले होते. पाणी चढण्याचा वेग वाढत होता. मी नि दत्ता भेडसगावकर देवघरात अभ्यास करत असू. दत्ताचे घर नदीकाठाशी होते. पाणी फार चढणाऱ्या वर्षी त्याच्या घरात पाणी शिरत असे. पाण्याची गाज ऐकत असताना आमचे अभ्यासावर मन राहत नव्हते. आणि दत्ताचे लक्ष सारखे घराकडे, पाण्याकडे धावत होते. पाऊस पडतच होता. आम्ही पोत्याच्या खोळी डोक्यावर अडकवून अंगाशी गुंडाळून घेतल्या नि घराबाहेर पडलो. सावकारांचा लिंब. रांगोळीआक्काचे घर. तिथून वळून आम्ही दत्ताच्या घरापाशी आलो. चढणाऱ्या पाण्याच्या लाटांचा झपाट्याचा आवाज, पावसाची जोरदार झड नि किट्ट काळोख यांनी वेळेला विचित्रपणा आला होता. दत्ताने त्याच्या घराजवळ आलेल्या पाण्यापाशी बॅटरीचा झोत टाकला.

एका मोठ्या सुसरीचे डोके त्या भयानक वेळी तिथे हलके येऊन लागत होते.

सगळीकडे पसरून राहिलेल्या काळोखाच्या पटावर येऊन लागणारे, खूप

मोठ्या झालेल्या पालीसारखे ते सुसरीचे तोंड बघून मी अगदी गळून गेलो. तो जणू काळोखाचा कडीपाटच होता.

आमच्या जुन्या घराच्या काळ्या कडीपाटावरून फिरणाऱ्या पालीवर हात उगारला की दादा सांगत :

..."पाली आपल्यावर रागावल्या की, नदीत राहायला जातात आणि त्यांच्या सुसरी होतात..."



हा चौघडा अपाचे

....मोरपिसारा पसरल्यासारखा आमच्या दारच्या चिंचेचा आकार होता. सकाळी उठल्याबरोबर हिरव्यागार चिंचेवरून खाली अंगणात पसरलेला पिवळा केशरी मोहर, पहाटे पहाटे वाजून गेलेल्या आवाजाने पडलेला आहे असे मला वाटत असे.

पहाटे अनसयाचा कोंबडा पहिल्यांदा बांग देई. नंतर मोहर हलके खाली आणणारा तो आवाज सुरू होई. अंथरुणातच राहून त्या आवाजावर मी हेलकावे खात असे. मला तो आवाज आवडे.

तो आवाज आमच्या गावात भरून राहिल्यासारखा वाटे. हवेतल्या प्रत्येक कणापाशी पोचलेला असे. नदीचे पाणी खालवर व्हावे तशा त्या लाटा गावाला जणू हळुवारपणे हलवत. तो आवाज कुठून सुरू होई ते कळत नसे. वरल्या आभाळातूनही तो खाली येत असेल.

त्या आवाजाने आई, 'चला' असे स्वतःशी म्हणत उठे. पोतेरे आवरी. चहा तयार होईतोवर थोरली आईही उठे. मग दोघी जात्यावर वसत. त्यांच्या जात्यावरच्या गाण्यांना, आमच्या पाठीमागल्या घरातल्या



ओव्यांचे किनरे सूर येऊन मिळत. त्या गाण्यांच्या सुरामागे आधीपासून सुरू झालेला आवाज असे. थोड्या वेळाने त्यात देवाखालच्या काकडआरतीची जाग येऊन मिसळे. पाठोपाठ पलीकडल्या भुवनेश्वरीच्या देवळातल्या सनईचे गार सूर...

मग आवाजाची मंदावत चाललेली लय थांबे. तो आवाज कुठे निघून गेला, समजेनासे होई.

पण त्या आवाजानेच हळूहळू काळोख निवळे. उजाडू लागे. डोहाचे पाणी, पसरलेल्या मळया, गावाचा सगळा भोवताल जागा होई. झाडे आनंदाने तुडुंबलेली दिसत. ताजे होण्यासाठी तो आवाज सगळ्यांच्या अंगावरून जायला हवाच असे.

देवाला जागे करण्यासाठी तो चौघडा वाजवतात हे मग मला कळले. तो वाजवणारी माणसेच होती. आणि चौघडा आमच्यापासून जवळच होता.

कितीतरी दिवस मागे लागल्यावर दादांनी मला एका मंद प्रकाशाच्या वेळी चौघड्याकडे नेले होते. आमचे अंगण ओलांडले की, गजाननकाकाचा कट्टा लागे. पुढे शिराळकरांचा बोळ. टोकाशी लिंबाचे, गार पालवीचे मोठे झाड. लिंबाच्या छायेखाली, तांबूस जुन्या विटांच्या बांधणीची चौघड्याची माडी होती. विरे गेलेल्या चुन्याच्या दर्जाची.

दादांच्याबरोबर मी पहिल्यांदाच तो भाग बघत होतो. लिंबाजवळ, चौघड्याच्या इमारतीच्याखाली, डोक्याचा तुळतुळीत गोटा केलेला, भगवी कफनी घातलेला एक काळसर शेलाटा माणूस उभा होता. दादा त्याच्याबरोबर काहीतरी बोलले होते एवढेच आता आठवते. पण अनेक वर्षे झाली तरी तो माणूस अजुनी माझ्या डोळ्यांपुढे येतो. झण् झण्...झण् झण्...अशी गत दुपारचा चौघडा संपत आला की तो वाजवी.

चौघड्याच्या इमारतीच्या तळाला, एकच मोठा दरवाजा असलेले एक दुकान होते. तिथे पंडितराव नावाचे कुणीतरी, खोकल्याची उबळ धरून बसलेले असत. बाजूने काळ्यानिळ्या छटांच्या दगडाच्या जुन्या पायऱ्या होत्या. पायऱ्यांच्या बोगद्यातून वर गेल्यावर डाव्या बाजूस भिंतीवर वरून गुळगुळीत उतार होता. चढून गेल्यावर अगदी समोर, कुणी पडू नये एवढ्या उंचीची एक भिंत होती. तिला तशीच आणखी एक आडवी भिंत.

स्वर्गातला चौघडा पाहायला जात असल्याइतका आनंद दादांच्याबरोबर

चढून जाताना मला झाला होता. वरती पूर्वेकडे तोंड करून कावळ्यासारख्या निळ्याकाळ्या रंगाचे दार होते. आत खूप धुरळा भरून राहिला होता. गज नसलेली एक उघडी खिडकी होती. आणि आत तीन माणसे बसलेली होती. दादा आत गेल्यावर त्य तिघांनी तिथल्या तिथेच हलून सरकल्या-सारखे केले. तिथली हवा अगदी जुनी, घरातले सारवण निघाल्यादिवशी, माडीवरल्या अंधाऱ्या खोलीतली आईची लाकडी पेटी उघडल्यावर जसा एक वास येई, तशी होती.

तीन माणसात, पांढऱ्या मिशांचा चोबा ठेवलेला एक म्हातारा होता. त्याचे नाव दादू. त्याचे गाल कायमचे फुगून गोल झाले होते. भिंतीला टेकून ठेवलेली लांब सनई तो चौघड्यात वाजवत असे. दादू फिकट पिवळा होता. आणि सारखा खोकत असे. मधून मधून तो सनई हातात घेई आणि एखादा सूर काढी. दुसरा माणूस ओशट काळ्या रंगाचा, लांबड्या नाकाचा होता. त्याला राघू म्हणत. पिवळे दात बाहेर काढून कुठल्याही गोष्टीला मान हालवत तो हसे. तिसऱ्या माणसाच्या आकाराचे आता आठवणीत धुके होऊन गेले आहे.

तिथल्या उखणून गेलेल्या खळग्याखळग्यांच्या जमिनीवर, कातड्याच्या फिकट पिवळ्या पांढऱ्या तबकड्या बसवलेली, उभ्याआडव्या वाद्यांनी गुंफलेली तीन भांडी होती. आणि चौथ्या भांड्याचे कातडे फुटून गेले होते. फुटक्या भांड्याएवढेच त्यातले एक भांडे होते. त्याचा बाहेरचा भाग, आमच्या तांब्याच्या हंड्यासारखा पण मळकट, ठोक्याठोक्याचा होता. ती दोन भांडी एवढी मोठी होती की, मी त्यांच्याजवळ उभा राहिलो तरी ती माझ्या डोक्याच्या किती तरी वर गेली होती. ती रुंदही तशीच होती. त्या भांड्यांना दादा 'नगारा' म्हणत होते. तोपर्यंत जेवून खूप झाल्यावर 'नगाऱ्या, ऊठ आता' असे आई म्हणत असताना फक्त तो शब्द मी ऐकला होता. चौघड्याचा मुख्य आणि भरून राहणारा आवाज त्या नगाऱ्याचाच होता. नगाऱ्यावर मारण्यासाठी पुढे गोल असलेल्या छड्या होत्या.

पहिला नगारा सगळीकडून फुटला होता म्हणून तो दुसरा नगारा नवीन

आणला होता. आणि फुटलेला नगारा म्हाताऱ्या माणसासारखा निवांत बसला होता. त्या दोन नगाऱ्यांची पिले असावीत तशी उरलेली दोन भांडी होती. लाकडाचे अंग असलेली. 'राजाला गाढवाचे कान' ही गोष्ट तेव्हा मी नुकतीच ऐकली होती. आणि त्या पोकळ लाकडात बोलल्यामुळे तबल्यातून निघालेल्या बोलांसारखा त्या भांड्यातून कुणाचा आवाज निघतो ते मला पाह्यचे होते. पण दादा त्या भांड्यांना हात लावून देत नव्हते. ती बिघडतील म्हणून सांगत होते.

नव्या नगाऱ्याकडे त्यातले लहान भांडे कलते करून ठेवलेले होते. आणि ती दोन्ही राघू एकदम वाजवत असे. पुढचे तोंड पितळेचे असलेल्या, मधुर आवाजाच्या दोन सनया तिथे होत्या. त्या दादू वाजवत असे. आणि भाकरीएवढ्या लांकडी मुठी असलेल्या दोन झांजाही होत्या. एवढ्या मोठ्या झांजा मला दुसरीकडे कधीच बघायला मिळाल्या नाहीत. नगाऱ्याच्या भरदार आवाजातून उठून कळण्यासाठी त्या तेवढ्या हव्याच होत्या...

गावात भरून राहणाऱ्या आवाजाच्या घराचे गूढ मी पाहिले. आणि कितीतरी मोकळे मोकळे वाटले. तरी तिथल्या जागेविषयी एक विचित्र ओढ मला लागून राहिली होती. त्या इमारतीलाच 'चौघडा' असे म्हणत.

चौघडा तीन वेळा वाजे. पहाटेनंतर दुपारी. पहाटेसारखी सनई दुपारच्या चौघड्याला नव्हती. डुम्डुम् अशी सुरुवात होई. त्यावेळी आई 'डुम् पडला' म्हणत असे. पिवळे धमक ऊन चढत चाललेले असे. उन्हाचा रट सुरू होई. त्याच्या थरथर आवाजाच्या लहरी पार कानापर्यंत शिरत. त्या थरथरीतून चौघड्याचा आवाज गाळून येई. समोर नदीवरल्या भागातला कोलाहल थांबून गेलेला दिसे. झाडांची पानेसुद्धा हलायची थांबत.

त्या शांत दृश्यातून फक्त पंचा नेसलेल्या, गंध लावलेल्या, उघड्या शरीरांच्या आकृती, घराघरातून जाताना दिसत. आमच्याही घरी येत. थोरली आई त्यांना उठून माताच्या मुदी वाढी. देवाची सेवा करायला आलेले ते माधुकरी असत. चौघडा संपेपर्यंतच्या वेळातच ते येत. चौघडा आपला

वाजतच राही. संपता संपताना ती झांजांची रुंद गत सुरू होई. त्या झांजा एकमेकींवर कशा आवाज करत असतील ते डोळ्यांपुढे येई. कुणी तरी उन्हातून झण्झण् झण्झण् असे चालत येते आहे वाटे. भीती वाटू लागे.

थोड्या वेळाने आवाज संपून गाव गप्प होऊन जाई. आणि मग आमच्यातली जेवणे होत.

...संध्याकाळी घरालगतच्या दगडी कट्टयावर थोरल्या आईची सभा भरलेली असे. धाकटी आजी, लाडकी आजी, आकूताई आजी येत. शिळोप्याच्या गोष्टी रंगत. हळूहळू काळोख पसरायला लागला की, दुपारी झोपी गेलेला चौघड्याचा आवाज जागा होऊ लागे. आणि ती सभा संपे. घरातली आईने पेटवलेली शेगडी रसरस करू लागे. तिचा सौम्य तांबूस प्रकाश पसरे. शेगडीवरल्या भाताच्या उतू गेलेल्या कढाचा खरपूस वास घर भरून राही.

सनईचे मधुर सूर भरू लागत...चौघडा सुरू होई. पलीकडल्या भुवनेश्वरीच्या देवळातल्या घंटांचे झंकार त्यात मिसळत. चौघड्याच्या आवाजाने काळोखाचे कळपे निखळत असल्यासारखे वाटे. देवाकडे आरती सुरू होई. रात्री संपून गेलेल्या चौघड्याच्या आवाजाच्या लाटा, रात्रीच्या काळोखाच्या खडकाखाली बुडून पुन्हा पहाटेच्या आवाजातून वरती येत.

पाण्याच्या झोताखाली थांबावे तसा एका रात्री, चौघड्याच्या खिडकीखाली तो आवाज अंगावर घेत मी उभा राहिलो होतो. आणि परतताना शिराळकरांच्या बोळातल्या काळोखात चावलेल्या विंचवाच्या कळा रात्रभर पायात पसरत होत्या.

...उन्हाच्या वेळी, चौघड्याजवळ लिंबाच्या छायेमुळे अगदी गार असे आणि शुकशुकाटही. चौघड्याच्या दगडी पायऱ्यांवर उघडे अंग टेकवले की छान वाटत असे. पायऱ्या चढून गेल्यावर दारात जो चौकोन होता तिथे दुपारी वच्चीचा काचा फुकायचा खेळ चाले. तिने किती तरी रंगीत काचा वेचलेल्या होत्या. परकराच्या ओच्यातून ती त्या घेऊन येई. परकर सभोवार पसरून आतले उघडे अंग दगडाच्या गारव्यावर ठेवी.

वच्चीची आई आमच्याकडे कामाला येत असे. तिच्याबरोबर वच्ची येई. वच्ची रंगाने काळी होती. पण तिचे डोळे फार छान होते. तिचे दात पांढरेफेक असत. ती माझ्याबरोबरची असून माझ्याहून लहान होती, ही गंमतच होती. सातव्या महिन्यातच घाईघाईने जन्माला येऊन ती माझ्याबरोबरीची झाली होती. ती अशक्त होती. पण आमच्या आईला आवडे. तिला ती नेहमी कपडे करी. पण कुणापाशी कितपत वागावे याची विलक्षण जाण तिला त्या लहान वयात होती...त्यामुळे सगळी वच्ची आईला माहीतच नव्हती.

आमच्याकडे वच्ची येई तेव्हा गप्प असे. पण बाहेर तिला खूप शिव्या येत. आणि अंधाराच्या गूढासारख्या कितीतरी चमत्कारिक गोष्टी त्यावेळी ती करी. वच्चीचा बा राघू. तो खूपदा चौघड्यातच बिड्या ओढत पडलेला असे. त्यामुळे वच्चीची चौघड्यावर जवळजवळ मालकीच होती. तिच्याबरोबर मलाही आत जाऊन बसता येत होते.

दुपारच्या वेळी चौघड्याच्या मोकळ्या खिडकीतून लिंबाची पिवळी पाने गिरकत येऊन आत पसरलेली असत. आणि पानांचे नक्षीदार अंथरूण घालावे तशी ती आतली जागा दिसे.

वच्ची आपल्या आईविषयी काय वाट्टेल ते सांगत असे. रात्री उठून कुठे जाते ते सुद्धा. राघूचे आणि तिच्या आईचे सारखे वाजे. त्यातून तिला ती माहिती झाली होती. एकदा दुपारी राघू नसताना तिने चौघड्याच्या दाराला आतून कडी लावून घेतली. आणि ती तिच्या आईविषयी तसलेच बोलू लागली. थोड्या वेळाने तिथल्या फुटलेल्या नगाऱ्यात दोघांनी बसून लपण्याचा खेळ तिने काढला. आणि नगाऱ्याच्या आत तिने मला एकदम इतके घट्ट धरले की मी भांबावलो. नंतर ती उठली. मोठ्यांदा हसू लागली. म्हणाली, "आईला सांगू नको..."

पुढे वच्चीचे ती एवढीशी असतानाच एक दिवस लग्न झाले. आणि ती कुठे निघून गेली. पण तिचा बा रोज चौघड्यात येत होताच. चौघड्यातच दगड मांडून त्याने चूल केली होती. चुलीकरिता तो वडाखाली पडलेल्या

वाळलेल्या काटक्या गोळा करून घेऊन येत होता. चौघड्यातच भात उकडून खात होता. त्याने पुढे वच्चीच्या आईला सोडूनच दिले होतें. वच्ची, तिची आई चांगली नसल्याचे सांगे ते मला तेव्हा आठवे.

...चौघड्याच्या पाठीमागच्या बाजूला सावकारांचे घर होते. तिथल्या वातावरणात वरून डोकावून बघताना मला काहीतरी निराळा गंध श्वासात मिसळत असल्यासारखे वाटे.

...पहिल्यापहिल्यांदा दादा कविता कशा करायच्या ते सांगत आणि स्वतः करून त्या मीच केल्या आहेत असे मला पटेपर्यंत पटवून देत. प्रत्येक गोष्टीत दादांचे असेच असे. एका ठराविक मर्यादेपर्यंत माझ्या नावावर ते ती गोष्ट करत आणि एक दिवस आपले अंग खुशाल काढून घेऊन मला कोड्यात टाकत. मी आणि दत्ता भेडसगावकर तेव्हा पहाटे उठून अभ्यास करत असू. खरे म्हणजे तोच लवकर उठे. मी आळसावून लोळत असे. आणि तोच मला हाक मारत असे. पण यावर दादांनी कविता करताना, आपण त्याला उठवत आहोत असे समजायचे म्हणून मला सांगितले होते. ते का, ते मला समजले नाही. त्यांनी 'तू लिहिलेली एक कविता बघ' असे म्हणत सांगितलेली ती कविता मला आता अस्पष्टशी आठवते :

...ही घांट वाजली रे
सुरु आरतीहि झाली
बघ कोंबडा कसा रे
उठुनीहि साद घाली
...हा चौघडा झणाणे
तुज नीज काय आली !

दादांनी कविता लिहिल्यावर ती आपणच लिहिली आहे हे सिद्ध होण्यासाठी मी तीतल्या सगळ्या शंका त्यांच्याकडून सोडवून घेत असे. त्या कवितेतला 'झणाणे' हा शब्द मला नवीन होता. पण ती वाचल्यानंतर रोज वाजणारा

दा. क्र. ७६३९२

आमचा चौघडा एखाद्या माणसासारखा जिवंत होऊन उठल्याचा विलक्षण आनंद मी त्या कवितेतून घेतला होता.

...काही दिवसांनी आमचा भाक्या गेला. आमच्या घरातले फार वर्षांनी झालेले ते दुसरे मरण. भाक्या आमच्या घरात सर्वात उजवा होता. गोरापान आणि रुंद कपाळाचा. त्याचा हात पाहून आमच्या आजोबांनी पोरगा जगला वाचला तर हिटलर होईल असे सांगितले होते. हिटलर हा आमच्या आजोबांच्या मताने सर्वांत मोठा माणूस होता.

उन्हे चढत होती. फक्त डुम् पडला आणि भाक्या गेला. मरण झालेले असताना चौघडा वाजवायचा नव्हता. सुरू व्हायला लागलेला चौघडा पुढे झडलाच नाही.

मला आणि सदाला आमच्या घराच्या जुन्या भागात आणून बसवलेले होते. वरल्या विरळ झालेल्या कौलारातून खालती उतरून ऊन पसरत होते. वर असंख्य कोळ्यांची जाळी लागलेली होती. अंगणातल्या फरशीचा उन्हाने पिवळा दिसणारा लांबोडका तुकडा समोर दिसत होता. आमच्या पुढे काकाने केळी आणि बिस्किटे आणून ठेवलेली होती. घरातले दुःख म्हणजे काय ते आम्हाला त्यावेळी कळत होते. तरीही आम्ही ती केळी, बिस्किटे अधाशासारखी खात होतो.

भाक्याला उचलून घेऊन फरशीवरल्या उन्हातून जाताना आम्ही शिराळकरांना पाहिले. मागोमाग दादा, आणखी काही माणसे खाली माना घालून चालत गेली. आणि आमचा भाऊ गेलेला असताना आम्हाला खाणे सुचले या जाणीवेने आम्ही अगदी शरमून गेलो.

अवेळी थांबलेला चौघडा आणि आमचे ते खाणे यांचा अन्वय मला लागला नाही...

पुस्तक क्र. ९७२ डोह वि. निबंध
प्र. क्र. १४८५ दि: २०१७

REFBK-0014392

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक- ४२०२१ दिः ...१९९४...
प्रत क्र. १९४२ नोंद दिः ...१९९८...